# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## सभा क्र.४५ // तहकुब विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ३१/०३/२०२१

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३१/०३/२०२१ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सन २०२० -२०२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरणासाठी दि.२५/०२/२०२१ रोजी तहकुब झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बाविस्कर किशोर रमेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | काळे अमित पांडुरंग |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील कुलभुषण विरभान |
| काळे रेश्मा कुंदन | लढढा नितीन बालमुकुंद |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, नगरसचिव ,श्री.रविंद्र कदम, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या अर्थ संकल्पिय तहकुब सभेत सन्मा. सदस्य श्री. ललीत विजयराव कोल्हे यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा. सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे. विषयपत्रिकेवरील विषयांना सुरु वात करण्यात येत आहे.

**मा.सभापती :-** सभेच्या कामकाजास सुरूवात करावी.

**नगरसचिव :-** दि.२५/०२/२०२१ गुरूवार रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेली सभा तहकुब करण्यात आलेली सभा आज दि.३१/०३/२०२१ रोजी आयोजित केलेली असुन सदर सभेत पुढील प्रमाणे सभेच्या मान्यतेकरीता विषय ठेवण्यात आलेले आहेत.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./ जशमनपा/ लेखा/ ८१३/ २०२०-२०२१ दि.१५/०२/२०२१ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०२०-२०२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेत आले असुन त्या अनुषंगाने अर्थ संकल्पास मान्यता देणे.

**मा.सभापती :-** सन २०२० -२०२१ चे सुधारीत अंदाजपत्रकासह सन २०२१ -२०२२ चे मुळ अंदाजपत्रक प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त साहेबांनी स्थायी समिती सभेसमोर सर्व सन्मा.सदस्यांना त्याच्या प्रती देण्यात आलेल्या होत्या आणि दि. २५/०२/२०२१ च्या स्थायी समितीच्या सभेत आपण सदरच्या अंदाजपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी सदर सभा आपण तहकुब ठेवण्यात आलेली होती. त्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये आपण सर्व सन्मा.सदस्यांनी जी वाढ सुचविलेली आहे ती या अर्थसंकल्पामध्ये ती याच्यामध्ये अंतर्भुत करून सदरचा अर्थसंकल्प हा आपण आज त्यामध्ये जी वाढ असेल ती सर्व सन्मा. सदस्यांनी सुचवायची आहे. मी विनंती करेल . आपण जी मुकुंदाभाऊ यांनी जी वाढ कमी केलेली आहे. जे दाखले होते, दाखल्यांसाठी प्रशासनाने काही वाढ सुचविलेली होती. त्यामध्ये सुधारणा सुचविलेल्या आहेत मुकुंद भाऊंनी मांडाव्या.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** पथाचे दरात सुधारणा करणे. मा.आयुक्तांनी केलली तरतूद ५०० रूपये आणि आम्ही सुधारीत ३०० रूपये व्यतिरीक्त सध्दयाचे दर मा.आयुक्तांनी केलेली दर १०० रूपये असे व आम्ही केलेली ३०० रूपये तसेच सध्याचे शुल्क दर २० रूपये आयुक्तांनी केलेले १०० रूपये आणि आम्ही तसेच मिळकतीत खर्चाचे बिल तर सध्यााचे त्याचे दर १० रूपये आयुक्त साहेबांनी दिलेले दर १०० रूपये ती दुरूस्ती करण्यात यावी

आणि नळ संयोजन फॉर्म सद्याची रक्कम ५ रूपये प्रशासनाने दिलेली तरतूद ५० रूपये आणि आम्ही केलेली तरतूद २० रूपये करण्यात यावी.

**मा.सभापती :-** यानंतर उज्ज्वलाताई बोला.

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** प्रशासनाने नगररचना विभागाला ९ कोटी ४६ लक्ष २२ हजार अपेक्षित जमा दाखविलेली आहे. गुंठेवारी अधिनियमाची अंमलबजावणी केल्यास त्यापासुन ९ कोटी ४६ लक्ष २२ हजार एवढी रक्कमेपेक्षा १५ कोटीची तरतूद करण्यात यावी. त्यानंतर दुसरा विषय १३ नंबरचा प्रशासनाने घरपट्टीला ७५.३० कोटी अपेक्षित जमा दाखविलेली आहे. मुळात ती ९७.७९ कोटीची आहे त्यामुळे ती ९७.७९ कोटी करावी व त्यानुसार घरपट्टी विभागाने वसुल करावी. सर मला एक प्रश्न आहे की ९७.७९ कोटीची आपल्याला यामध्ये घरपट्टी कराची रक्कम वसुल करायची आहे. सर आपण ७५.३० कोटी का नोंदलेली आहे.आपण असे का म्हणत नाहीये की पुर्ण रक्कम वसुल करण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** सन्मा .सभापती व सर्व सन्मा.सदस्य ताई आपण खुपच मुलभुत आणि अतिशय चांगल्या प्रकारचा असा हा प्रश्न आहे तो आपण या ठिकाणी उपस्थित केला आहे आणि खरतर बजेट संदर्भात आपण याच मुद्दयावर सखोल चर्चा करण्याचे असे माझे वयक्तीक मत आहे. आपण अर्थसंकल्प त्याचं जर आपण जर तो समजुन घेतला तर आपण ज्या वर्षाचा अर्थसंकल्प म्हणजे बजेट तयार करतो. त्या वर्षासाठी महानगरपालिकेच्या वेगवेगळया उत्त्पन्नाच्या मार्गांमधुन हे आपल्याला अपेक्षित उत्पन्न किती येणार आहे. त्याचा आपण अंदाज करायचा आहे. ज्याला आपण अर्थसंकल्प म्हणतो त्याच वेळेला त्याला प्रशासकीय भाषेमध्ये आपण अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक असेही म्हणतो. म्हणजे अंदाजपत्रकामध्ये आपण जमा आणि खर्चाचा अंदाज देणं गरजेचे आहे. आता आपल्याला वेगवेगळया मार्गांनी जे येणारं उत्पन्न आहे. त्या उत्पन्नाचे दोन भाग आहेत.एक ते उत्पन्न ज्याची मागणी आहे आणि जी काही मागणी असेल त्या मागणी नुसार आपल्याला प्रत्यक्षात त्या वर्षामध्ये किती उत्पन्न मिळू शकतं. आता जसा आपण उल्लेख केला की घरपट्टीची जी आपली मागणी ती ९७.७९ कोटी आहे. ही वस्तुस्थिती आहे किंवा नागरीकांची जी काही आपण असेसमेंट केलेली आहे.त्याप्रमाणे त्याची एकूण येणे मागणी आपली ती ९७.७९ कोटींची आहे. परंतू कोणताही टॅक्स जर आपण विचारात घेतला तो महानगरपालिकेचा असेल , नगरपालिकेचा असेल किंवा कुठल्याही शासनाचा असेल कुठल्याही कराची वसुली ही १०० टक्के होवू शकत नाही. त्याच्यामध्ये अनेक व्यवहार्य अडचणी येतात. अशावेळेला मागील प्रमाणात उत्पन्न जर आपण धरलं तर त्याचा आपल्यावर काय परिणाम होतो त्याचं उदाहरण आपण घेवु शकतो की जर आपण घरपट्टी १०० टक्के वसुल होईल अशी अपेक्षा धरून आपण ते उत्पन्न जर आपण १०० टक्के अपेक्षित धरलं , तर जमेची बाजु फुगलेली दिसेल. आता आपण आपल्या महानगरपालिकेचा आतापर्यंत गेल्या मागील २० -२५ वर्षापासुनचे जर रेकॉर्ड बघितले तर ही आपली वसुली ५०-५५-६० टक्क्यांच्या पुढे जात नाही. ज्या ठिकाणी चांगल्या पध्दतीने वसुली होवू शकते . ती वसुली सुध्दा ८० ते ८५ टक्क्यांच्या वर जात नाही. हा आपला सर्वसाधारण अनुभव आहे. तर येणे मागणी असणं आणि प्रत्यक्ष वसुल होणं. याच्यामध्ये खुप बदल आहेत.अशावेळेला आपण काल्पनिक दृष्टया जर उत्पन्न जर आपण धरलं तर तेव्हा जमा आपली फुगलेली दिसते तेव्हा मग की जी वास्तवाला धरून नाही किंवा व्यवहारालाही धरून नाही आणि मग खर्चामध्ये सुध्दा आपण तरतूदी करतो आणि मग आपण बजेट तरतूद आहे याला प्रशासकीय मान्यता द्या . निविदा काढा निविदा काढतो काही वेळेला पालीकेचे पैसे वेळेवर मिळत नाहीत त्याच्यामुळे रिस्पॉन्स मिळत नाही व त्या ठिकाणी कामं होतात परंतू आपण त्याचे पैसे वेळेवर देवु शकत नाही आणि या सगळया आर्थिक अव्यवस्था म्हणा किंवा गैरशिस्त पणा म्हणा .याचा मुळ आपलं या बजेट मध्ये आहे. जर आपलं उत्पन्न व्यवहाराला धरुन , वास्तवाला धरून जर धरलं तर खर्चही आपला जेवढं उत्पन्न आहे. तेवढ्याच खर्चाची बाजु आपण मांडणार आहोत आणि खर्च बाजु जर व्यवहार्य असेल तर जेवढी कामं आपण प्रस्तावित करू तेवढी कामं आपण हाती घेवु शकतो. पैसे मिळण्याची कॉन्ट्रॅक्टरला खात्री मिळु शकते आणि मग अशा पध्दतीने कॉन्ट्रॅक्टरचेही रिस्पॉन्स मिळतील आणि काम झाल्यानंतर कधी पैसे मिळतील याची आपल्यालाही राहणार नाही आणि ठेकेदारांनाही राहणार नाही किंवा मग काम झाल्यानंतर ठेकेदाराला लगेच पैसे मिळत असतील तर कामालांही चांगला रिस्पॉन्स मिळेल कामही चांगल्या क्वॉलीटीचे मिळतील आणि मनपाच्या कामाला रिस्पॉन्स चांगला मिळेल आणि एक अशी शिस्तीला धरून होणार आहे. तेव्हा माझी विनंती आहे या विषयी या सभागृहाला राहील की आपण वाढ उत्पन्नामध्ये जरूर धरू शकतो परंतू ती वास्तवाला व व्यवहार्याला धरून असावी. यासाठी आपण आपली वसुली जास्तीत जास्त जी होईल जसे मी आता म्हंटल ५५ ते ६० टक्क्यांच्यावर आपली वसुली जात नाही हा अनुभव आहे.परंतू याच्यामध्ये आपली प्रशासकीय कार्यक्षमता

वाढवण. आपल्याला अनेक काम करणं आणि आपल्या वसुलीचे जे आपले चारही प्रभाग कार्यालये आहेत यांना वाढीव उद्दीष्ट देणं आणि मग त्याच्यामध्ये आपल्या वसुलीची टक्केवारी एकदम वाढणार नाही ती टप्प्याटप्प्यान म्हणजे ६०/ ७०/ ८०/९० अशी आपल्याला मॅक्झीमम कीती जाता येईल हे पाहाता येण हाच एकमेव शिस्तिचा पर्याय आहे. जर आपण असे अपेक्षित धरलं की अनेक वर्ष जेवढी मागणी आहे तेवढी वसुली होईल असे कधीच होणार नाही आणि त्यामुळे आपल्या अनेक संकल्पना दिसतात पण प्रत्यक्षामध्ये त्या कागदावरच राहतात व त्या व्यवहारात येवु शकत नाही. तेव्हा आपल्याला वास्तवाच्या आधारावरच हे बनवायच आहे आणि त्यामुळे या गोष्टी प्रशासनाने व्यवहार , वास्तविकता आणि महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्याचे उद्दीष्ट या सगळयांची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.आजही आपण बघितलं की मागच्या वर्षाचे उत्पन्न जर आपण बघितले किंवा मागच्या वर्षी आपल्याला मार्चच्या शेवटी शेवटी करावा लागला तरी मागच्या वर्षी आपले ४१ कोटी आणि काहीतर वर एवढ उत्पन्न होतं . आज आपल्याला जवळ जवळ लॉकडाऊन मध्ये गेले त्याचा खुप मोठा परिणाम आर्थिक व्यवहारावर झालेला आहे आणि आत्ता जर आपण बघितलं तर आपण सुधारीत बजेट मध्ये जे प्रशासनाने ठरवलं होतं ५० कोटींच मला वाटतं ते आजच्या वसुली सह ५० कोटींच उद्दीष्ट पुर्ण करू म्हणजे लॉकडाऊनचा कालावधी असुन सुध्दा बरेचश्या मोठया याच्यावर आर्थिक परिणाम होवुन सुध्दा आपण मागच्या वर्षीच्या तुलनेमध्ये २० टक्क्यांनी उत्पन्न आपण वाढवु शकलो आहे. अशीच जर उत्पन्नची वाढ आपण करू शकलो सर्व सहाकार्यांच्या मदतीने तर आपलं हे उत्पन्न त्याच्यावर जर काढलं ६०/ ७० /८० टक्क्यांपर्यंत तर आणि मग आपल्याला खरा फायदा या उत्पन्नाचा होईल आणि आता आपल्याला समाधानही मिळेल की कागदोपत्रीचं उत्पन्न आम्ही सुचवले होते त्यापेक्षा २२ कोटी वाढले हे कागदावरच राहील. पण प्रत्यक्षामध्ये आपल्या याच्यावरची रक्कम जमवण याला महत्व राहील . अन्यथा नुसते कागदावरचे आकडेवारी पाहीली तर मग खुप काही जमा दिसतात पण जर व्यवहाराला धरून जर समजा वसुली होवु शकत नाही तेव्हा आपण ही वास्तविकता ॲक्सेप्ट केली पाहीजे. मात्र केवळ होईल तेवढा वसुल असे उद्दीष्ट न देता आताची जी काही आपली वसुलीची कार्यवाही आहे.त्याच्यामध्ये आपल्याला वाढ करावी लागेल प्रत्येक प्रभागाला टारगेट वाढवुन द्यावं लागणार आहे आणि त्या वाढलेल्या टारेगट प्रमाणे त्यांच्याकडुन आपल्याला वसुलीची कार्यवाही जर केली तर आपल्याला वास्तविकतेचे बजेट केल्याचही समाधान मिळेल आणि उत्पन्नमध्येही वाढ आपली दिसुन येईल. प्रभागावाईजच आपण निर्णय घेवुन यामध्ये आपण जी काही उत्पन्नामध्ये वाढवायचा विचार करतो . त्याला मात्र आपण वास्तविकता चांगल्या प्रकारे काहीतरी दिलं पाहीजे.

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** साहेब प्रशासनाने एक सांगावे की आपण म्हंटल ते मान्य आहे की पुढे वसुली होत नाही ही वस्तुस्थिती आहे ती चांगल्या प्रकारे होण्याचे प्रयत्न आपण करतो . पण प्रशासनाने प्रभाग समित्यांना सांगायला पाहीजे की जेवढे हे आहे तेवढे तुम्ही जास्तीत जास्त वसुली आपल्याला कशी करता येईल.याकडे लक्ष देण हे आवश्यक आहे नाहीतर ७५.७९ कोटी आहे ते आले म्हणजे आपण शांत असे न करता.

**मा.सभापती :-** ताई त्यांच म्हणण असे आहे की आपण त्यांना सक्त ताकीद दिली पाहीजे की आपण ७०/८० च्या पुढे जायला पाहीजे आपण मुळातच ७० ते ८० टक्क्यांच टारगेट तर आपण ४५ ते ५० च्या वर जावुच शकणार नाही.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे. आपण म्हणजे ताई म्हणताहेत व सभापती साहेबांच्या ज्या सुचना आहेत त्या आपण घेवुन करू . ज्या वेळेला आपण उद्दीष्ठ ठेवतो त्यावेळेला आपण १०० टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपण ८० ते ९० पर्यंत जातो. हे जे आहे ताई आपलं १०० टक्केच राहणार आहे पण बजेट मध्ये अपेक्षित १०० टक्के राहणार नाही. बजेटमध्ये आपल्या अपेक्षित उत्पन्नाची आकडेवारी आहे. बजेट मध्ये काय असत की जसे तो जो क्लार्क आहे त्याला आपण म्हणणार नाही की तु १०० टक्के वसुली करू नको ते त्याच काम आहे तो १०० टक्केच करणार आहे पण आम्ही ज्यावेळेला १०० टक्के गाठण्याचा प्रयत्न करू त्यावेळेला ७० टक्क्यांच्यावर जावु म्हणजे आता म्हंटल्याप्रमाणे प्रत्येक महानगरपालिका , नगरपालिका हद्दीमध्ये वसुलीची एक संस्कृती बनली आहे दुर्देवाने आपल्याकडच वसुलीचं प्रमाण हे कमी आहे . आता आपण जे रकमा कागदपत्रांमध्ये वाढवायच म्हणतोय याच्यामध्ये आपले प्रभाग अधिकारी सुध्दा याच्याकरीता जीवतोड काम करतील आणि आत्ताचं जे वसुलीचं प्रमाण आहे. ते प्रमाण आपल्याला लक्षणिय दृष्टया वाढलेले दिसेल. पण माझी विनंती एवढीच आहे की आपण उत्पन्नामध्ये वाढ जरूर करणार आहोत. उद्दीष्ठ नक्कीच आपण १०० टक्के ठेवणार आहोत परंतू अपेक्षित असल्याप्रमाणे न करण हे म्हणजे आपणच थोडसं बजेट फुगवण आणि विनाकारण आकडेवारी जास्त दिसतात आणि मग पुन्हा आपल्याला असे वाचायला येते की बातमी मध्ये की महानगरपालिकेने एवढे प्रकल्प हाती घेतले पण एकही मार्गी लागु शकला नाही . कामाची ईच्छा आपली आहे

सर्व करण्याचा आपला मानस आहे. परंतू निधिच्या अनुपलब्धते मुळे आपण ते करू शकत नाही त्यामुळे आपण याच्याबाबतीमध्ये वास्तविकतेचे धोरण स्विकारणे योग्य राहील. आणि याच्यामध्ये आपण म्हंटल्याप्रमाणे प्रशासनाचे उद्दीष्ठ हे १०० टक्के प्रमाणेच असणार आहे.

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** सर काही प्रभागांमध्ये वसुली व्यवस्थित होतेय . फक्त सोईसुविधांचा अभाव आहे म्हणजे प्रभाग समिती ४ , प्रभाग समिती ३ असे काही प्रभाग आहेत की तिथे लाईन लागलेल्या असतात पण काहीतरी आपली कमतरता असते कर्मचाऱ्यांची म्हणा ज्यावेळी सोईसुविधा लागतात त्यावेळेला त्या आपण उपलब्ध करून द्याव्यात . ते पण आपल्याला सोईस्कर होईल.

**मा.आयुक्त :-** आता काही ठिकाणी आपण देत असलेल्या नागरी सुविधा हे आता हातात हात घालुन पुढे जाणार आहे हे एक दुष्टचक्र आहे हे याच्यासाठी काही विशेष सर्कल आपल्याला हे कराव लागणार आहे. एका बाजुला नागरीक तक्रार करतात की आम्हाला सुविधा मिळत नाही आणि तुम्ही टॅक्स भरायला म्हणतात दुसरी आपली अडचण अशी असते महानगरपालिकेची की आपल्याला उत्पन्न कमी असल्यामुळे आपण नागरीकांना सुविधा देवु शकत नाही . त्यामुळे हे दुष्टचक्र आपल्याला तोडुन आणि अधिक नागरी सुविधा आणि अधिक प्रमाणात टॅक्सची वसुली हे आपल्याला अंवलंबाव लागेल. आता हळुहळु आपल्या कर्जाचा बोझा कमी होईल.साधारण या कालावधी मध्ये आता आपण वाढ करतोय स्वत:च्या उत्पन्नामध्ये वाढ करतोय मला खात्री आहे की या कालावधी मध्ये आपण आत्ताच्या पेक्षा अधिक चांगल्या पध्दतीने नागरीकांना सेवा देवु शकु. जेणेकरून नागरीक सुध्दा स्वखुशीने आपल्याकडे टॅक्स भरायला आकर्षित होतील आणि या दोन्हींमधुन आणि त्यांच समाधान जर झालं तर नागरीक अगदी निश्चितपणे टॅक्स भरतील आणि आपलं टॅक्स वसुलीचे प्रमाण वाढेल त्यामुळे नागरी सुविधा ज्याप्रकारे चांगल्या पध्दतीने प्रशासन ज्या पध्दतीने आपण चालवायचा प्रयत्न करू. जेणेकरून नागरीकांचे समाधान आपल्याला वाढवता येईल त्यांची समाधानाची पातळी वाढली तेव्हा त्याच्या वसुलीची पातळी सुध्दा निश्चित पणे वाढेल .

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** सर पेज नंबर ९ वर अजुन एक आहे गाळेभाडे नुकसान भरपाई साहेब येथे १६० कोटींची तरतूद केलेली आहे. ती वाढवुन २८३.९५ कोटी आहे. आमचे म्हणणे हे आहे की २८३.९५ कोटी आहे तर हे १६० कोटी का म्हणुन दाखवली आहे तर त्याकरीता आमची मागणी आहे त्याची तरतूद २६० कोटींची करण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** आता आपली सुचना एकदम रास्त आहे. परंतू आता जे स्पष्टीकरण आता दिलं ते यालाही लागू होत. आता या गाळयांचा विषय सर्व सन्मा.सदस्यांना याची पार्श्वभुमि माहिती आहे. गेल्या ८ ते ९ वर्षापासुन हा विषय या ना त्या कारणांमुळे गळयात पडलेला आहे. आता तो याच्यामध्ये ऑब्सटॅक्ल येई ना. आपण त्याच्या मध्ये मार्ग बघतोय अजुनही काही मार्ग याच्यामध्ये आहेत का त्यांचे काही आक्षेप आहेत , मागण्या आहेत. काही याच्याबाबत शासन स्तरावर अजुन त्याच्यामध्ये कुठेतरी कायद्याच्या बाबतीमध्ये कुठेकाही सवलत मिळवता येते का असे प्रयत्न चालु आहेत . आज जी काही आपण त्याच्यामध्ये दिलेली आहे. जे राज्य शासनाने २०१९ मध्ये केलेले जे नियम आहेत.त्याप्रमाणे आपण ही नुकसान भरपाई वसुल करणं आवश्यक आहे.हे गृहीत धरून आपण त्याच्यामध्ये आकारणी केलेली आहे. आता याच्यामध्ये आपण २०१४ मध्ये काय केले होते की त्यावेळेच्या महासभेच्या ठरावा प्रमाणे येणेरकमेच्या म्हणजे त्या वर्षाच्या भाडयाच्या वर आपण शास्ती म्हणजे दंडाची त्या वर्षी आपण आकारणी केलेली होती. त्याही बाबतीमध्ये आपण शास्ती कमी करावी असा ठरावही केला आहे तो आपण राज्य शासनाकडे पाठविलेला आहे मार्गदर्शनासाठी पाठविलेले आहे अजुन राज्य शासनाकडून त्याचा निर्णय प्रलंबित आहे.या सगळया पार्श्वभुमिवर जी काही डिमांड आपली आहे. ती डिमांड आपल्याला वसुल करायची आहे पण किमान पुन्हा तोच प्रश्न येतो की ९ वर्षापासुन प्रलंबित प्रश्नावर १०० टक्के निर्णय किंवा १०० टक्के वसुली होईल हे करणं हे थोडसं फारच अतिआत्मविश्वासच होईल आणि म्हणुन आपण त्याच्यामधुन आपण जो वसुल होऊ शकेल अशा पध्दतीचं गणित मांडून आपण एकूण जी मागणी आहे. त्यापैकी साधारण मागच्या वर्षी ७५ कोटी काही वसुल झालेले आहेत.ती वसुल झालेली रक्कम वजा जाता या वर्षामध्ये आपली किती रक्कम वसुल होवु शकेल हे आपण लक्षात घेवुन याचा आपण अंदाज घेण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. तर या वर्षभरामध्ये जे काही गाळेधारकांचे आक्षेपार्ह विषय आहेत ते पुर्णपणे आपण गाळेधारकांचे समाधान करून याच्यातुन मार्ग काढला तर याच्यामधुन बहुतांशी रक्कम ही आपण वसुल करू शकतो.

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** पेज नंबर १३ त्याच्यातील १ ला विषय आहे खुला भुखंड मा. आयुक्त साहेबांनी तरतूद केलेली आहे ८ कोटी मुळात मागणी आहे ३९.७१ कोटींची त्यात ८ कोटींची वाढ करून एकूण १६ कोटी तरतूद

करण्यात यावी. काय आहे साहेब आपण घरपट्टी आणि खुला भुखंड घरपट्टी ही प्रभाग समिती मधुन वसुल होते , खुला भुखंड विभाग महापालिकेत आहे. हे दोन वेगवेगळे खुला भुखंड आणि घरपट्टी हे दोन्ही वेगवेगळे ठिकाणी वसुल न होता एक ठिकाणी असावे अशी आमची मागणी आहे आणि प्रभाग अधिकाऱ्यांना तिथे माहिती असतं की त्यांना घर माहिती असतात, प्लॉट माहिती असतात, त्यांच्याकडे पण मोबाईल असतो , त्यांच्याकडेपण डाटा असतो आणि त्यांना ते करायचे सोईच होईल.

**मा.आयुक्त :-** आपण आता ही जी मागणी केलेली आहे.

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** मी मागच्या वेळेला सुचना नाही केलेली पण मी मागणी केलेली होती. आणि त्यांनी हे पण केलेले होते की, प्रभाग समिती यांना आपण मिनी महानगरपालिका असे द्यावे. त्यांना जर ही जबाबदारी दिली. तर हे योग्य राहिल आणि १७ मजलीला जो येणारा ताण आहे. तो आपोआपच कमी होणार आहे. आणि त्या निमित्ताने प्रभाग समितीला जे काम केल जाईल तो सोईस्कर होईल म्हणजे तिथला ताण कमी होईल म्हणजे जी गुणवत्ता म्हणतो आपण ती गुणवत्ता आपल्याला कामातुन दिसुन येईल. आमची मागणी अशी आहे की प्रत्येक प्रभाग समितीला मिनी महानगरपालिकेचा दर्जा देण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** ताई निश्चितच मागच्याही मा.माजी स्थायी समिती सभापती यांनी अशीच सुचना केलेली होती आणि बहुतांश सभासभांदाचे हेच मत आहे की छोट्या छोट्या कामाकरीता नागरीकांना आपल्या मुख्य प्रशासकीय कामाकरीता येण्याची गरज भासु नये. त्या दृष्टीने आपले जे प्रभाग आहेत ते प्रभाग समिती कार्यालय अधिक सक्षम व्हावेत. आता या बजेटचे सादरीकरण ज्यावेळेला मी केलेलं होत त्यावेळेला याबाबत मी मुद्दा मा.सभागृहाच्या समोर मांडलेला होता की खुला भुखंड कर विभाग आपण स्वतंत्र केला होता तो ज्या हेतूने केलेला होता त्याचा तो हेतू काही साध्य झालेला दिसत नाही. तर त्यामुळे आता आपण हा खुला भुखंड विभाग हा स्वतंत्र न करता ज्या ज्या प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये जे खुले भुखंड आहेत. त्यांच्या अखत्यारित ही वसुली होईल आणि ही दोन्ही कामे आता प्रभाग अधिकाऱ्यांच्या अधिकारात प्रशासकीय आदेशाने देणार आहोत.त्यामुळे आपण म्हणताहेत की आपण ऑलरेडी या वर्षापासुन म्हणजे १ एप्रिल पासुन म्हणजे उद्यापासुन आपण ते करतो आहोत.त्याच्या सुचना ऑलरेडी दिलेल्या आहेत. आता त्याचे जे रजिष्टरर्स आहेत ते ज्या ज्या क्षेत्राच्या त्या त्या एरियाच्या प्रभाग समितीला आपण दिलेले आहेत.तर याच्यामध्ये आपली जी सुचना आहे आपण ३९ कोटींची मागणी आहे आणि आपण ८ च कोटींचे हे धरतोय आत्तापर्यंतच जर आपण खुला भुखंडांचे आपण वसुली बघितली तर दिड ते दोन कोटींपेक्षा जास्त वसुल होवू शकत नाही. तर हि परिस्थिती आहे आता तीचा बजेटचा आढावा घेतला असता खुला भुखंडाच्या अधिक्षकांकडून तर त्याच्यामध्ये अशा काही गोष्टी लक्षात आल्या की आपण त्या खुला भुखंड धारकाच्या जागांना आपले बिले ही गेले नाही. ज्यांना बिले गेलेली नाही. ज्यांची आपण बिले काढली, खुला भुखंडाची मालकी कोणाची आहे माहित नाही. नंतर कोणाची विक्री झालेली आहे, हस्तांतरण झाल असेल, महानगरपालिकेला माहित नाही बिले कोणाला द्यायचे असा ही प्रश्न आहे. जागेवर तो प्लॉट धारक राहत नाही, तर बिल कोणाला बजवायचे. महत्वाचा एक मुद्दा जो माझ्या निदर्शनात आला तो असा आहे. खुला भुखंडाची आकारणी आपण जेव्हा खुला भुखंड आकारणी नोंदत आहे. त्याच्यानंतर कधीही आपण त्याचा आढावा घेतलेला नाही की, नविन वर्ष सुरु झाल्यानंतर तो भुखंड आज ही खुला आहे की, त्याच्यावर लोकांनी बांधकामे केलेली आहे. बऱ्याच ठिकाणी अस निदर्शनात येते की, खुला भुखंडाची आकारणी केव्हा तरी ११ वर्षापुर्वी झालेली आहे. मध्य काळामध्ये त्यानी रितसर परवानगी घेऊन बांधकाम केले, बांधकाम केल्यानंतर त्याला त्या घरावरची टॅक्सची आकारणीही झाली.परंतू काही नागरीकांनी आपल्याला त्याचा अर्ज दिला नाही किंवा प्रभाग समितीलाही कळविले नाही. किंवा तो खुला भुखंड विभागाने स्वत: तशी माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला नाही. हा जर प्लॉट बांधला गेला असेल तर प्रभाग समिती कडुन आकारणी झालेली असते घरपट्टीची तर पुन्हा खुला भुखंडाची आकारणी करणं म्हणजे आपल्या रजिष्टरमधील नोंद कमी करणं हे गरजेचं आहे. आता आपल्याला याचा पुन्हा आढावा घ्यावा लागणार आहे.आता तो आपण प्रभाग समितीच्या अंतर्गत देवुया. मला खात्री आहे की आपण याची ३९ कोटी रूपयांची जी डिमांड आहे. ती आपल्याला पुन्हा तपासणी अंती ती पाहुन घ्यावी लागणार आहे आणि ती एकदाची करेक्ट झाली तर मग आजची जी पोजीशन आहे ती आपल्याला शोधुन घ्यावी लागणार आहे. परंतू आपण मागच्या वर्षी जो सर्वे करून घेतलेला आहे. त्याच्यामध्ये आपण खुला भुखंडांची माहीती गोळा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. बऱ्यापैकी आपल्याला काही माहिती उपलब्ध झालेली आहे.तेव्हा आजचे जर आपण काढले तर त्याला आपल्याला त्याची मागणी करता येईल. मला खात्री आहे की ३९ कोटींची मागणी आपल्याला करेक्ट केल्यानंतर आणि त्यांच्या पर्यंत आपली बिलं जर त्यांच्या पर्यंत पोहोचली प्रभाग समितीच्या मार्फत तर आपल्याला याही

वसुलीमधुन चांगले उत्पन्न आहे.तर आत्तापर्यंतची जी आपली दिड दोन कोटी रुपयांपर्यंतची जी वसुली आहे. ती आपण चौपट त्याच्यामध्ये वाढ दाखविलेली आहे. म्हणजे एकतर ३९ कोटींच्या डिमांड विषयी आपली खात्री नाहीये. म्हणजे ती ३९ कोटी आहे की कमी आहे. ती जी काही निश्चित होईल तर त्याच्यामध्ये नियमित वसुली जी अनेक वर्षांपासुन भरलेली नाहीत आणि आता जर आपण बघितलं तर खुला भुखंडांची वसुली दोनच कारणांसाठी होते. एक म्हणजे तो मालक बायर ला विकतो त्यावेळेला त्याला ती पावती लागते म्हणुन ते पैसे भरतात किंवा बांधकाम परवानगी घ्यायची असेल तेव्हा आपले नगररचना विभाग त्याला ते पैसे भरल्याशिवाय त्याला बांधकाम परवानगी देत नाहीत.त्यामुळे या दोनच वेळेला वसुली होते. आपली रक्कम स्वत:हुन नागरीकांनी भरण आणि आपल्या कर्मचाऱ्यांनी स्वत:हुन त्याचा पाठपुरावा करून त्याच्याकडुन वसुली करणं या दोन्ही गोष्टी सध्या मान्य आहेत. त्यामुळे दोन्ही गोष्टींमुळे वसुलीची आकडेवारी कमी दिसेल. परंतू आपल्याला पुढच्या काळामध्ये खुला भुखंडाची मागणी निश्चित करणं, त्यांचे ओनर निश्चित करणं , त्यांच्यापर्यंत बिलं पोहोचवणं आणि जशी आपण रेग्युरल घरपट्टीची आकारणी करतो , तशा पध्दतीनं पाठपुरावा करून वसुल करणं म्हणुनच ही मागणी आपण मागच्या वर्षीच्या तुलनेमध्ये चौपटीने वाढवुन दिलेली आहे. म्हणजे दोन कोटींची आठ कोटींमध्ये जाणं हि सुध्दा खुप मोठी जबाबदारी आहे. पण मग याच्यामध्ये आपले प्रभाग अधिकारी काहीतरी करू शकतील आणि याच्यामध्ये सुध्दा आपल्याला टप्प्या टप्प्यांने वसुली वाढवावी लागेल.

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** साहेब याच्यापुढे प्रभाग समिती कडुन प्रभावी वसुली करावी.

**मा.आयुक्त :-** आता आपण खुला भुखंड विभाग स्वतंत्र न ठेवता प्रत्येक प्रभाग समितीमध्ये आपण ते मर्ज करणार आहोत.

**मा. सभापती :-** साहेब म्हणजे आता आपली जी डिमांड आहे ३९.७१ कोटी ही आपली मागणी आहे आणि आपण अपेक्षित धरले आहे ८ कोटी ही फक्त २० टक्के अपेक्षित धरली आहे. मला तरी वाटते की ८० टक्के लोकांचे घर बनले असतील.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे ८० टक्के लोकांनी घर बांधले असतील याची तपासणी केल्याशिवाय कळणार नाही, परंतू एकदा डिमांड निश्चित झाली आणि त्याचे ओनर चेअरमन साहेब याच्यात दोन गोष्टी आहेत. डिमांड निश्चित करणे म्हणजे काय खुला भुखंड रजिष्टरला आमची मागणी आहे ते आपल्याकडुन अपडेट झाले नाही . काही वर्षापुर्वी समजा एक प्लॉट आहे त्यावर माझं नांव लागलं नंतर मी तो तुम्हाला विकला आणि तुमचे नांव त्या ठिकाणी नोंद नाही . हा सगळा तपास आपल्याला करावा लागेल.

**मा. सभापती :-** हे झाले आपल्याकडे डिमांड असलेले भुखंड , परत काही नवीन लेआऊट आहेत की ज्यांची नोंदच आपल्याकडे नाहीये.त्यांना मागणी बिल दिली गेलेली नाहीत.आता ३९ कोटींच्यावर आपली मागणी वाढु शकते , तर आपण त्याच्यामध्ये लक्ष घातले पाहीजे. हे जे लेआऊट धारक असतील त्या लेआऊट धारकांना आपली मागणी बिलं पाठविली गेली पाहीजे , तर घरपट्टी साठी जसे प्रयत्न होतात तसे मला वाटते की प्रशासनाकडून प्रयत्न व्हायला पाहीजे व त्याची जास्तीत जास्त वसुली झाली पाहीजे.

**मा. आयुक्त :-** होय मी तुम्हाला आता तेच म्हंटले की घरपट्टीची वसुली आपण ज्या पध्दतीने करतो त्याप्रमाणे खुला भुखंड कराची वसुली आपल्याला करावी लागेल. या सगळया गोष्टी आपल्याला करावी लागतील . याच्याबाबत मागच्या वर्षी जो स्थापत्य कंन्स्लंटंन्सी कडून सर्वे केला त्याच्यामध्ये जे नविन लेआऊट मंजुर झालेले आहेत. त्यासुध्दा आपण सगळया नोंदी आलेल्या आहेत. फक्त आपल्याला त्याचे दर आपल्याला निश्चित करणं आवश्यक आहे. जर आपल्याला असे लक्षात आले की आपल्याला या सगळया प्रशासकीय कार्यवाही नंतर आपल्याला खुला भुखंडामधुन मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळु शकणार आहे. अशामध्ये ज्यावेळेला नोव्हेंबर/ डिसेंबर मध्ये ज्यावेळेला आपण त्या वर्षाचे बजेट सुधारीत करतो त्यावेळेला सुधारीत उत्पन्नाची आकडेवारीत आपण बदल करू शकतो , पण आजच आपण उत्पन्न वाढवुन करणं आणि त्याच्यानुसार खर्चाला आपण सुरूवात करणं हे थोडसं आर्थिक स्थितीला धरून होणार नाही, आपण सुधारीत बजेट करतो ते त्यासाठीच आहे की १२ महिन्याच्या सुरूवातीला आपण एक गोष्ट आधारीत केलेली असते प्रत्यक्ष आपण त्याचा विचार करतो मग आपण त्याच्यामध्ये वाढ करू शकतो आणि मग म्हणुनच त्याच्यामध्ये आपण डिसेंबर मध्ये सुधारीत बजेट करतो , ही सगळी आपल्याला संधी मिळते जर आपल्याला असं वाटतं की याच्यामध्ये वाढ होणार आहे. किंवा मग आपल्याला खर्चाला काही जादा रक्कम उपलब्ध होवू शकते तर ते आपण डिसेंबर मध्ये करू शकतो आणि मग डिसेंबर नंतर उरलेल्या तिन महिन्यांमध्ये आपल्याला जी वाढीव रक्कम , उत्पन्न जे मिळणार आहे ती रक्कम खर्चाला उपलब्ध होवू शकते , आपल्या कायद्यामध्ये अशीही तरतूद आहे . ३१ मार्च पर्यंत मागच्या वर्षी काही खर्च होत नसेल , परंतू तरतूद शिल्लक राहात असेल तर

मा.स्थायी समिती त्याला पुढच्या तिन महिन्याच्या स्पिलओव्हरला मान्यता देवु शकते , आपल्याकडे तशी पध्दत नाहीये पण आपल्याला तसे जर उत्पन्न आपल्याला मिळत असेल तर आपण मा.स्थायी समितीची मान्यता घेवुन या वर्षीचे बजेट जे ३१ मार्चला संपत असते तर ३० जुन पर्यंत आपण त्याचा कालावधी वाढवु शकतो जे शासनामध्ये केले जातं शासन सुध्दा त्याला स्पिड ओवर म्हणते , त्यामुळे आपण त्याला मान्यता देवु शकतो परंतु ही संधी आपल्याला सुधारीत बजेटच्या वेळेला मिळू शकते .

**मा. सभापती :-** म्हणजे डिसेंबर महिन्यात .

**मा. आयुक्त :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ॲक्च्युअल डिमांड किती गृहीत धरताहेत, अंदाज आपण कुठला मंजुर करतोय.

**मा. सभापती :-** कस आहे भाऊ ते ३९.७१ कोटी धरायला पाहीजे परंतू आपण कमीत कमी निम्मे रक्कम तरी वसुल व्हायला पाहीजे तर तशी आपण ही तरतूद करतोय

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे कस आहे की त्या गोष्टीचं , जसे घरपट्टीचे उत्पन्न ९७ कोटी आपण बोललात की आपण अपेक्षित धरतोय आणि प्रशासनाने ७५ कोटींची तरतूद दर्शविलेली आहे.तर नेमकं आता याच्यात निश्चित कोणतं होणार आहे.

**मा. सभापती :-** निश्चित म्हणजे आपण आता जी तरतूद करतोय ती निश्चित होणार आहे .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , प्रशासनाला मला विचारायचे आहे. महसुल खाते कलेक्टर ऑफीस आता आपण खुला भुखंडांचे बिल देतो ते कोणाच्या नावावर असत किंवा नसत माझ्या माहितीनुसार आता सरकारने एक जिआर पास केलाय आपण जे खरेदी खत करतो , तर आपल्या नगरपालिकेच्या परवानगी शिवाय त्यांना खरेदी करता येत नाही आपण जर तसे केले तर वसुली पण होवु शकते . तर त्याचा पाठपुरावा तुम्ही करावा. कारण महसुल खात्याशी जर आपला कॉन्टॅक्ट झाला तर व्यवस्थित होईल वरतून जिआर आहे तो की आपली घरपट्टी असो किंवा भुखंड असो तर तो क्लिअर झाल्याशिवाय खरेदीखत नोंदता येत नाही. त्यात आपली मागची पण वसुली होवु शकते, तर आपण महसुल खात्याशी बोलुन लक्ष द्यावे.

**श्री.अमित काळे :-** पेज नं.२० अ.क्रं १२ नविन ईलेक्ट्रीक पोल उभारण्यासाठी आयुक्त साहेबांनी अंदाजे ६० लाख

**मा. सभापती :-** सर्व सदस्यांना विनंती आहे की आपला अर्थसंकल्प जो आहे यावर पेज नंबर २० ओपन करायचे आहे त्यातला अ.क्रं. १२ बाबत अमित भाऊ काळे आपल्याला सांगतील.

**श्री.अमित काळे :-** नविन ईलेक्ट्रीक पोल उभारण्यासाठी अंदाजे आयुक्त साहेबांनी अंदाजे ६० लाख मंजुर केलेले आहेत. पण जळगांव शहरामध्ये आपल्या सर्वांना माहिती आहे की, परिस्थिती काय आहे. नाशिक, पुणे प्रमाणे दर्जेदार रस्ते झाले पाहीजे दुसरे असे मला म्हणायचे आहे साहेब की क्राईम वाढलेले आहेत जळगांव शहरामध्ये आज मी नगरसेवक आहे वॉर्ड क्रं. ६ मध्ये १० पोलची मागणी करत आहेत. पण आजपर्यंत जे कोणी अधिकारी असतील. माझ्या वॉर्डामध्ये १० तर सोडुन द्या एक पोल सुध्दा आणु शकले नाहीत. ही परिस्थिती आहे जळगांव शहराची , इतकी वाईट आहे. तर मला असे वाटते की प्रभाग समिती वाईज जर डिव्हाईड केले तरच हे शक्य होईल. कारण जे जबाबदार अधिकारी असतील त्यांच्यावर जबाबदारी द्यावी. हे सगळं डिव्हाईड केल्याशिवाय आपला हा पश्न सुटणार नाही . म्हणुन प्रभाग समिती १ मध्ये २० लाख आणि २ , ३ व४ मध्ये प्रत्येकी १३ लाख किंवा १२ लाख वाटप करावी ही माझी मागणी आहे.

**मा. सभापती :-** सदरच्या अंदाजपत्रका मध्ये आपली जी संकल्पना आहे.प्रभाग समिती सक्षमीकरण तर त्या अंतर्गत आपण प्रत्येक प्रभागासाठी वेगवेगळी तरतूद प्रशासनाने केलेली नव्हती, परंतू सदस्यांनी याच्यामध्ये प्रत्येक प्रभाग समिती निहाय तरतूद करावी अशी मागणी केलेली आहे. त्यानुसार प्रभाग क्रं. १ साठी अमित भाऊ तुम्ही सांगा.

**श्री.अमित काळे :-** प्रभाग क्रं. १ साठी २० लाख रू. व प्रभाग क्रं. २, ३ आणि ४ साठी १२ लाख रूपये हे ईलेक्ट्रीक पोल साठी करण्यात यावी. तसेच पेज नं.२० वर लाईट व्यवस्था व दुरूस्ती साठी आता बरेच म्हणजे उपमहापौरांचे दौरे झाले होते, व्हिजीट दिल्या होत्या तेव्हा त्यांनी परिस्थिती बघितली होती , अजुनपण आजच्या एलईडी च्या जमान्यात जुने लाईटस लावलेले आहेत आणि ते त्यांच्यामुळे लाईट बिल वाढते म्हणुन मला असे वाटते की जसे गार्डन मध्ये किंवा इतर ठिकाणी जुने लाईट लावलेले आहेत. त्यासाठी लाईट चेंज करणे गरजेचे आहे.तर प्रत्येक समिती वाईज ३५ लाख रूपये म्हणजे प्रभाग समिती १ मध्ये ३५ लाख रूपये आणि प्रभाग समिती २,३ व ४ मध्ये १३ लाखाप्रमाणे तरतूद करण्यात यावी.

**मा. सभापती :-** अमितभाऊंचे म्हणणे असे आहे की , प्रभाग समिती क्रं. १ साठी ३५ लाखांची तरतूद करावी . तसेच प्रभाग समिती क्रं. २, ३ व ४ या तिन्ही समित्यांसाठी प्रत्येकी १३ लाखांची तरतूद करण्यात यावी.

**श्री.अमित काळे :-** अंदाज हे २५ लाख दाखविलेला आहे आयुक्त साहेबांनी तो बराच कमी आहे असे मला वाटते आहे. त्याच्यात सही पण होणार आहे महानगरपालिकेसाठी, आता पेज नं. २१ वर अ.क्रं. २७ वर १० लाख रू. आयुक्त साहेबांनी दाखविलेले आहे. पण आपले जे सिग्नल्स आहेत कुठेच चालु नाहीयेत , अजिंठा चौफुली वर पाहीले तर एक एक तास ट्रॅफीक जाम असते. तर लवकरात लवकर सिग्नल्स हे अपडेट केले पाहीजे. तरी साधारण त्याचा खर्च १ कोटी पर्यंत जाईल आणि मला असे वाटते की हे जे १० लाख केले आहे या १० लाखमध्ये काहीच होणार नाही.

**मा. सभापती :-** १ कोटींची तरतूद करण्यात यावी.

**श्री.अमित काळे :-** पेज नं. २१ वर अ.क्रं. ३० सोलर पॅनल साठी आयुक्त साहेबांनी २० लाख रूपये अंदाजे सांगीतलेले आहेत. पण मी म्हणतो की आपण ते २ कोटी केले पाहीजे. आता आपल्या सगळया इमारती चालु झालेल्या आहेत . तर आपल्याला बरेच लाईट बिल येत आहे. आज आपल्याला बँक सुध्दा याच्यासाठी सबसिडी देते आणि १०० टक्के फायनान्स करते . तर आपण ते जर लाईट बिल भरता आहे ईलेक्ट्रीसिटीचे एमएसईबीला ते पैसे आपण ईकडे सबसिडी मध्ये मायनस करून तो हप्ता भरला तर नक्कीच सेविंग होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा .सभापती महोदय , आता लाईट विभागाविषयी सन्मा सदस्य. अमितभाऊ काळेंनी सांगीतले तसे होईल तर ती तरतूद कमी आहे.ती मान्य करायला पाहीजे. परंतू ईलेक्ट्रीक विभाग हा आपला प्रशासकीय इमारती मधुनच चालतो . म्हणजे प्रभाग समित्यांच्या माध्यमातुन आपण हे ईलेक्ट्रीकल काम वितरीत करीत नाहीत किंवा त्यासंबंधीचे कायादेश देत नाहीत. विद्युत विभाग हा महानगरपालिकेचा स्वतंत्र विभाग आहे.परंतू स्वतंत्र विभाग असला तरी दर्शविण्यात आलेली तरतूद १० लक्ष रू. ही मला वाटतं एकदम तोकडी आहे. ती प्रभाग समित्यांमध्ये न दर्शविता संपुर्ण जी तरतूद आहे १० लाख रुपयांची ती एकत्रित रित्या वाढवुन घेण्यात यावी. म्हणजे ती वस्तुस्थिती आहे. नाहीतर प्रभाग समित्यांकडे ईलेक्ट्रिकल चा काही तसा विषय नसतो. कारण सेंट्रलाईज असल्याकारणाने विद्युत विभागाच्या अंतर्गत संपुर्ण जो निर्णय आहे त्याच कार्यालयातुन घेतले जातात. तर मला वाटतं की संयुक्तिक रास्त हाईल.तर त्या दृष्टीकोनातुन विचार करावा. ट्रॅफीक सिग्नलच्या बाबतीत जी १० लाखांची तरतूद आहे. ती सुध्दा तोकडी वाटते . कारण बऱ्याच ठिकाणी जी सिग्नल व्यवस्था आहे.या वेळी बंद किंवा नादुरूस्त अवस्थेत आहे आणि साधारणत: त्याची तरतूद जर दुप्पट केली आता १ कोटी सांगीतली तर मला वाटत ती १ कोटी जास्त होईल. तर ती एक संयुक्तीक रित्या साधारणत: १० च्या ऐवजी २५ लक्ष रूपये केली तरी ती योग्य होईल.

**मा. सभापती :-** कोणती तरतूद

**श्री.नितीन लढ्ढा :-** सिग्नल व्यवस्था , म्हणजे जुने सिग्नल काढुन नविन बसविणे, म्हणजे मेंटेन करणेसाठी

**मा. सभापती :-** म्हणजे २५ लाख करायची असे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो २५ लक्ष करणे, म्हणजे संपुर्ण व्यवस्थाच बदलवायची आहे असे नाहीये, सिग्नल व्यवस्था आपली जवळपास सगळीकडे चालु आहे, परंतू काही ठिकाणी जे आहे.

**मा. सभापती :-** काही ठिकाणी फक्त दुरूस्त्या कराव्या लागतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो फक्त मेंटेंनन्सचाच भाग आहे.

**मा. सभापती :-** फक्त हायवेला ज्या ठिकाणी पुल झाले आहेत त्या ठिकाणी सिग्नल व्यवस्था ही नविन करावी लागणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो अंडरपासच्या ठिकाणी

**मा. सभापती :-** मग त्याच्याकरीता २५ लाख खुप कमी होतील अंडरपास जे आहेत तिथे नविन सिग्नल व्यवस्था करावी लागेल .

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो बरोबर आहे पण आपण आता पुढचे भविष्य म्हणजे सुधारीत अर्थसंकल्प होईल तेव्हा करूया.

**मा. सभापती :-** जर समजा झाले तर मग आज तरतूद पाहीजे.नाहीतर मग तरतूदीमुळे कामे होणार नाहीत असेही होवू शकते तरतूद नसल्यामुळे

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे आपण म्हणता तशी करू शकतात , सन्मा.सभापती साहेब आता सुरूवातीला उज्वलाताई बेंडाळे यांनी चर्चा केली. त्यांनी जी चर्चा केली त्यांच्या जागी ती योग्य आहे.आयुक्तांनी त्यांचे दिलेले स्टेंटमेंट दिलेले आहे ते त्यांच्या जागी योग्य आहे.परंतू दोघांच्या भुमिका योग्य असल्या तरी व्यवस्थेतील दोष हे

दुर कसे होणार. आज जरी समजा भारतीय जनता पक्षाच सत्तांतर होवुन हा तिसरा अर्थसंकल्प या सभागृहात मांडला जातोय. या विषयाच्या संदर्भात वसुलीचे उद्दीष्ट ही सातत्याने या विषयावर चर्चा होते आणि या चर्चेमध्ये सदस्यांच्या भावना आणि सदस्यांची भुमिका ती सुध्दा तीच कायम असते आणि प्रशासनाकडील उत्तर सुध्दा तेच कायम असतं. जर कधी १०० टक्के डिमांड आपण गेस (Guess) करतोय आणि ती डिमांड काही कारणाने अयोग्य असेल तर मग ती डिमांड वास्तववादी डिमांड काय आहे ती निश्चित होवुन ज्या काही त्याच्यामध्ये त्रुटी असतील किंवा डिस्पुटेड असतील तर ते कमीत कमी निर्लेखित होणे गरजेचे असते . परंतू निर्लेखित होण्याच्या दृष्टीकोनातुन कुठलेही प्रयत्न होत नाहीत. जी डिमांड आहे ती १०० टक्के वसुल करण्याच्या दृष्टीकोनातुन प्रयत्न करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे आजही जर कधी वसुली चे आकडे बघितले तर निराशाजनकच आहेत.म्हणजे आपले मागच्या वर्षीचे उद्दष्ट ४० कोटींचे होते आणि आज आपण साधारण ४९ समथिंग काहीतरी पाईट पर्यंत पाहोचलेलो आहेत.ती झाली ४० वरून ४९ वर आलो ती आजच्या वेळी समाधानाची बाब असली तरी अर्थसंकल्पाच्या उद्दीष्टाच्या दृष्टीकोनातुन याबाबीचे समर्थन कदापी करू शकत नाही. कारण शेवटी वास्तववादी जसे आपण म्हणतात तीही गोष्ट तेवढी खरी आहे. ज्यावेळेला आपण ज्या डिमांडची आपण अर्थसंकल्पात दर्शवतो आणि ती मान्य केल्यानंतर त्या अर्थसंकल्पातील डिमांडच्या अनुषंगाने आपण खर्च हा दर्शवित असतो म्हणजे काय होत की एखादा फुगीर बजेट असतो . आणि त्याच्यातील वास्तव असतं की १०० टक्के वसुली होत नाही आणि त्यामुळे १०० टक्के विकास होत नाही. म्हणजे काय होत की या शहरातील जनतेची कुठेतरी दिशाभुल करतो तशा प्रकारचे चित्र होते. कारण येणारा पैसा आणि ज्यावेळेला त्याच्याअनुषंगाने खर्च आपण दाखवत असतो. जसे रस्त्यांवर १०० कोटी खर्च करू . आपण गटारींवर ५० कोटी खर्च करू, आपण पथदिव्यांच्या वर २५ कोटी खर्च करू. परंतू डिमांडच पुर्ण होत नाही. पैसा वसुल होत नाही तर नागरीकांना अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने दिलेली अश्वासने असतात ती सुध्दा फोल ठरतात. आणि यामुळे या संपुर्ण व्यवस्थेवरील सामान्य नागरीकांचा विश्वास उठत जातो. तर याला कुठेतरी पायबंद घालणं गरजेचं आहे.आपण बघतो की या डिमांड वसुल करण्याच्या संदर्भातही तसे बघितले तर प्रशासन खुप मोठे प्रयत्न करतं असे नाहीये. ज्या आपण सवलती देतो . एप्रिल महिन्यापर्यंत त्या सवलतींच्या अनुषंगाने जी प्रामाणिक कर दाता मंडळी आहे. ती त्या सवलतीचा लाभ घेण्याच्या दृष्टीकोनातुन तो कराचा भरणा करतो आणि या ४० कोटीतील जर कधी भरणा बघितला तर २० कोटी भरणा हा फक्त सवलतीच्या अनुषंगाने त्या कालावधीमध्ये झालेला असतो. परंतू उर्वरित कालावधीमध्ये तो पैसा वसुल करण्याच्या संदर्भात प्रशासनाकडुन तसे फारसे प्रयत्न होतांना दिसुन येत नाहीत.या गोष्टी कुठेतरी जोपर्यंत बदलणार नाही . तोपर्यंत पाहीले तर या अर्थसंकल्पाला कुठलाच अर्थ राहात नाही. प्रत्येक अर्थसंकल्पात हिच चर्चा होते . मोठी मोठी आश्वासने आपण देतो . परंतू शहराची परिस्थिती बघितली तर भकास झालेली आहे ती भकासच दिसतेय. आज मला सांगा महानगरपालिकेच्या कोट्यावधी रूपयांच्या मिळकती आहेत. अनेक वेळा मी दहा सभांमध्ये बोलुन थकलोय . की जश्या त्या घरकुलच्या जागा भुसंपादन झाल्यानंतर १०० टक्के मोबदला दिला गेला जागामालकाला वाढीव मोबदला सुध्दा दिला गेला,कोट्यवधी रूपयांचा मोबदला दिला गेलाय , परंतू जागामालकाच्या ताब्यात असलेला काही हिस्सा तो अजुनपर्यंत दहा सभांमध्ये बोलल्यानंतरही प्रशासनाकडून आजपर्यंत त्याच्यावर कुठलीही हालचाल होत नाही. मग मला सांगा या कोट्यावधी रूपयांच्या मालमत्ता अशाच पध्दतीने बेकायदेशीर रित्या बळकावुन जर का नागरीक वापरत असतील आणि त्या कोट्यावधी रूपयांच्या मालमत्तेपासुन महानगरपालिकेला कुठलेही उत्पन्न मिळु शकत नसेल. तर मला वाटत नाही की फक्त घरपट्टी , नळपट्टी आणि खुला भुखंड याच्यावर या शहराचा विकास साध्य केला जाईल अशी परिस्थिती नाहीये. कारण हे जे उत्पन्न आहे दोघाही विभागाचे हे अत्यंत तोकडे आहे. आज काय होतेय की आज आपण जे डेव्हलपमेंट या शहरामध्ये करतोय त्या केवळ शासनाच्या निधीवरच करतोय. जोपर्यंत महानगरपालिका स्वत: आर्थिक सक्षम होणार नाही. तोपर्यंत अशा अर्थसंकल्पांवर चर्चा करूनही उपयोग होणार नाही. आज मला सांगा साहेब कोट्यावधी रूपयांची घरकुलची जी मालमत्ता आहे.घरकुलांचे स्ट्रक्चर आहे त्या अवस्थेत पडलेले आहेत. शेकडो म्हशी तिथे बांधल्या जाताहेत. मोक्याची जागा आहे. कुठल्या पध्दतीने तिचा विचार केला तर तिथे कमर्शियल डेव्हलपमेंट केली जावु शकते . वेळ प्रसंगी तिला विक्री करण्याच्या संदर्भातील निर्णय जर घेतला तरी त्याच्यामधुन कोट्यावधी रूपये मिळु शकतात.जितका आज या शहराचा विकासाचा अभाव दिसतोय डोळयासमोर राज्य शासनावर अंवलबुंन राहुन राहुन किती राहणार , कारण राज्य शासनाने आपल्याला म्हंटलेले आहे.परंतू आपल्या मालमत्ता आणि आपल्या स्वत:च्या मालकीच्या आहेत आपण मालक आहोत. पुर्वी ती अपुर्णावस्थेतील घरकुल होती. ती घरकुल निवाडा झालेला

आहे. या मालमत्ता कधी बाजारभावा प्रमाणे लिलाव करून जर कधी विक्री केल्या कोट्यवधी रूपयांचे उत्पन्न त्याच्यातुन मिळु शकेल. परंतू कोट्यावधी रूपयांच्या मालमत्ता आज नागरीक बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवुन वापर करत आहेत.एक मालमत्ता मी मागच्या वेळेला प्रस्ताव दिला होता की सिंधी समाजाचे सगळे बांधव ती मालमत्ता घ्यायला सुध्दा तयार होते. अर्धवट अवस्थेतील घरकुल आहे. ते म्हणाले ॲजेएटीज अवस्थेत ती तुम्ही जाहीर लिलावा द्वारे विक्री करा. आम्ही आमच्या समाजातील गरीब बांधवांसाठी ते घरकुल आम्ही विकत घेवु आणि आम्ही आहे त्या स्थितीत दुरूस्ती करू. आज त्या जागांमध्ये जावुन बघाल. तर तिथे अनधिकृतपणे पत्ते खेळले जातात, दारू विकली जाते, अनैतिक कृत्य तिथे होतात. परंतू या महानगरपालिकेचा सुरक्षा रक्षक सुध्दा त्या जागेवर नाहीये.कारण सुरक्षा रक्षक ठेवुनही काही उपयोग नाहीये कारण त्याचा पगाराचा बोझा आपल्यावर पडतो. परंतू अशा पध्दतीच्या मालमत्तांचे कुठेतरी उपयोग करण्याच्या संदर्भात कुठेतरी या अर्थसंकल्पामध्ये विचार होणे खुप महत्वाचे होते.ख्वॉजामिया समोरची जागा कोट्यावधी रूपयांची जागा शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आहे.परंतू प्रत्येक वेळेला अर्थसंकल्प असे सादर करून आणि त्याच्यातुन तोकडे ३० ते ४० कोटी रूपयांचे उत्पन्न आपल्या हाताशी राहील आणि त्या ३० ते ४० कोटी रूपयांमध्ये या शहराचा जवळपास ५०० कोटी रूपयांचा विकास जर होत असेल तर तो कधीच पुर्ण होवु शकणार नाही आणि असाच तो असमतोल दिवसेंदिवस वाढत जाईल. म्हणजे आज या भागाचा विकास केला तर ५ वर्षांनंतर त्या भागाच्या विकासाची सुरूवात होईल. तोपर्यंत हा परिसर पुन्हा अविकसित झालेला असेल. तर या संदर्भात कुठेतरी गांभीर्याने विचार होणे गरजेचे होते. सानेगुरूजी रूग्णालयाची जागा आज मुख्य बाजारपेठेत जागा आहे.आता त्याच्यावर आरक्षण जे आहे. ते रूग्णालयाचे आरक्षण आहे. जर कधी महानगरपालिकेने गेल्या १० वर्षामध्ये त्याच्या संदर्भात विचार केला असता. एक अद्यावत रूग्णालय बांधलं असतं . तर आजची जी कोरोनाची अडचण निर्माण झाली. ती भागवली गेली असती, परंतू आता आपल्याला नाही चालवायचे आहे रूग्णालय किंवा नाही बांधायचे आहे. परंतू त्या जागा मोकळया पडलेल्या आहेत. पार्कींगसाठी आपण त्या जागेचा उपयोग करतोय. कोट्यावधी रूपयांचे कर्ज आजही डोक्यावर आहे. आजही ती जर आकडेवारी घेतली तर साधारणत: १३७ कोटी रू.च महानगरपालिकेला देण लागू आहे. मक्तेदारांसहीत , कर्मचाऱ्यांच्या ग्रज्युएटी धरून याच्यामध्ये १३७ कोटी रू याच्यामध्ये हुडकोचे ७१ कोटी रूपयांच जे आपले ग्रँट मधुन ३ कोटी रूपये वसुल केले जाताय.ती रक्कम धरली नाहीये. म्हणजे साधारण या महानगरपालिकेला २०० कोटी रूपये हे देणं बाकी आहे. विकास कामांचा दुरूपर्यंत संबंध नाहीये अजुन याच्यामध्ये हे २०० कोटी रूपये आपल्याकडे द्यायला नाहीये.विकास कामांसाठी निधी शिल्लक नाहीये.परंतू कोट्यावधी रूपयांच्या आपल्या जागा स्वमालकीच्या आहेत.पिंप्राळा हुडकोच्या तेथील जमीन आज साधारणत: तत्कालीन नगरपालिकेने ३ लाख रूपये प्रति एकर प्रमाणे ती जमीन घेतलेली होती. आज साधारण तेथे १ कोटी रूपये प्रति एकरचे भाव आहेत.परंतू तिथली जमीन अनधिकृत रित्या तिथल्याच घरकुल धारकांनी बळकावुन टाकलेली आहे. जी घर होती ती सुध्दा स्थानिक नागरीकांनी आटोक्यात घेवुन घेतलेली आहेत.सगळया प्रकारचे लोक तिथं वास्तव्य करताहेत.मग अशा परिस्थितीत मला सांगा की आपल्या हक्काचे कोट्यावधी रूपये आहेत आणि आपण भिकाऱ्यासारखे राज्य शासनाकडे हात पसरवत असतो. तर याच्याबाबतीतील कुठेतरी अर्थसंकल्पामध्ये निश्चितपणे त्याचे प्रतिबिंब दिसायला पाहीजे होते. की नुसत्या या एवढ्या रकमेवर अर्थसंकल्प सादर करून खुप काही मोठा तिर मारून घेवु अशी काही परिस्थिती नाहीये.तर या संदर्भात खुप गांभीर्याने विचार होणं गरजेच आहे. त्या कोट्यावधी रूपये किमतींच्या जागा आहेत आणि निर्विवाद आहे.सानेगुरूजी रूग्णालयाच्या जागेवर जर समजा रूग्णालयाचं आरक्षण असेल. शासनाकडे ३७ चा प्रस्ताव पाठवुन त्याच कुठेतरी दुसऱ्या याच्यामध्ये रेग्युलर याच्यात रूपांतर केलं. तर त्या जागासुध्दा कोट्यावधी रूपयांना विकल्या जातील.

**मा. सभापती :-** भाऊ आज आपण सानेगुरूजी रूग्णालयाचा सुध्दा विषय घेणार आहे.आपल्याला या जागेवर बिओटी तत्वावर खाली कॉम्पलेक्स आणि वर हॉस्पीटल तशी तरतूदची मागणी आपण केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे

**मा. सभापती :-** तर आपण तुम्ही जो आज घरकुलाचा विषय करताहेत आणि वारंवार करत आला आहात आणि मी प्रशासनाला सांगेल की आपला उद्देश्य जो होता. ज्या जागा आपण घेतलेल्या होत्या त्या घरकुलसाठी घेतलेल्या होत्या आणि त्या उद्देश्याच्या व्यतिरीक्त आपण जर त्याचं परपज जर बदलत असेल तर त्याची काय प्रक्रीया असेल ती करून आपण निर्णय घ्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निर्णय घ्यावाच लागेल, राजुभाऊ जर कधी ज्या उद्देश्यासाठी घेतलेले आहे ते उद्दीष्टच पुर्ण होत नाही आणि ते पुर्ण करण्यापर्यंतची आणि आज आपली आर्थिक कुवत नाहीये. बाकीच्या ज्या राज्य

शासनाच्या , केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजने संदर्भातील काही योजना असतील. त्याच्या संदर्भातील घरकुल योजना राबवायच्या दृष्टीकोनातुन त्याबाबतीत त्याचा विचार होवु शकतो . ज्यावेळेला हे उद्दीष्ट राबवलं गेल होतं त्यावेळेला पंतप्रधान आवास योजना सारख्या योजना अस्तित्वात नव्हत्या. कालांतराने आपण जी योजना त्यावेळी राबवली. ती आज केंद्र सरकार राबवते आहे आणि त्याच्यात सबसिडी देतेय. परंतू आज ती राबविण्याची आपली आर्थिक परिस्थिती नसेल. परंतू त्या जागांचा कुठेतरी योग्य उपयोग करून त्याच्यातुन आर्थिक सुलभता या महानगरपालिकेला निर्माण करून आज जो हा शहरामध्ये विकासाचा बॅकलॉग आहे. तो भरून काढणं तितकच गरजेचं आहे. म्हणजे गांर्भीयाने विचार करायला पाहीजे साहेब ट्रान्सपोर्ट नगरच्या जागेच्या बाबतीत आज जवळपास साढेचार एकर जागा आहे. मी अनेकवेळा या विषयासंदर्भामध्ये बोललो आहे. खालच्या कोर्टात आपल्या बाजुने निकाल लागल्यानंतरही प्रशासनाने त्यावेळेला कॅव्हेट सुध्दा हायकोर्टात दाखल करण्याची तसदी घेतली नव्हती. तिथ जावुन त्यांना एकतर्फी स्टे मिळुन गेला . परंतू गेली आज ४ वर्ष झाले या वर्षात स्टे भेटण्याच्या दृष्टीकोनातुनही आपल्या विधी समितीकडुन कुठलेही प्रयत्न झाल्याचे दिसुन येत नाहीये.म्हणजे या शहराचे योग्य नियोजन करायचे असेल. तर फक्त घरपट्टी , खुला भुखंड कर या इतक्याच गोष्टींवर अवलंबुन राहुन ठिक आहे रूटीन आहे ही परंपरा आहे.आपण अर्थसंकल्प सादर करतो तो मान्य होतो. मग त्याच्या अनुषंगाने येरे माझ्या मागल्या पुन्हा वर्षभर तिच अवस्था असते. कुठेतरी तुम्हाला कटु निर्णय घ्यावे लागतील.काही निर्णय धाडसी घ्यावे लागतील.परंतू आपण इतक्या मोजक्या उत्पन्नावर जर कधी अर्थसंकल्प करत राहु तर मला वाटत आपण या शहरातील नागरीकांना जे काही स्वप्न दाखवलेले असतील. जी काही आश्वासने दिलेली असतील तर मला नाही वाटत की आपण ती कधी पुर्ण करू शकु.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पेज क्रं. २४

**मा.आयुक्त :-** सन्मा.सभागृह , सन्मा.सभापती , ज्येष्ठ सदस्य श्री. नितीनभाऊंनी आता जे मुद्दे मांडलेले आहेत ते बरोबर आहेत. तर आता आपल्या महानगरपालिकेला जे आपलं नेहमीचं जे उत्पन्न आहे त्याच्यापुढे जावुन काहीतरी नाविन्यपुर्ण उत्पन्न वाढवायचा विचार केल्याशिवाय आपल्याला महानगरपालिकेच्या बाबतीमध्ये आपण नागरी सुविधा देण्यामध्ये आपण सक्षम राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे. आता आपल्या महानगरपालिकेमध्ये जर बघितलं तर आपल्या मालमत्ताची संख्या सुदैवाने मोठया प्रमाणावर आहे आणि जळगांवची एकुण व्यापारी पार्श्वभुमि बघितली तर या जागांचा व्यापारी उद्देश्याने जर वापर केला. तर जागाही आपल्याला अतिक्रमण होण्यापासुन वाचवता येतील आणि महानगरपालिकेचं उत्पन्नही आपल्याला वाढवता येईल.या सगळया पार्श्वभुमिवर या वर्षापासुन आपण हा ईस्टेट मॅनेजमेंट हा म्हणजे मालमत्ता व्यवस्थापन हा एक स्वतंत्र विभाग करतोय. आता जर आपण बघितलं तर काही जागा बांधकाम खात्यामार्फत दिल्या गेलेल्या आहेत.काही जागा किरकोळ वसुली विभागामार्फत दिल्या गेलेल्या आहेत. काही जागा नगररचना विभागामार्फत दिल्या गेलेल्या आहेत. काही जागा नेमक्या कुठल्या विभागामार्फत दिल्या गेलेल्या आहेत त्यांची कागदपत्रं उपलब्ध होवु शकत नाही असा याच्यामध्ये थोडा विस्कळीतपणा आहे. हा सगळा विस्कळीतपणा दुर करणं महानगरपालिकेच्या सगळया मालमत्तांच रेकॉर्ड अद्यावत करणं. त्याच्यावर जी काही अतिक्रमण झालेली असेल तर ते अतिक्रमण काढुन त्या जागा आपण संरक्षित करणे आणि अर्थातच ज्येष्ठ सन्मा.सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत.बहुतांश सदस्यही या सुचना करत असतात.तर या मालमत्तांचा महानगरपालिकेच उत्पन्न वाढीसाठी कसा वापर करता येईल. यामध्ये हुडको सारख्या अपुर्ण राहीलेल्या काही ज्या योजना आहेत. त्याच्यामध्ये ज्या जागा आपल्या पडुन राहीलेल्या आहेत.त्याचा वापर आपल्याला कसा करता येईल.ज्या जागेचा आपल्याला व्यापारी उद्दीष्टाने वापर कसा करता येईल. असा सगळयांचा आपल्याला एकत्रित त्या मालमत्ता विचार करून धोरणात्मक कार्यवाही करता येईल. म्हणुन आता आपण या वर्षापासुन मालमत्ता व्यवस्थापन विभाग आपण स्वतंत्र करतोय आणि याच्यामध्ये इतर कुठल्याही डिपार्टमेंट मार्फत महानगरपालिकेच्या जागांचं वाटप किंवा वसुली ती न करता ती मालमत्ता विभागामार्फतच केली जाईल. त्याकरीता एक स्वतंत्र उपायुक्त असतील त्यांच्या नियंत्रणाखाली प्रशासकीय कार्यवाही केली जाईल. गरज लागली तर आपण एक शाखा अभियंता सुध्दा त्यांच्या मदतीला देवु की जे टेक्निकल मॅटर्स असतील ते ते पाहतील आणि याच्यामध्ये प्रशासकीय सुसुत्रता आणण . मला खात्री आहे की पुढच्या काळामध्ये आपण आपल्या मालमत्तांचा येणाऱ्या काळामध्ये चांगल्या पध्दतीने वापरही करू. त्याचे अतिक्रमण व्हायचे चान्सेसही आपले कमी राहतील आणि याच्यामधुन काही प्रकल्प आता जसे सन्मा.सभापती महोदयांनी सुचवलं की बजेट मध्ये बिओटी तत्वावर प्रोजेक्ट करण्याचं आम्ही सुचवतो आहे. अशा प्रकारच्या आपण अभिनव कल्पना वापरून जर उत्पन्न वाढीचे मार्ग जर केले तर जागांचाही वापर होईल आणि महानगरपालिकेचे उत्पन्न कायमस्वरूपी महानगरपालिकेला मिळु शकेल.

त्यादृष्टीने जे काही स्थायी समिती किंवा महासभेमध्ये मालमत्तांच्या बाबतीमध्ये धोरण ठरेल त्याप्रमाणे प्रोजेक्ट करायचे आहे ते आपण या वर्षामध्ये निश्चितपणे करू.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आयुक्त साहेब आमचं म्हणणं असं आहे, की आपण जो बजेट सादर करतोय ॲक्च्युअल स्थिती काय आहे. जसं आता नितीनभाऊंनी सांगीतलं . काय होवुन जातं साहेब माहिती आहे का एखादे ईलेक्शन येत राजकीय नेता ईलेक्शनला उभा राहतो . तो निवडण्याच्या अगोदर मोठे मोठे आश्वासन देतो, आम्ही शहराचा विकास करू, रस्ते करू, लाईट लावु आणि शहर स्वच्छ सुंदर बनवु. परंतू तो निवडुन आल्यानंतर तो शहराचा कुठलाच विकास करत नाही, तो फक्त शहराला भकास करत असतो मग असे होते की तो राजकीय नेता दुसऱ्यांदा निवडुन येत नाही. तशी साहेब आपल्या या बजेटची परिस्थिती आहे.मुळातच आपण आपला जो बजेट आहे . तुम्हाला एक सांगतो माझे एक मित्र आहेत नाशिक महानगरपालिकेतील नगरसेवक आहेत ते आणि मुंबई महानगरपालिकेतील त्यांना आम्ही बजेटच्या बाबतीत चर्चा झाल्या तर ते नेहमी विचारत असतात की तुमच्या महानगरपालिकेचा आर्थिक बजेट किती असतो, मग आम्ही आपले आकडे सांगतो आणि आपले आकडे सांगुन मग ते अवाक होतात की अरे तुमचा आर्थिक बजेट जो आहे तो चांगला आहे, परंतू तेव्हा आम्हाला सांगावे लागते की हे फक्त आकडे आहेत. याच्यामध्ये तफावत असते ती फार याच्यापेक्षा निम्म्याची असते. परंतू ते साहेब मुळातच बजेट आपण करत असतांना एक्झॅट आपण करू शकत नाही. उदाहरण जरी घेतले आपण आपल्या घरातील जरी महिन्याचा किराणा भरायचा म्हटलं तरी तो एखाद्यावेळेस कमी होतो किंवा जास्त होतो मुळातच आपण निश्चित करू नाही शकत .परंतू साहेब हि होणारी आकडेवारी किंवा इतका आवक होणारा तो बजेट नसला पाहीजे की जेणेकरून आपण लोकांना जे आश्वासने देतोय त्याबद्दलची जी त्यांची भावना आहे ते का इतका मोठा शहराचा बजेट असतांना सुध्दा येथील जे लोकं आहेत ते नगरसेवकांना समस्या मांडतात. इतका मोठा बजेट असतांना देखील आपल्याकडे याचे नियोजन नसुन हे जळगांव शहरामध्ये असमर्थ ठरत आहे. याच म्हणणं तेच आहे साहेब की ॲक्चुअल परिस्थिती वर चर्चा करणे आणि त्या परिस्थिती चा बजेट सादर करणे आणि फुगीर मध्ये सादर करणे आणि जी तफावत आहे ती ईतकी नको असली पाहीजे, म्हणजे आपल्याला आकडे सांगतांना बाहेर त्याची लाज नको वाटली पाहीजे. कुणी प्रश्न विचारल्यानंतर

**मा.सभापती :-** मला असं वाटतं

**श्री.कुलभुषण पाटील :-** दोनच मिनिटं मला बोलु द्या.

**मा.सभापती :-** माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की बजेट मध्ये

**श्री.कुलभुषण पाटील :-** माझे बोलणे ऐकुन तर घ्या. आपण नंतर बोला साहेब, आमचं मुळातच म्हणणं आहे की तुम्ही जो बजेट सादर करताय तो सादर करत असतांना आपण त्याच्यात तफावत नको . आत्ताच आपण म्हटंलात की ॲक्च्युअल आकडे देवु नाही शकत . परंतू इतकीपण तफावत असली नको पाहीजे आमचं म्हणणं ईतकेच आहे.

**मा.सभापती :-** पुर्ण बजेट मध्ये आपण जी तरतूद आहे आपण पुर्ण ऐकुन घेतली

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय ऐका ना आता जसे अमित भाऊंनी सांगीतले की

**मा.सभापती :-** भाऊ तुम्ही जे मांडता आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यात सन्मा सदस्य यांनी सांगीतले की तफावत आढळुन आली आहे की तुम्ही बजेट मध्ये घेणार आहेत निश्चितच बजेट जो सादर केलेला आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती साहेब आत्तापर्यंतचा जो विषय आहे, जसे कुलभुषण भाऊ म्हणताहेत की फुगीर आकडे का टाकता आहेत आणि का करता आहे इतक्या मोठया भाषेत ते चढवुन सांगता आहेत. पण मला असे म्हणायचे आहे कुलभुषण भाऊंना की आम्ही पास करणार आहोत पण संधी तुम्हाला देतो आहे . आता ती संधी तुम्हाला दाखवायची आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ताई नक्कीच नक्की ऐका ना

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तुम्ही जबाबदार व्यक्तीमत्व आहात भाऊ

**श्री.कुलभुषण पाटील :-** ताई नक्कीच नक्की ऐकुन तर घ्या , आकडयामध्ये तफावत नको पाहीजे याच्यासाठीच मी बोलतोय

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तुम्हाला आपले अधिकार आहेत पण आपण पण समजुन घेतले पाहीजे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ताई आता जे झाले ते झाले याच्यापुढे अशा कुठल्याही पध्दतीचे हे धकवुन घेतले जाणार नाही आणि मांडणारच आहे आम्ही .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आता आम्ही बजेट सादर करतो आहे, मोठे आकडे दाखवतो आहे, पण त्याचा फायदा तुम्हाला आहे ती संधी तुम्हाला आहे.जळगांवच्या नागरीकांना काय द्यायचे आहे काय नाही द्यायचे आहे हे त्या आकडयांवरून तुम्ही देवु शकतात.

**मा.सभापती :-** आपण वास्तववादी वास्तववादी बऱ्याचदा ऐकले. मला सांगा वास्तववादी आकडे आले कुठुन, वास्तववादी आकडे तुम्ही ठरवले कोणत्या बेसवर प्रशासनाने जे वास्तववादी आकडे दिलेले आहेत. हे ठरवले कोणत्या बेसवरती, मग वास्तववादी आहेत का ते , ते होणार आहेत का

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रशासनाला विचारा ते कठुन आले ते

**मा.सभापती :-** मी तेच म्हणतोय ना, आपण आम्ही जी व्यवस्था करतोय, उद्याच्या दिवशी असे व्हायला नको की आपल्याकडे तरतूद असतांना सुध्दा बजेटमध्ये तरतूद नाही पण त्याच्यावर खर्च करता येणार नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही पण

**मा.सभापती :-** अशी कंम्पलेंट यायला नको म्हणुन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, म्हणुन जबाबदारीने बोला आज बजेट पुर्ण झालेले आहे. जवळपास पुर्ण झालेले आहे

**श्री.कुलभुषण पाटील :-** पुर्ण झाले आहे पण

**मा.सभापती :-** प्रत्येकाला बोलायची संधी मिळणार आहे.पुर्ण बजेट ऐकुन घ्या , ऐकल्यानंतर जर कुठे तरतूदी तुम्हाला कमी वाटत असल्या तर त्या निदर्शनास आणुन द्याव्या. हा बजेट महासभेसमोर सादर होणार आहे. तुम्हाला संधी आहे.तरी तुम्ही कमीत कमी ऐकून तर घ्या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती आतापर्यंत जे चार पाच विषय झाले आणि नितीनभाऊंनी सुचवले तर ते आपण म्हणताहेत आणि तुमचे एकच वाक्य आहे.

**मा.सभापती :-** अहो आपल्याला प्रभाग समित्या सक्षम करायच्या आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** १०० टक्के

**मा.सभापती :-** प्रभाग समित्यांना अधिकार द्यायचे आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** १०० टक्के आम्ही तुमच्या सोबत आहेत.

**मा.सभापती :-** त्या तरतूदी वाढवल्या तर तुमच्यसाठी फायदेशीर आहेत, तुमच्या फायद्यासाठीच आहे आम्ही आमच्या फायद्यासाठी केलेल्या नाहीत. या तुमच्या फायद्यासाठीच आहे. आज आपण केली नाही तर उद्या तुम्हाला

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय ऐका ना आपले अंथरूण पाहुन पाय पसरवले पाहीजे अशी एक म्हण आहे. आपली जेवढी चादर आहे आपण तेवढेच पाय पसरवावे असे मला वाटते.

**मा.सभापती :-** पुढचा विषय घ्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आयुक्त साहेब पेज नंबर २४ नालेसफाई, नालेस्वच्छता त्याच्यासाठी आयुक्त साहेबांनी २५ लाखांची तरतूद केलेली आहे. तर २५ लाखांच्या व्यतिरीक्त अतिवृष्टी मुळे म्हणजे काही भागांमध्ये अतिवृष्टी येते त्यामुळे प्रभाग समिती १ मध्ये ३ लक्ष, प्रभाग समिती २ मध्ये ५ लक्ष, प्रभाग समिती ३ मध्ये १० लक्ष आणि प्रभाग समिती ४ मध्ये ५ लक्ष अशी करावी जसे आपण आता म्हंटले की प्रभाग समित्यांना आपण मिनी नगरपालिकेचे अधिकार आपण देणार आहोत. तर त्या अनुषंगाने जसं ही जर आपण तरतूद केली तर त्यांना सोईस्कर असेल की ज्यावेळेला अशा काही घटना होवु शकतात. तर समजा अतिवृष्टी जर आली आणि काही दुर्घटना घडली तर त्यांना निर्णय घेवुन तेव्हाच्या तेव्हा काम करता येईल.म्हणुन ही वाढवुन तरतूद सांगीतल्याप्रमाणे तरतूद करण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** आता सुध्दा आपण वर्षातुन एकदा किंवा दोनदा विशेष करून पावसाळयाच्या अगोदर मे / जुन महिन्यामध्ये आपण नालेसफाई करतो तेव्हा आपल्या शहरामध्ये ४ ते ५ असे मोठे नाले आहेत आणि काही उपनाले आहेत. यांची जी काही ही जी आपली स्वच्छतेची कामं आहेत ती प्रभाग स्तरावरूनच केली जातात आणि प्रभाग अधिकारी यांच्या स्तरावरून त्याची निविदा प्रक्रीया राबवली जाते . तशी आता अडचण येणार नाही. पण आता आपण वारंवार एकाच विषयावर चर्चा करतोय अर्थात ती योग्य आहे. ही जी आपली प्रभाग समितीची जी कार्यालये आहेत ती आपल्याला सक्षम करायची आहेत. याच्यासाठी आता सन्मा सदस्यांनी याच्यामध्ये सांगीतले की समजा की निधी दिला की प्रभाग समिती सक्षम झाली किंवा प्रभाग कार्यालये सक्षम झाली असे होत नाही. त्याला आपला हा निधी खर्च करण्याच्या दृष्टीने आपल्याला स्टाफ सुध्दा देणं गरजेचं आहे.स्टाफ नसेल आणि नुसती प्रभागाला आपण तरतूद करून दिली तर प्रभाग अधिकाऱ्याला ते काम करून घेण्यासाठी त्यांना कर्मचारी वर्गाची अडचण भासते .आता जर आपण बघितलं तर जवळपास आपल्याला ४०

टक्के आपल्या कर्मचाऱ्यांच्या जागा रिकाम्या आहेत. आपला जो काही आस्थापनाचा आराखडा आहे तो राज्य शासनाकडे आपण सादर केलेला आहे. त्या मंजुरीची प्रक्रीया अजुन शासन स्तरावर चालु आहे. तेही मंजुर करून घेण्याचे प्रयत्न आपण करतोय पण मला एक त्याच्यामध्ये सांगावेसे वाटते की ज्यावेळेला आपल्याकडे पुर्ण क्षमतेने कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल आणि इंजिनियरची संख्या त्यावेळेला आपल्याला प्रभाग समिती मार्फत कामं करता येणे शक्य आहे.ऑदरवाईज नुसती बजेट तरतूद केली आणि जर कर्मचारी आपण प्रभाग समितीला नाही देवु शकलो त्यामुळे प्रभाग अधिकाऱ्यांना कामं करणं आवाक्यात राहणार नाही.त्यामुळे पुरेशा प्रमाणात कर्मचारी वर्ग महानगरपालिकेमध्ये आपण उपलब्ध करू मग त्यावेळेला खऱ्या अर्थाने आपल्याला मिनी महापालिका किंवा आत्ताच्या वेळेला कामं सोपविणे सोप होणार आहे. त्यामुळे बजेट तरतूद हा एक पार्ट झाला पण त्या बजेट तरतूदीमधुन आपल्याला आवश्यक असलेला स्टाफ देणं हा त्याही पेक्षा महत्वाचा आहे.त्यामुळे स्टाफ मुळे आपली बरीचशी कामं ही महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालया मधुनच करावी लागतील

**मा.सभापती :-** स्टाफ देण्यासाठी महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांची भरती करावी लागेल . त्यासाठी आता आपला जो हे आहे . काय म्हणता त्याला आकृतीबंध आहे अजुन आपले आपल्या आकृतीबंधासाठी काही प्रयत्न झालेले नाहीत असे मला वाटतं. आकृतीबंध आपला जसाचा तसा पडुन आहे. आकृतीबंध आपण मुलांसाठी घेतलेले होते. हे जे मुल आहेत अनुकंपाचे जे आहेत त्याचीही प्रक्रीया मला वाटत तीही प्रक्रीया कंम्पलीट झाली नाहीये.आपण जर हे करणार नसेल तर कर्मचारी कसा उपलब्ध होईल. कर्मचारी उपलब्ध झाला नाही तर मग आपल्या प्रभाग समित्या कशा सक्षमीकरण करता येतील.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे आपण जे म्हणताहेत सभापती महोदय, परंतू आकृतीबंधाच्या बाबतीमध्ये आकृतीबंधाचा प्रस्ताव हा राज्य शासनाकडे ऑलरेडी गेलेला आहे.आता त्याच्यामध्ये महानगरपालिकेच्या बाबतीमध्ये ज्या ड वर्ग महानगरपालिका आहेत ड वर्ग महानगरपालिकांना आपल्या कर्मचाऱ्यांच्या आस्थापना खर्चावर एकूण उत्पन्नाच्या जास्तीत जास्त ३५ टक्के खर्च करावा अशी राज्य शासनाची अट आहे.आत्ता जर बघितलं तर आपला खर्च आता सध्याच्या मोजके उत्पन्न आणि मोजके कर्मचारी याच्या तुलनेमध्ये तो ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ५१ ते ५२ टक्के आपला आस्थापना खर्च आहे. तसा आपण आता जो आस्थापनाचा आकृतीबंध सादर केलेला आहे. तो आहे तसा आपल्या मागणी प्रमाणे मंजुर होणं थोडं राज्य शासनाच्या धोरणाला धरून नसल्यामुळे अडचण येईल. म्हणुन त्याच्यामध्ये एक असाही प्रयत्न त्याच्यामध्ये होतोय की अत्यावश्यक असे जे पद आहेत. जसे आरोग्याचे त्याच्यात सफाईचे असतील किंवा दवाखान्याचे असतील ते दोघेही आरोग्याचेच असतात आणि अग्निशमनची पदं ही दोन्ही आपण अत्यावश्यक आणि आणिबाणीच्या सेवा देतो. अशा विभागांच्या पदांच्या बाबतीमध्ये  तेवढी पदं मंजुर करता येतील का आणि मग प्रशासकीय जी पदं आहेत म्हणजे लिपीक असतील , वरीष्ठ लिपीक असतील , इंजिनियरची पदं असतील . यांची पदं महानगरपालिकेचं उत्पन्न असं वाढेल. तसा आपण आस्थापना खर्च कमी करू शकतो. तर त्या त्या तक्त्यामध्ये आपल्याला करता येतील. परंतू आकृतीबंध मंजुर होण्यामध्ये आपल्याला उत्पन्नवाढ करणं हे सर्वात महत्वाचं आहे हे करतांना आपल्याला आपला आकृतीबंध मंजुर करून घेता येईल .या सगळयामध्ये एक चांगलं होतय की जसं आपण सर्वजण विचार करतोय. या सगळयामध्ये एक यामध्ये आपलं स्वत:च उत्पन्न वाढवण आणि राज्य शासनाचे अंवलंबीत्व हे टप्प्या टप्प्यानं करणं हे किती दिवस आपण राज्य शासनावर अवलंबुन राहायचे. शेवटी जसं सन्मा.सदस्य म्हणताहेत राज्य शासनाचा निधी मिळायला आपल्याला एक मर्यादा येणारच आहे. ठिक आहे आपण प्रयत्न करतोय ते आपल्याला मिळेलच परंतू आपण नैसर्गिक मर्यादेच्या पुढे आपण जावु शकत नाही. त्यामुळे आपण नाविण्यपुर्ण उत्पन्नाचे विषय समोर आणुन आपल्याला स्वत: कसं सक्षम होता येईल आणि मग त्याच्यामधुन उत्पन्न वाढलं तर या सगळयाच प्रश्नांच उत्तर आपल्याला त्याच्यामधुन मिळणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माजी मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस, माजी मंत्री श्री.गिरीषभाऊ महाजन , आ.राजुमामा भोळे यांनी ही महापालिका कर्जमुक्त केली आता जर ती कर्जात असती तर आपल्याला एवढयापण सुविधा देता आल्या नसत्या. आपण कर्मचाऱ्यांचे पगार देवु शकत नव्हतो तर अशी आपली परिस्थिती होती. आता फक्त मुद्दल भरतोय आपण बिनव्याजी भरतोय आता ही सुरूवात झालेली आहे चांगल्या मार्गाला आपण अपेक्षा ठेवा ना जर आपण म्हंटल निगेटिव्ह म्हंटल तर होणार नाही , जर आपण आता कर्जमुक्त झाले आणि ते कर्जमुक्त होण्याच्या मार्गावर आहे. ज्या काही रक्कमा आहेत घरपट्टी म्हणा किंवा भुखंड म्हणा जसे नितीन भाऊंनी म्हंटले की नविन नविन उपाययोजना करायला पाहीजे तर त्या होणारच आहेत. आता जर कर्ज फिटले तर घरपट्टी शहरी भागासाठीच वापरु शकतो नागरी सुविधा देणारच आहोत आपण तर मला असं वाटतं की ते पण होईल. तर

आपण प्रत्येक गोष्टींमध्ये निगेटिव्ह न राहता पॉझिटिव्ह पण राहाव. राज्य शासनावर अवलंबुन न राहाता. आपण महापालिकेच्या माध्यमातुन काम करू शकतो .

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, आयुक्त साहेब साहेब मला सांगा की आता जळगांव महापालिकेचे जसे आता ताईंनी सांगीतले की माजी मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस, माजी मंत्री श्री.गिरीषभाऊ महाजन , आ.राजुमामा भोळे यांनी केले तर साहेब मला सांगा की आपण हुडकोचे कर्ज पुर्ण खरच भरून टाकले आहे का आपण खरच कर्जमुक्त झालेलो आहेत का ? मला हे आपल्याकडुन जाणुन घ्यायचे आहे की आपण आता सन्मा.सदस्य ताई म्हणताहेत की आता त्यांनी किती कर्ज शासनाकडुन मंजुर करून भरून दिले की त्यात आपण स्वत:च उत्पन्न करून त्यातुन भरलं की त्यांनी विशेष प्रयत्न करून आपल्याला शासनाकडुन ठोस करून दिले . साहेब आपल्याकडुन जर त्याची माहिती मिळाली तर बर होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जरी ताईंनी म्हंटले जसे कुलभुषण भाऊ म्हणताहेत दोघांचे म्हणणे आपापल्या जागी योग्य आहे.परंतू खऱ्या अर्थाने त्या विषयाला योग्य पध्दतीने हाताळले गेले नाहीये. तत्कालीन आयुक्तांचे ॲफीडेव्हिट हायकोर्टामध्ये आहेत की संपुर्ण महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने त्याची नियमानुसार जर कधी आकडेमोड केली असती तर संपुर्ण हुडकोला ३० ते ३५ कोटी रूपयांच्या वर देणं नव्हतं. आयुक्त साहेब आपण ही त्यावेळेला होतात ना. त्याच्यामध्ये दोन किंवा तीन आयुक्त साहेबांचे ॲफीडेव्हिट हायकोर्टात ज्या वेळेला हुडकोच्या विरुध्द आपल्या त्या याचिका होत्या.त्याच्यावरती ॲफीडेव्हिटवर ते आकडे दिलेले आहे आपण बिलं पुरेपरं दिलेले आहे. हा निर्णय जो झालाय पॉलीटीकली जो निर्णय झाला तो ठिक आहे.वाईटातील काय झाले तर सव्वाशे कोटी रूपये माफ झाले, सव्वाशे कोटी रूपयांचे ओझे डोक्यावर राहीले. निव्वळ रक्कम राहीले असे गृहीत धरूया , परंतू ते सव्वाशे कोटी रूपयांचे ओझे राहीले. परंतू त्या विषयाची योग्य पध्दतीने हाताळणी झाली असती तर महानगरपालिकेला ३० ते ३५ कोटी रूपयांच्या वर देण लागत नव्हतं. आतातायी पणा मुळे ती कठेतरी पब्लीसिटीच्या नावाने राज्य शासनाचे सव्वाशे कोटी रूपये वाया गेले. महानगरपालिकेच्या डोक्यावर सव्वाशे कोटींच ओझं राहीलं. जेव्हा केंद्र शासन एका पक्षाचं सरकार होतं राज्यामध्ये एका पक्षाचं सरकार होतं हुडको केंद्राच्या अखत्यारीत होतं रितसर आपण जो प्रस्ताव दिलेला होता की ३० ते ३५ कोटी रूपयांचे आपण सगळे कॅल्क्युलेशन करून याच्या व्यतिरीक्त एक पैसा आम्ही देवु शकतं नाही.या सगळया गोष्टी ज्यावेळेला आम्ही सांगत होतो. त्यावेळेला कायदेशीररित्या आम्ही खुप भांडलो. परंतू वेगळया पक्षाचं सरकार येथे महानगरपालिकेत, वरती वेगळया पक्षाचे सरकार त्यांच्या कार्यकाळात , म्हणजे आमच्या कार्यकाळात ही महानगरपालिका कर्जमुक्त झाली असती तर मग सत्ताधाऱ्यांना त्याचं श्रेय लाटता आलं नसतं हा सगळा एक

**मा.सभापती :-** नितीन भाऊ एक मिनिटं थांबा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** नितीन भाऊ एक मिनिटं थांबा.मला बोलु द्या आपलं सरकार आता राज्यात आहे उर्वरीत ७१ कोटी तुम्ही अदा करून टाका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, मला माझे पुर्ण करून घेवु द्या

**मा.सभापती :-** आता राज्यात आपलं सरकार आहे उर्वरीत ७१ कोटी तुम्ही निल करून टाका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, राज्य शासनाने त्यांच्या निर्णयाने सव्वाशे कोटी रूपये भरले आहेत.

**मा.सभापती :-** आता महापौर आपले आहेत ,राज्यात आपलं सरकार आहे आपण ते विनंती करून निल करून टाका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, आम्ही जे करायचे आहे ते करू आणि करून दाखवु असे नाही की, त्या १०० कोटीची हुणता होत आहे आणि १०० कोटी परत जाता.अशी नामुष्की गेल्या अडीच वर्षात गेल्या अनेकदा आली.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आदरणीय आमदार जळगांव करांना वारंवार की, आम्ही जळगांव शहर महानगरपालिका कर्जमुक्त केली असे खोटे का बोलतात ते वारंवार.खरच महानगरपालिका कर्जमुक्त झाली का याचा उत्तर मला द्या तुम्ही. आमदार महोदय जे सांगतात तर महानगरपालिका कर्जमुक्त झालेली आहे का?

**मा.सभापती :-** खोटे आहे की खरे आयुक्त साहेबच उत्तर देतील तुम्हाला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** म्हणुनच सभापती महोदय आम्ही तुम्हाला विचारत आहे ना. आणि प्रश्नच उल्टा विचारतात. आम्हाला प्रशासनाकडुनच उत्तर हवे आहे. सभापती महोदय आपण खरोखर हुडकोच्या याच्यातुन कर्जमुक्त झालेलो आहोत का.

**मा.सभापती :-** ऐका ना. ऐका.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, आम्ही काय विचारले, मी मुळातच काय विचारले, या सर्व प्रकरणात आमदार महोदयांच्या सांगण्यावरुन आपण जळगांव शहर महानगरपालिका हुडकोच्या कर्जातुन कर्जमुक्त झालेली आहे का?

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचे शब्द प्रयोग वेगळे येतील. कर्जमुक्त झालेले आहे परंतु ओझ कमी झालेल नाही.ओझं होतं तेवढेच आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला एक सांगा पुर्ण कर्ज माफ झालयं का ?

**मा.सभापती :-** ऐका ना. ऐका. त्यांनी सत्तेचा विषय काढला म्हणुन मी बोललो

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला एक सांगा पुर्ण कर्ज माफ झालयं का ? आता सुध्दा आपल्याला पैसे द्यायचे आहेत की नाही हुडकोचे आज पण ७१ कोटी रूपये भरणे आहे किंवा नाही राज्य शासनाने आपले कर्जापोटी पैसे भरले होते ते आपल्या याच्यातुन काढुन घेताहेत ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय , प्रशासनाला विचारायला लावा प्रशासन उत्तर देईल ना.

**श्री.प्रशांत नाईक :-** ताई सभापती आहेत ते बोलताहेत ना प्रशासनाकडुन बोलताहेत ना

**मा.सभापती :-** ऐका ना. ऐका.प्रशासनाचं ऐकून घ्या

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती कडुन  पाहीजे ना उत्तर

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला एक सांगा प्रशासन पण तेच सांगणार आहे ते काय फीरवुन सांगणार आहे. हे तुम्हालाही कळतय आणि आम्हालाही कळतय ते मुळात प्रश्न आपला काय आहे की आज आपल्या सांगीतल्या प्रमाणे आपण आज रोजी हुडकोच्या कर्जातुन मुक्त झालोय का तुम्ही ते मान्य केले की नाही मग इतकेचं

**श्री.प्रशांत नाईक :-** कुलभुषणभाऊ सभापतींनी मान्य केलंय महापालिका कर्जमुक्त झालेली नाही

**मा.सभापती :-** ऐका ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय , प्रशासनाला सांगा ना की कर्जमुक्त झाली आहे की नाही देतील आयुक्त साहेब उत्तर

**मा.सभापती :-** आपण

**श्री.प्रशांत नाईक :-** आयुक्त साहेब तुम्ही सांगा आता महानगरपालिका कर्जमुक्त झालेली आहे की नाही ऐवढेच सांगा

**मा.सभापती :-** महापालिकेला

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता ही आकडेवारी आहे जी भाऊंनी सांगीतली याच्यामध्ये ७१ कोटी अजुन भरायचे बाकी आहेत

**मा.सभापती :-** ऐका ना.

**श्री.नितीन लढढा :-** फक्त प्रशासनाने डिप्लोमॅटीक उत्तर देवु नये.

**मा.सभापती :-** ऐका ना आता

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता प्रशासन काय उत्तर देणार आहे तेच उत्तर राहील त्यांचे

**मा.सभापती :-** ऐकूण तर घ्या.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय अडीच वर्ष झाले ऐकले म्हणुन या शहराचे हे हाल झाले आहे

**मा.सभापती :-** ऐकूण तर घ्या तुम्ही

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय अडीच वर्ष झाले तुम्ही संपुर्ण गांव हुडकुन बघा परंतू आता खड्डयांची चिड येते आता काय झालेले आहे हवाई पट्ट्या झालेल्या आहेत का

**मा.सभापती :-** आता हे झालेले आहे का रस्ते हे आता झालेले आहे का

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय अडीच वर्ष झाले

**मा.सभापती :-** नागरीकांची चिड निघुन गेली का

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय चिड निघुन गेली नाहीये ती वाढत जातेय अडीच वर्ष झालेय काय विकास झालाय

**मा.सभापती :-** आता हा विषय बंद करा आणि आपल्या विषयावर बोला.आता मला सांगा साहेब आता आपली ही जी रक्कम शासनाने भरली तेव्हा आपल्या महापालिकेवर किती कर्ज होत ते सांगा.

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** सभापती महोदय , सन्मा.सभागृह एकूण जेव्हा शासनाकडे जी रक्कम होती ती एकूण २५३ कोटी होती.

**मा.सभापती :-** आता २५३ कोटी च्या आधी किती होती

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** त्याच्यामध्ये

**मा.सभापती :-** ऐका ना तो विषय वेगळा आहे, गिरीषभाऊंनी बैठका घेवुन किती कमी करून आणली ती सांगा आधी कमी किती करून आणली भरली किती शासनाने आणि भरल्यापैकी आपण किती भरायची आहे त्याच्यापैकी आपण किती भरले त्याचे आकडे द्या.

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** सन्मा.सभागृह एकूण २१ योजनांचा आपल्याला हा निधी मंजुर झालेला होता आणि तो एकूण २०४ कोटी एवढा मंजुर झालेला होता. १९८९ मध्ये २०४ कोटी मात्र त्यापैकी आपल्याला १८ योजनांसाठी १४१ कोटी एवढाच मिळालेला होता तो प्रिंसिपल अमाऊंट होता जो आपल्याला शासनाकडून मिळालेला होता.पण त्याच्यामध्ये कंपाऊंड ईन्टरेस्ट आणि फाईन किंवा पॅनल्टी हे सगळ जवळ जवळ ४८३ कोटी पर्यंत गेले. ४८३ कोटीपैकी आपण महानगरपालिकेने भरणा केल्यानंतर अंतिमरित्या दिल्लीच्या बैठका असतील किंवा मंत्रालय मुंबईला ज्या बैठका झाल्या डिआरएटी ची आकडेवारी आपल्या हुडकोची आकडेवारी आणि महानगरपालिकेची आकडेवारी यांचा एकत्रितपणे अभ्यास केल्यानंतर २५३ कोटी ही रक्कम आकडेवारी निश्चित करण्यात आली. २५३ कोटींच्या आकडेवारी नंतर ती रक्कम एकरकमी भरणा करण्याबद्दल त्यावेळेला मंत्रीमंडळाच्या बैठकीत ठरलेलं होत आणि त्यावेळी ती रक्कम महानगरपालिकेला उपलब्ध करून दिले. त्याच्यामध्ये असे होते की ५० टक्के रक्कम ही शासन भरत आहे आणि ५० टक्के रक्कम ही एकूण १२५ कोटीच्या जवळपास होत होती ती महानगरपालिकेच्या वतीने जे आपल्याला १० कोटी जे मिळतात ग्रँट जीएसटीची त्याच्यामधुन दरमहा ३ कोटी रूपये शासन परस्पर वळती करून घेणार आहे ती रक्कम आणि ती रक्कम त्या १२५ कोटीमध्ये डायरेक्टली भरणा करणार आहे. त्यामुळे आज रोजी जरी १२५ कोटींचा भार आपला निश्चितपणे कमी झालेला आहे आणि उर्वरीत १२५ कोटीपैकी आजतागायत मागच्या १८ हप्त्यांमध्ये भरलेली आहे.ती साधारण ५४ ते ५५ कोटींच्या दरम्यान आहे.

**मा.सभापती :-** आपली किती रक्कम कपात होते आहे आता

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** ३ कोटी रूपये भरतोय.

**मा.सभापती :-** ३ कोटी रूपये भरतोय ना आपण

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** हो

**मा.सभापती :-** याच्याआधी ३ कोटी रूपये कशात जात होते आपले

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** म्हणजे

**मा.सभापती :-** आपण याच्याआधी ३ कोटी देत होतो की नाही.

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** हो

**मा.सभापती :-** तर ते कशात जात होते मुद्दलमध्ये जात होते, व्याजात जात होते की कशात जात होते .

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** त्या आपल्या प्रिंसिपल अमाऊंटला हातच लागत नव्हता . आपले दरमहा कंपाऊंड ईन्टरेंस्ट वाढत होतं . त्या कंपाऊंड ईन्टरेंस्ट मध्येच भरणा होत होता. आपला १४१ कोटींचा जो भरणा होता त्याला ७ ते८ कोटी रूपये ईन्टरेंस्ट लागत होते.

**मा.सभापती :-** त्याला राज्य शासनाने जर का ती रक्कम भरली नसती तर आजही महापालिकेवर २५३ कोटी कर्ज राहीले असते .

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब आपण वेळोवेळी

**मा.सभापती :-** त्यांना आपण ३ कोटी देत होतो व्याजापोटी

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण वेळोवेळी जी रक्कम होती त्याच्यामध्ये १०० टक्के रक्कम भरणा करणेबाबत प्रयत्न करत होतो.

**मा.सभापती :-** २५३ कोटी द्यायला पाहीजे आपल्याला आपल्याला आता ७१.४२ कोटी

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु त्या संदर्भात केंद्रीय नगरविकास मंत्रींची भेट घेतली, माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांचीही भेट घेतली. परंतू हेतू हाच होता की तो काळ त्या काळात त्यांना योग्य वाटत नव्हत का तर त्याच श्रेय त्यांना मिळालं नसतं. अनेक पत्रव्यवहार केले.

**मा.सभापती :-** श्रेय घेवु शकता भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा संपुर्ण तडजोडीचा प्रकार केव्हा झाला. ज्यावेळेला सत्तांतर झालं त्यावेळेला म्हणजे तुम्ही फक्त सत्ता प्राप्ती साठी एखाद्या शहराची वाट लावण्यापर्यंत विचार करता हा त्याच्यातुन एक मॅसेज जातो . दिले शंभर सव्वाशे कोटी त्याबद्दल वाद नाहीये. परंतू मी म्हणतो की कायदेशीररित्या वेळेवर मेरीटवर ठेवुन ते मॅटर डिसाईड केलं असतं तर २५ ते ३० कोटी रूपयांच्यावर ती देणं रक्कम नव्हती .

**मा.सभापती :-** आजही भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** वाहुळे साहेब आपण सगळया पिटीशन्सचा अभ्यासही केला . तत्कालीन आयुक्तांचे ॲफीडेव्हीट सुध्दा त्याच्या मध्ये आपण दिलेले आहेत. म्हणजे तत्कालीन आयुक्तांना मान्य होत की खऱ्या अर्थाने आपण २५ ते ३० कोटी रूपयांच्या वर हुडकोचे देणे लागत नाही. परंतू निव्वळ राजकारणा पायी आणि त्याच राजकीय श्रेय लाटण्यापायी हा सव्वाशे कोटी रूपयांचा भुर्दंड जळगांव शहर महानगरपालिकेवर आजही आपण त्याला ओढुन नेतोय आणि आजही ७१ कोटी रूपये त्याच्याच अनुषंगाने देणे लागतोय . उगाच श्रेय लाटण्याच्या संदर्भात हे नका पाहु की शहराचं वाटोळे होईल

**मा.सभापती :-** आजही भाऊ ते केले नसते तर आजही त्याचा निकाल लागला नसता . आजही आपल्यावर २५३ कोटींच कर्ज जसेच्या तसे राहीले असते आणि ३ कोटी आपल्याला दरमहा व्याजापोटी द्यावे लागले असते.आज आपल्याकडे फक्त ७१ कोटी घेणे  बाकी आहे.कशामुळे घेणे बाकी आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय मला एक सांगा की ज्यावेळेला आम्ही

**मा.सभापती :-** आजही नुसते एक काम करायचे म्हंटले तर महापालिकेला ३० टक्के हिस्सा आपल्याला द्यावा लागतो. मग सव्वाशे कोटी दिले आहेत ते पण बिनव्याजी दिले आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आज रोजी किती रक्कम बाकी आहे.

**मा.सभापती :-** ७१ कोटी

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपल्या जळगांव शहराच्या सन्मा.आमदारांना हे सांगा आज रोजी ७१ कोटी रूपये आपले देणे बाकी आहे. आपण हुडकोमधुन जळगांव महानगरपालिका अजुन कर्जमुक्त केलली नाही. अजुन हुडकोचे कर्ज आपल्यावर बाकी आहे.हे तुम्ही लक्षात घ्या की ते ७१ कोटी देणे बाकी आहे.

**मा.सभापती :-** ७१ कोटी हे कर्ज नाहीये भाऊ कर्ज कशाला म्हणता कर्जाला व्याज असत आज व्याज भरायचे आहे का आपल्याला याला कर्ज म्हणता येणार नाही.या रकमेला कर्ज म्हणता येणार नाही

**श्री.कुलभुषण पाटील :-** कर्जच आहे ना ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय , बिनव्याजी कर्ज आहे ते

**मा.सभापती :-** कर्ज म्हणता येणार नाही कर्जाची व्याख्या काय असते की ज्याला व्याज असते . आज या रकमेला व्याज द्यायचे नाहीये ते बिनव्याजी आहे . तुम्ही असे बोलुन सभागृहाची दिशाभुल करू नका

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभागृहाची दिशाभुल आपल्याकडुन होतेय , आपल्याकडुन वारंवार सांगीतले जातेय की तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री.फडणवीस साहेब यांनी कर्ज फेडले हुडकोचे कर्ज फेडले हे आपल्याकडुन केले जातेय आमच्याकडुन केले जात नाहीये.

**श्री.प्रशांत नाईक :-** राजुमामा भोळेंना दोन वेळा या शहराचे आमदार केलेले आहे. हे जनतेचे श्रेय आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो मान्य केले त्यांनी

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हा विषय आताचा नाहीये .

**मा.सभापती :-** तस नाही म्हणता येणार.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मग काय म्हणता येईल.हुडको जबरदस्ती हिसकावुन घेणार आहे का असे म्हणणे आहे का

**मा.सभापती :-** ही रक्कम शासनाने भरली त्याची रक्कम आपण

**श्री.कुलभुषण पाटील :-** मग आपण आता त्यांना देत नाहीये का

**मा.सभापती :-** ज्याचं व्याज दिलं जात ते कर्ज म्हंटले जाते

**श्री.कुलभुषण पाटील :-** मग आपण जबरदस्ती देतोय का

**मा.सभापती :-** शासनाने महापालिकेला उसनवारीने दिले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** दवाखाने आणि सुतिकागृह पेज नं. ६० त्याच्यातील क्रं. आहे ५ साथीचे रोग संसर्गजन्य रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना मा.आयुक्त यांनी १० लक्ष तरतूद केलेली आहे. संसर्गजन्य रोग प्रतिबंध हे करतोय आपण आजची परिस्थिती माहिती आहे आपल्याला की कोरोनाने पुर्ण जगभरात थैमान घातलेले आहे आणि अशा परिस्थितीत संसर्ग हा काही सांगुन येत नाही. त्यामुळे आपल्याकडे १५ कोटींची तरतूद करण्यात यावी.आतापर्यंत आपण पॉलीटेक्निक कॉलेजला ज्या सुविधा देत होतो पेशंटला त्यांना लक्षण फक्त दिसुन येत होते . ज्यांना ऑक्सिजनची गरज आहे आपण त्यांना तिथे ॲडमिट करू शकत नव्हतो . आपल्या महापालिकेची ही जबाबदारी आहे की पेशंट पुर्णपणे बरा होईपर्यंत त्याला सुविधा पुरवणं म्हणुन १०० बेड ऑक्सिजन असलेले ती व्यवस्था आपण करावी. सिव्हिल हॉस्पीटलला पुर्ण जिल्हयाची गर्दी असते. महापालिका क्षेत्रातील जे रहिवासी

आहेत त्यांना सुविधा मिळत नाहीये . बेड खाली नाहीये प्रायव्हेट हॉस्पीटल आहे किंवा सिव्हिल हॉस्पीटल आहे याच्यामध्ये जी व्यवस्था असते त्यांना आपण बघतो की खाली बसवुन त्यांना ऑक्सिजन लावलं जातयं. तर आपले पण कर्तव्य आहे महापालिका म्हणुन की आपल पण काही देणं लागतो म्हणुन आपल्याकडुन त्या सुविधा पुरविल्या गेल्या पाहीजे. तर आमची मागणी आहे की ऑक्सिजन असलेले बेड आपण तयार करावेत आणि ती सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. म्हणुन आणि अशा भविष्यात काही संसर्गजन्य आजार येवु शकतात. असं आपण म्हणु शकत नाही की येणारच नाही. तर ते येवु शकतात तरी तरतूद असावी . असे नको व्हायला की तरतूद नाहीये म्हणुन आपण काही करू शकत नाही. म्हणुन ही १५ कोटींची तरतूद करण्यात यावी.

**मा.सभापती :-** ताईंच म्हणण आहे की जळगांव शहरामध्ये कोरोनाचे रूग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. आज जळगांव शहरामध्ये सिव्हिल हॉस्पीटल असेल, ईकरा कॉलेज असेल आपले महापालिकेचे पॉलिटेक्निक , इंजिनयिरींग कॉलेजला नागरीकांना , रूग्णांना कॉरंटाईन करतो . त्याठिकाणी आपली कुठलीही ऑक्सिजन बेडची व्यवस्था नाही आणि सिव्हिलमध्ये जागा खुप कमी आहे. तसेच आपल्या जळगांव शहरातील नागरीक हे गोदावरी कॉलेजलाही पाठवतो . परंतू तेथे सुध्दा आज व्हेंटीलेटरचे बेड असतील, ऑक्सिजनचे बेड असतील कुठेही उपलब्ध नाहीत. आता आज सामाजिक क्षेत्रात , सामाजिक क्षेत्रात काम करतो आपल्याला नागरीकांचे फोन येत असतात की त्यांना ऑक्सिजन बेडची आवश्यकता आहे, व्हेंटीलेटर बेडची आवश्यकता आहे.तर आपण त्यांची गरज पुर्ण करू शकत नाही.अशी अवस्था जळगांव शहरामध्ये झालेली आहे. म्हणुन महापालिकेने १०० बेडची ऑक्सिजन बेडची व्यवस्था करता येईल. कुठेतरी म्हणा जसे एखादे मंगल कार्यालय असेल. काही ओपन स्पेसमध्ये आपल्या काही इमारती असतील. त्याच्यामध्ये जर व्यवस्था करता आली तर आपण याच्यामध्ये १५ कोटीची तरतूद करावी असे ताईंचे म्हणणे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १५ कोटी इतकी मोठी रक्कम लागणार नाही.

**मा.सभापती :-** १ कोटी मध्ये संपुर्ण उभे राहील , परंतू इतरही आहे जसे ऑक्सिजन असेल , औषधी असतील, डॉक्टर असतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शासकीय रूग्णालयाकडुन यांना औषधी पुरविल्या जातात आपल्याला फक्त ऑक्सिजन बेडची व्यवस्था करणेकामी आता मी परवाच्या दिवशी आयुक्त साहेबांशी या विषयावर डिस्कशन केलं. साधारण १०० बेडची व्यवस्था करणेकामी साधारण ऑक्सिजनची व्यवस्था करणेकामी ६ ते ७ लाख रूपये खर्च अपेक्षित होता. या विषयी काही सेवाभावी संस्थांशी बोलणे चालु आहे की जेणेकरून ही सामाजिक जबाबदारी आहे. आता ही राज्य शासनाची म्हणा की महानगरपालिकेची म्हणा ही जबाबदारी नसुन ही संपुर्ण समाज व्यवस्थेची जबाबदारी आहे. आणि त्या विषयी दोन तिन मोठया उद्योग समुहांशी बोलणे सुरू आहे. काही भार त्यांनी उचलावा आणि काही भार जिल्हा रूग्णालयातुन औषधांचा उचलला जाईल.कलेक्टर साहेब सुध्दा याच्यामध्ये मदत करण्याच्या संदर्भात सकारात्मक तयार आहेत. म्हणजे ही तरतूद आपण ५० लाखाची , १ कोटींची किंवा २ कोटींची ठेवली तरी पुरेशी आहे. आपण हे बघतोय की महानगरपालिकेवर ही त्याचा एक मर्यादीत भार त्याचा पडावा.समाज व्यवस्थेने त्याचा काही भार उचलावा काही राज्य शासनाने उचलावा.अशा पध्दतीने त्याच्यावर गेल्या चार पाच दिवसांपासुन चर्चा सुरू आहे आणि त्याच १०० बेडचं ऑक्सिजनची व्यवस्था करण्याच्या संदर्भात निर्णयापर्यंत येण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

**मा.आयुक्त :-** सभापती महोदय, हा मुद्दा जो आता उपस्थित केलेला आहे तो अतिशय योग्य आहे. त्याच्यामध्ये कोरोनाच्या प्रसाराच्या वाढत्या पार्श्वभुमिवर आपल्याला नागरीकांना चांगल्या सुखसुविधा देण्याकरीता महानगरपालिकेने ऑक्सिजन बेडची व्यवस्था केली पाहीजे.त्याबद्दल कुणाचं दुमत असायचं काही कारण नाही. परंतू आता सन्मा. नितीनभाऊंनी सांगीतलं त्याप्रमाणे याच्यामध्ये काही मोठे उद्योग असतील, व्यवसायिक असतील किंवा काही एनजीओ असतील. त्याच्याकडुन म्हणा किंवा लोकवर्गणी मधुन ऑक्सिजन बेडची व्यवस्था करणेसाठी त्याकरीता आपल्या महानगरपालिकेतर्फे इमारती सुचवत आहोत.आताची जर परिस्थिती बघितली तर मोठया प्रमाणात रूग्णांना ऑक्सिजनची आवश्यकता भासते आहे.या सगळयांवर पर्याय म्हणुन शहरामधील रूग्णांनाही भासते आणि ग्रामिण भागातील रूग्णांनाही भासते . त्याचा एकत्रित म्हणुन शनिवारी आदरणीय जिल्हाधिकारी , जिल्हा परिषदेचे सीओ साहेब आणि आपले सिव्हिल सर्जन यांच्या सगळयांच्या बरोबर आम्ही मोहाडी रोडला जे शासनाचे महिला रूग्णांसाठीच्या इमारतीचे जे बांधकाम चालु आहे. तीची पाहणी केली आता त्या इमारतीचं बांधकाम बऱ्यापैकी झालेले आहे. त्याच्यामध्ये ४०० बेडची व्यवस्था ही केवळ ऑक्सिजनसाठी करायची असा एक धोरणात्मक निर्णय एकत्रितपणे झाला. हे जे काही ४०० बेड ऑक्सिजनचे होतील याच्यामध्ये शहरामधील ज्यांना आवश्यकता आहे ते रूग्णही असतील आणि आजुबाजुच्या

परिसरामधुन म्हणजे ग्रामिण भागातुन सुध्दा येणार आहेत. तर याच्यामध्ये जिल्हा प्रशासन असेल, जिल्हा परिषद असेल, सिव्हिल सर्जन आणि महानगरपालिका या सगळयांना सर्व मिळुन त्या ४०० बेडची जबाबदारी स्विकारायची आहे.जर गरज भासली तर आपण महानगरपालिकेच्या मार्फत त्याची सर्व व्यवस्था आपण पाहणार आहोत. त्याच्यासाठी जो लागणारा कर्मचारी वर्ग आहे तो जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आपल्याला शासनाच्या निधीचा उपयोग करून उपलब्ध करून घ्यायचा आहे.त्या ठिकाणी स्वच्छता जी आहे ती आपण आपल्या महानगरपालिकेकडुन उपलब्ध करून देणार आहोत. ४०० बेडपैकी १०० बेडची व्यवस्था ही जे आर्युवेदीक मेडीकल कॉलेज आहे आणि ईकरा संस्था यांच्याकडुन होतेय उर्वरीत ३०० बेड जे आपले इंनिनियरींग कॉलेज मध्ये कॉरंटाईन सेंटर केलेले आहेत त्या ठिकाणचे ३०० बेड आजपासुन आपण तिकडे शिफ्ट करायला सुरूवात केलेली आहे. ३०० बेड, कॉट , गादी , उशी आणि सोलापुरी चादरी ही सगळी व्यवस्था आपण त्याठिकाणी करणार आहोत.गरज भासली तर त्यासाठी निधी आपण जिल्हाधिकाऱ्यांकडुन उपलब्ध करून घेवु. जेवण व्यवस्था असेल. फक्त आपल्याला त्याठिकाणी अडचण अशी येतेय की मेडीकल स्टाफची डॉक्टर आणि नर्सेसची तर त्याची व्यवस्था करण्यासाठी आपण राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे विनंती केली आहे. म्हणजे राज्य शासनाचा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन म्हणजे मा.जिल्हाधिकारी अशा सगळयांनी एकत्रित येवुन त्याठिकाणी ४०० बेडचं हॉस्पीटल सुरू करण्याचे आपले प्रयत्न आहेत.कालच पुन्हा त्याठिकाणी व्हिजीटही झाली. साधारण शनिवार पासुन हे ४०० बेड उपलब्ध होतील . अशा दृष्टीचे आपले नियोजन आहे.त्याठिकाणी ऑक्सिजन बेड व ऑक्सिजन सिलेंडर (Dura Cyl) ड्युरासायलचे जे मोठे सिलेंडर आहेत त्यांची व्यवस्था करायचे काम चालु झालेले आहे आणि त्या त्या ठिकाणच्या असणाऱ्या आरोग्य आणि बांधकाम खात्यांच्या यंत्रणांना जिल्हाधिकाऱ्यांनी सुचनाही दिलेल्या आहेत.आपला मोहाडी रोड असेल किंवा शिरसोली रोड असेल तर दोन्ही कडुनही त्याठिकाणी जाता यावं असं त्यांची रस्त्याची दुरूस्ती सुध्दा PWD मार्फत चालु आहे आणि मला तरी वाटत की येणाऱ्या शनिवार पर्यंत ४०० बेड हे जिल्हयाकरीता आपण जर निर्माण केले. तर त्याचा मोठया प्रमाणावर फायदा हा आपल्या शहरातील ऑक्सिजनची गरज असणाऱ्या रूग्णांना होणार आहे.याच्या व्यतिरीक्त सुध्दा काही छोटया छोटया इमारती आहेत. त्या आपण लेवा भवन उपलब्ध करून देतोय त्याठिकाणी साधारण ४० ते ५० बेडची व्यवस्था करणार आहोत. जे मोठे उद्योग धंदे आहेत त्यांना आपण विनंती करतोय की तुम्ही सिएसआय च्या ॲक्टीव्हिटी मधुन काही चालु करा. अशा पध्दतीने जर बघितलं तर ४०० ते ५०० बेड ऑक्सिजनच्या गरजेच्या काळामध्ये आपल्याला त्या परिसरातील रूग्णांसाठी उपलब्ध होईल आणि मोठया प्रमाणावर आपल्याला रूग्णांची व्यवस्था करता येईल. आत्ता सुध्दा आपण आपल्या सीसीसी मध्ये ५ जम्बो सिलेंडर आपण ठेवलेले आहेत. आता जर आपल्याला गरज लागली तर इर्मजन्सी आपल्याला पेशंटला मोठया हॉस्पीटलमध्ये शिफ्ट करण्यामध्ये जो काही टाईम गॅप जातो तो त्याच्यामध्ये जर कुणाला ऑक्सिजनची गरज लागली तर म्हणुन आपण तेथे ५ मोठे सिलेंडर ठेवले आहेत म्हणजे आपण १० पेशंटला आपण तात्पुरत्या स्वरूपामध्ये देवु शकतो अशी व्यवस्था आहे. परंतू सन्मा .सदस्यांच्या सुचना विचारात घेवुन आपण आपल्या कोविड सेंटरमध्ये सुध्दा जास्त रूग्णांना ऑक्सिजनची सोय करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करून त्या दृष्टीने आपण आपल्या बजेट मध्ये तरतूद वाढवु शकणार आहे. परंतू १५ कोटींची तरतूद लागणार नाही . म्हणजे दोन एक कोटींची तरतूद जर आपण केली तरी पुरेशी होईल. आपल्याला राज्य शासनाचा जो व्याजाचा निधी आहे. त्याच्यामधुन कोविड केअर सेंटरसाठी खर्च करायला मुभा दिलेली आहे.तो निधी आपल्याकडे आहे त्यामुळे मनपा निधी अधिक राज्य शासनाकडुन मिळणारा निधी मागच्याच आठवड्यात मा.जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्याला कोविडच्या व्यवस्थेसाठी १ कोटीचा निधी मंजुर केलेला आहे आणि तो निधी आपल्याला मिळालेला आहे.अशा पध्दतीने राज्य शासन म्हणजे वित्त आयोग जिल्हा प्रशासनाकडुन मिळणारा हा जो आपत्ती व्यवस्थापनाचा निधी आहे आणि आपण आता आपल्या अंदाजपत्रकामध्ये निधीची तरतूद करतोय. अशा सर्व निधींच्या माध्यमातुन आपण शहरातील रूग्णांना चांगल्या पध्दतीने सेवा देणार आहोत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पेज नंबर २७ , स्मशानभुमि मोफत दहन करणेसाठी त्याला प्रशासनाने तरतूद केलेली नाहीये त्यासाठी १ कोटीची तरतूद करण्यात यावी.तसेच पेज नंबर २८ अ.क्रं.३ बालगंधर्व खुले नाट्यगृह व्यवस्था व दुरूस्ती त्याला प्रशासनाने ५ लाख रूपये तरतूद केलेली आहे. बालगंधर्व नाट्यगृह आपल्या महानगरपालिकेचे एकमेव नाट्यगृह आहे आणि ते मध्यवर्ती ठिकाणी असुन सगळयांच्या सोईचं आहे आणि त्याची देखभाल दुरूस्ती साठी जी काही कामे करायची असतील. तर त्याच्यासाठी लागणारा जो निधी आहे. तर तो पुरेसा व्हावा म्हणुन २५ लक्ष रूपयांची तरतूद करण्यात यावी. तसेच पेज नं.२९ सार्वजनिक उद्याने व्यवस्था

व दुरूस्ती विषय क्रं.३ याच्यासाठी १५ लाखांची तरतूद आहे.म्हणजे प्रशासनाने १५ लाखाची तरतूद केलेली आहे. तर आमचे म्हणणे आहे की प्रभाग समिती निहाय २ लक्ष रूपये , प्रभाग समिती क्रं.१ प्र.स.क्रं.२ , प्र.स.क्रं.३ आणि प्र.स.क्रं. ४ अशी प्रत्येक प्रभाग समिती निहाय दोन दोन लक्ष अशी १५ लाखांच्या ऐवजी ८ लक्षांची तरतूद करण्यात यावी.बगीचे सुशोभीकरण त्याला १० लाख तरतूद आहे . त्याला ५ कोटींची तरतूद करण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कशाला ?

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बगीचे , मोठे बगीचे सुशोभीकरण करणेसाठी

**मा.सभापती :-** नितीनभाऊ मेहरूणचा जो बगीचा आहे. तसेच इतर काही भागामध्ये मोठया काही जागा असतील त्याच्यावर आपण बगीचे सुशोभीकरण करू शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला एक सांगा राजुभाऊ

**मा.सभापती :-** आता मागच्या अर्थसंकल्पामध्ये मागच्या सभापतींनी बॉटनीकल गार्डनची मागणी केलेली होती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण मागण्याही केल्या, त्याचा गाजावाजा ही झाला.परंतु मागच्या वर्षामध्ये त्यांनी अर्थसंकल्पामध्ये जी काही तरतुदी केल्या असतील. त्या तरतुदींचा किती स्वरुपात ते पुर्ण होऊ शकल्या. नुसते फक्त कसे आहे की, कुठेतरी तरतुदी करायच्या आणि आकडे दाखवायचे.आपण मागच्या वर्षाचा अर्थ संकल्प उघडुन बघावा आणि प्रत्येक बजेटला आपण केलेल्या तरतूदी आणि त्या तरतूदींच्या अनुषंगाने किती परसेंट मध्ये त्या तरतूदी पुर्ण झाल्या आहेत याचं थोडंस आपण अध्ययन केलं तर लक्षात येईल.उद्यानांच्या बाबतीत तरतूद करण्यास काही हरकत नाहीये. परंतू याच्यामध्ये उद्यांनांवर आपण कितीही मोठी तरतूद केली तर आपण किती प्रमाणात चांगल्या पध्दतीने विकसित केले तरी महानगरपालिकेकडे तिथं सक्षम मनुष्यबळ आजही नाहीये की त्या उद्यांनांचे देखभाल दुरूस्ती करू शकेल आणि त्याची परिस्थिती पुन्हा तिच होईल. आपले जे मध्यवर्ती भागात जे उद्यान होतं त्याची काय अवस्था झालेली होती , शामाप्रसाद मुखर्जी उद्यान आजही तुम्ही तिथं जाल व बघाल तर त्याची परिस्थिती फार अशी समाधान कारक नाहीये की ज्याला आपण उद्यान म्हणु शकु अशीही परिस्थिती नाहीये.म्हणुन माझं म्हणणं काय आहे की आताच तिन दिवसांपुर्वी भरतदादा अंमळकरांना शामाप्रसाद मुखर्जी उद्यान केशवस्मृती प्रतिष्ठान किंवा जनता बँकेच्या माध्यमातुन किंवा त्यांच्या ज्या काही संबंधित संस्था असतील त्यांच्यामाध्यमातुन देखभाल , दुरूस्ती आणि विकास व सुशोभीकरण करणे याच्याबाबतीतील एक रितसर प्रस्ताव त्यांना देवुन झालेला आहे.तर या गोष्टी काय आहे की ज्या एनजीओस असतील किंवा कंपनीस असतील याच त्यांच योग्य पध्दतीने देखभाल आणि नियोजन करू शकतात .आज आपण दोघ उद्यानं बघा. आपण दोघं उद्यानं जैन उद्योग समुहाला देखभाल व दुरूस्ती करीता दिलेले आहेत. आज भाऊंचे उद्यान बघा साधारणत: ४ वर्ष झालेले आहेत. तितकाच खर्च कधी जळगांव महानगरपालिकेने केला असता . तर त्या उद्यानांची अवस्था आज खेळण्यालायक सुध्दा राहीली नसती. परंतू ज्या कंपनीस ज्यांच्याकडे सिएसआर फंड असतो . त्या सिएसआर फंडातुन ते मेंटेंन करू शकतात आणि त्यांच्याकडे तेवढी मॅनपावर असते त्यांच्याकडे तितकं मनुष्यबळ असतं तितकी मशिनरी असते. आपल्या कडे आपण बघतो की स्ट्रिट लाईट बंद झाला तर नागरीक आपल्याला बोलायला येतात आणि आपण चार वेळा सांगतो . तर कुठेतरी १५ दिवसांनंतर तो स्ट्रिट लाईट बदलला जातो.परंतू उद्यांनांची परिस्थिती त्याच्यापेक्षा वाईट होवुन जाते.यासंदर्भात ज्या काही सेवाभावी संस्था पुढे येत असतील. त्यांना विनंती करायला पाहीजे. त्यांच्याकडे पदाधिकाऱ्यांनी जावुन त्यांना या संदर्भातील आग्रह धरायला पाहीजे की आपल्या या संस्था योग्य पध्दतीने समाजासाठी काम करतं आहेत. म्हणुन मी बहिणाबाई उद्यानाच्या संदर्भात भालचंद्र दादा पिपल्स बँकेचे त्यांच्याशी बोललो तर ते बोलले की बहिणाबाई उद्यान या नावाशी सामाजिक भावना त्यांच्याशी जुळलेल्या आहेत. म्हणजे एक समाजाच्या भावना जुळलेल्या आहेत समाजाच्या अनुषंगाने आणि आम्ही तुम्हाला एक जुने जळगांवमधील शाळा दत्तक दिली आहे . ती शाळा सुध्दा त्यांनी अडीच तिन कोटी रूपये खर्च करून सिबीएससी पॅटर्नची त्या परिसरातील गरीब मुलांना योग्य पध्दतीचं शिक्षण देताहेत. त्याच पध्दतीने आपले शाहु महाराज रूग्णालय स्व.रामदास पाटील ट्रस्टच्या माध्यमातुन आज ते रूग्णालय सुव्यवस्थेत चालु आहे.त्या संस्थेमार्फत तुम्ही सामाजिक बांधिलकी जोपासत पिपल्स बँकेच्या माध्यमातुन बहिणाबाई उद्यान हे दत्तक घ्यावे आणि दत्तक घेवुन आपल्या संस्थेच्या माध्यमातुन त्याचं चांगल्या पध्दतीचे सुशोभीकरण करावं आणि त्याच्या देखभाल व दुरूस्तीचा खर्च करावा.त्यांनी सांगीतले की ३१ मार्च नंतर आम्ही पुर्ण पॅनलची बैठक घेवु आणि निश्चितपणे तुमच्या विनंतीचा आम्ही विचार करू. तर या गोष्टी आपल्या पेक्षा कोणी संस्था चांगल्या पध्दतीने हाताळत असतील. तर निश्चितपणे आपण त्यांना आवाहन करून अशा संस्थांना जर कधी दिल्या तर आपल्या महानगरपालिकेचा पैसाही वाचेल आणि पैसा

वाचणे हा त्याच्यातील मुख्य हेतू नाहीये. त्याची देखभाल दुरूस्ती निदान योग्य पध्दतीने राखली जाईल.आपण महानगरपालिकेच्या अखत्यारीत ज्यावेळेला या वास्तु ठेवतो. आपल्याशी सामान्य नागरीकांची एक वेगळी अपेक्षा असते . त्यांना लग्न कार्य करायचे असेल तर ते तुमच्या कडे येतील , माझ्याकडे येतील . समजा कुलभुषण भाऊ म्हंटले भाऊ आमच्याकडे कार्यक्रम आहे. तिथे एखाद्या संस्थेला दिल्यानंतर त्या संस्थेचे जे काटेकोरपणे नियम असतील.त्या नियमांचे पालन करतांना आपल्याला सांगावं लागतं की आम्ही ती जबाबदारी अमुक अमुक संस्थेकडे दिलेली असल्याकारणाने त्यांची जी काही नियमावली असेल त्या नियमावलीचं पालन करणं हे अपेक्षित आहे. ते जर तुम्ही पुर्ण करतं असाल तरच ते तुम्हाला परवानगी देतील. परंतू आपल्याला तशा गोष्टी अव्हेर करता येत नाही आणि त्यामुळे त्या उद्यानांची वाट लागते.तर मला वाटते की आपण याच्यावर खर्च न करता . जी काही उद्याने आपली असतील जसे पारीख पार्क उद्यान असेल. शामाप्रसाद मुखर्जी उद्यान असेल त्याचे भरत दादांना सांगीतले आहे त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन त्याच्यामध्ये ठेवलेला आहे.मी म्हटंले की दत्तक म्हणुनच घ्या. दत्तक म्हणुन घेतलं त्यांना त्याठिकाणी त्यांच एखादं झुणका भाकर केंद्र चालवायचे आहे. तो एक सामाजिक भवनेचा व योजनेचा भाग आहे.जे आता सामान्य नागरीकांना जे जेवण मिळत . तिथे त्यांना थोडी जागा ॲडजेस्ट करून दिली. तर जी जागा त्याच्यातुन एक सामाजिक हे जोपासला जातो आणि याची एक त्याची देखभाल व दुरूस्ती हा एक भाग त्याच्यातुन साध्य होतो तर अशा दृष्टीकोनातुन पण विचार करायला पाहीजे.

**मा.सभापती :-** नितीनभाऊ आपण जे सांगीतलं त्यातील मलाही पटतय परंतू ते बाहेरचे जे विकसित केलेले आहे. त्याच्यात एनजीओ जे असतील ते काम करायला तयार नसतील. आता मध्यवर्ती ठिकाणी एनजीओ काम करतात डेव्हलप करतात. परंतू जो बाहेरचा जो परिसर आहे समजा आता मी जे सांगीतले आता तुम्हाला मेहरूणचा जो बगीचा आहे. जर तिथे काम करत असतील तर हरकत नाही. पण जर कुणी यायला तयार असेल तर महापालिकेच्या गरजेकडे पण लक्ष देणं गरजेचं आहे. काय आहे की बगीचा तिथे डेव्हलप आहे त्याच्यामध्ये फक्त सुधारणा करायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ मला एक सांगा आता त्याच्यासंदर्भात शिवाजी उद्यान आणि संपुर्ण मेहरूण तलाव याचा साधारणत: एक ३५ कोटी रूपयांचा प्रस्ताव आपण त्यावेळेला डिपीडिसीच्या माध्यमातुन मान्य केलेला आहे.त्यावेळेला मी महापौर होतो. मला वाटतं आयुक्त नसतील तेव्हा ३५ कोटी रूपयांचा आराखडा याच्यामध्ये संपुर्ण शिवाजी उद्यानचं नुतनीकरण आणि संपुर्ण मेहरूण तलावाचं सुशोभीकरण करणे आणि तो आम्ही मान्य करून पर्यटन विभागाला सादर केला होता आणि त्यावेळेला पर्यटन विभागाकडुन मान्य होवुन ५ कोटींची तरतूद मंजुर होवुन तो निधी मंजुर होवुन आला. तो निधी मंजुर होवुन आला परंतू त्यावेळेला अडचण ही निर्माण झाली की तो खर्च मनपाच्या माध्यमातुन करायचा की सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन करायचा. हा निधी आज जवळपास ४ वर्षापुर्वी मंजुर झालेला निधी आहे. त्याच्यापैकी ५० लाख रूपये येवुन पडले आहेत. नंतर त्याचा कुणी पाठपुरावा केला नाही.त्याचे टेंडर झालेले आहे. टेंडरही भरले गेलेले आहे.त्याच्यापैकी काही कामांना सुरूवातही झालेली आहे.अश्विनभाऊ सोनवणेंना याची कल्पना पुर्णत: आहे. तर आता जो निधी राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागाच्या माध्यमातुन मिळवता येईल. जिल्हा वार्षिक नाविण्यपुर्ण योजनेमधुन मिळवता येईल. जसे त्यावेळेला गणेश घाटसाठी पालकमंत्री संजयजी सावकारे होते. तर त्यांनी त्यावेळेला डिपीडीसीच्या माध्यमातुन शहरी भागाला जास्त निधी देण्याच्या संदर्भातही खुप मोठ्या अडचणी आहेत खुप मोठ्या मर्यादा आहेत . काही नाविण्यपुर्ण कामं सुचवलं तर त्याचा आपण निश्चितपणे समावेश करू आणि त्यावेळेला संजय सावकारेंच्या माध्यमातुन १ कोटी रुपयांचा निधी मंजुर करून त्याच्यामधुन गणेश घाटची निर्मिती झाली.आता सन्मा.पालकमंत्री .गुलाबरावजी पाटील साहेब आहेत. त्यांनी डिपीडीसीच्या माध्यमातुन आता आज अंतिमत: आकडेवारी आज संध्याकाळ पर्यंत समजेल . परंतू इतिहासामध्ये मिळाला नसेल तितका निधी आपल्याला त्यांनी डिपीडीसीच्या माध्यमातुन मान्य केलेला आहे.साधारणत: निअर अबावु ती २९ ते ३० कोटींच्या जवळपास ती रक्कम आहे आणि १०० टक्के मान्य आहे. आत्ता गुलाबभाऊंचाच फोन होता मला आणि मी आयुक्त साहेबांनाही सकाळी फोन करून सांगीतले. तसेच त्यांनी सांगीतले की अग्निशमन योजनेखालील काही निधी तिथे पडलेला आहे म्हणे तो जर तुम्हाला आवश्यक असेल आता कुलभुषण भाऊंनी सांगीतले की असे आहे. तर म्हणे आपण मागच्या महासभेमध्ये पिंप्राळा फायरस्टेशनचा प्रस्ताव केला आहे.मी आत्ता ती ठरावाची कॉपी मी माझ्या कॅमेरात घेतली आणि त्यांच्या पीएंना पाठवली आणि गुलाबभाऊ म्हणाले की मी ऑनवे आहे. परंतू मी प्रस्ताव मागवले आहेत. तर अशा व्यक्तीने

**मा.सभापती :-** नितीनभाऊ अग्निशमनचा जो निधी आहे. त्या निधीमध्ये आता आपल्या जळगांव शहरामध्ये जो स्लम एरीया आहे किंवा गावठाण एरीया आहे तर त्याएरियामध्ये जाण्यासारख्या गाड्या आपल्याकडे नाहीये जर आपण त्या निधीमधुन छोट्या गाडया घेतल्या तर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ तुमचं म्हणणं बरोबर आहे. परंतू त्याला बेसिक प्रॉब्लेम काय आहे की आपल्याकडे जो ठराव झालेला आहे आत्ता जर आपण त्याच नियोजन केलं तर कारण ही महासभा नाहीये. तर पुढच्या वर्षाचा जो काही निधी असेल जसे आपण म्हणताहेत की लहान गाड्या घेण्याच्या दृष्टीकोनातुन तेही नियोजन आपण करूया आणि हा जो निधी आहे तो लॅप्स होवुन जाणार आहे. म्हणुन पालकमंत्री महोदयांनी सांगीतले की तुमच्याकडे फायरच्या संदर्भातील काही प्रस्ताव असेल तर तो तातडीने पाठवा. तर आपण त्यांना मागणी तिच केली की साधारणत: फायर स्टेशन उभारण्यासाठी कमीत कमी दिड कोटी रूपयांचा निधी आपण उपलब्ध करून द्यावा.दिड मिळेल , एक मिळेल , पन्नास मिळेल जो काही मिळेल . परंतू जो निधी आपला नाहीच आहे. तसा निधी ओढुन आणायचा प्रयत्न केला आहे. अनेक योजना आहेत शासनाच्या आता योग्य पध्दतीने त्याचा पाठपुरावा झाला . म्हणजे आपण आपल्या उत्पन्नावर जास्त विसंबुन न राहाता योग्य प्रकारे नियोजन करून शासकीय योजनांचा जास्तीत जास्त फायदा या शहराला कसा करून देता येईल.याचे प्रयत्न केले तर जास्त योग्य राहील.

**मा.सभापती :-** नितीनभाऊ आता आपण म्हणाले की शासनाकडे हात पसरवायचे नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ दोन मिनिटं जो निधी ऑलरेडी शासनाने अरोगेट केलेला आहे. तिथं तो निधी महानगरपालिका आणि इतर नगरपालिका मिळुन तो निधी साधारणत: तिन तिन कोटी रूपये दिलेला आहे.परंतू त्या नगरपालिकांकडुन सुयोग्य प्रस्ताव विहीत वेळेमध्ये सादर न झाल्यामुळे तो निधी व्यपगत होवुन राज्य शासनाकडे परत जाईल.अशा निधींवर डोळा ठेवुन तो निधी शासनाकडे परत न जाता जर तो या शहरासाठी वापरला गेला तर मी म्हणतो चांगली आणि आनंदाची गोष्ट आहे. कारण वेगवेगळया योजनांवर शासन हे डोळे ठेवतेच आहे.ज्या ठिकाणी योग्य पध्दतीने निधीचे नियोजन होत नसेल तसे निधी आणत जावु तसाही तो निधी परत जातो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पेज नंबर ३१ नाही पेज नंबर ३० सार्वजनिक बांधकाम विभाग इमारत व्यवस्था व दुरूस्ती

**मा.सभापती :-** त्यातला अ.क्रं. सांगा ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्याचा अ.क्रं.८ प्रभाग समितीमध्ये पेज नं.३० अ.क्रं. ६ , सार्वजनिक बांधकाम विभाग इमारत व्यवस्था व दुरूस्ती मा.आयुक्त साहेबांनी त्याच्यामध्ये ५० लक्षची तरतूद केलेली आहे.ती १ कोटीची करण्यात यावी.आपल्या बऱ्याच प्रभाग समितींची दुर्दशा अशी झालेली आहे की जसे आपले प्रभाग समिती क्रं. ४ तर तिथे बसायला जागापण नाहीये . घरपट्टी वसुली होते तिथे त्याठिकाणी प्रभाग अधिकाऱ्यांना बसण्यासाठी व्यवस्था नाहीये.तर त्यासाठी प्रभाग समिती १ साठी २५ लक्ष , प्रभाग समिती क्रं. २ , ३ व ४ यांच्यासाठी २५ लक्ष प्रमाणे तरतूद करण्यात यावी.पेज नं. ३१ अ.क्रं. १७ रस्ते व्यवस्था व दुरूस्ती १५ लाख रूपये प्रशासनाने तरतूद केलेली आहे.त्याच्यामध्ये प्रभाग समिती क्रं. १ , २ , ३ आणि ४ यांना २५ / २५ लक्ष रस्ते व्यवस्था व दुरूस्ती करीता करण्यात यावी. त्यातीलच पेज नं. ३१ अ.क्रं. २३ चा विषय आहे. गटार व्यवस्था व दुरूस्ती त्याला आयुक्त साहेबांनी १ कोटीची तरतूद केलेली आहे. तर आमची मागणी आहे की ती गटार व्यवस्था व दुरूस्ती साठी ३ कोटींची करण्यात यावी.

**श्री.अमित काळे :-** पेज नं. ३२ , अ.क्रं. ३५ व्यापारी संकुल इमारत व्यवस्था व दुरुस्ती याच्यामध्ये ५० लक्ष रूपये आयुक्त साहेबांनी मंजुर केलेले आहेत. तर त्यासाठी ५ कोटी तरतूद करण्यात यावी अशी मागणी आहे.मगाशी नितीनभाऊ बोलले की महानगरपालिकेला आर्थिक सोर्स , इन्कम सोर्स वाढण्यासाठी आपल्याला मार्केट खुप इम्पॅटन्ट आहे. तर प्रभाग समिती क्रं. १ ,२ ,३ आणि ४ साठी १० लक्ष तरतूद करण्यात यावी ही मागणी आहे. पुतळा व्यवस्था व दुरूस्ती साठी ३ लाख सांगीतले आहे तर १० लाख तरतूद करण्यात यावी. प्लस तसेच प्रभाग समिती क्रं. १ ,२ ,३ आणि ४ साठी प्रत्येकी १ लक्ष तरतूद करण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पेज नं. ३३ अ.क्रं. ५४ नगरसेवक निधी तर प्रत्येक नगरसेवक ५ लाख याप्रमाणे ८० नगरसेवकांसाठी ४ कोटी तरतूद प्रशासनाने केलेली आहे. तर ती ४ कोटी करण्यात यावी. पेज नं. ३३ अ.क्रं. ५५ आहे दिशादर्शक व रस्ते मार्गदर्शक दोन कोटी तरतूद केलेली आहे प्रशासनाने तर आमचीपण मागणी आहे की ती २ कोटी करावी. पेज नं. ३५ अ.क्रं. ५ आहे क्रीडा स्पर्धा , महापौर चषक मा.आयुक्त साहेबांनी ५ लक्षची तरतूद केलेली असुन ती ५ लक्ष ऐवजी १० लक्ष करण्यात यावी असे आयुक्त साहेबांनी आता सांगीतलेले आहे

आणि आमचीही त्याला मान्यता आहे ती तरतूद १० लक्ष करण्यात यावी. पेज नं. ३५ मधीलच अ.क्रं. १० वरचा विषय आहे राष्ट्रीय विजेता योजना

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आपण तरतूद करतोय महापौर चषक वगैरे परंतू मागील दोन वर्ष बघा १ रूपयाही त्याच्यावर खर्च झालेला नाहीये .

**मा.सभापती :-** भाऊ कोविड मुळे मागच्या वर्षी कुठल्याही स्पर्धा घेण्यात आलेल्या नाहीत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आताही तिच परिस्थिती आहे

**मा.सभापती :-** भाऊ त्याच्यात

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता परिस्थिती त्याच्यापेक्षा भयानक आहे.

**मा.सभापती :-** पुढील चार सहा महिन्यात

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता आपण नगरसेवक निधीची तरतूद केलेली होती किती नगरसेवकांना निधी वितरीत केलेला आहे. नगरसेवक निधीची मागच्या अर्थसंकल्पातही तरतूद केलेली होती. किती नगरसेवकांना नगरसेवक निधीचा फायदा झाला.

**मा.सभापती :-** नगरसेवकांनी मागणी करायला पाहीजे भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो म्हणजे

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय माझे पत्र दिले आहे आयुक्त साहेबांना

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ नगरसेवक मध्ये तुम्ही सुध्दा येतात. आपण जी तरतूद केलेली होती परंतू प्रत्यक्षात आपण कोणत्याच नगरसेवकांना फायदा झाला नाही आणि हे तिसरे अर्थसंकल्प आहे तुमचा मला सांगा की मागील अडीच वर्षामध्ये नगरसेवक निधीचा खऱ्या अर्थाने किती नगरसेवकांना त्याचा लाभ झाला.

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ मागणीच केली नाही म्हणताहेत ते नगरसेवकांनी

**श्री.किशोर बाविस्कर :-** मी स्मशानभुमि साठी मागणी केली होती.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ ७० हजार झाली आहे स्मशानभुमिसाठी

**मा.सभापती :-** मागे एक संस्था आली होती यासाठी

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही नगरसेवक निधीच्या संदर्भात विचारतो आहे.

**मा.सभापती :-** नाही नाही  एक संस्था आली होती त्यांनी मागणी दिली होती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण ती नितीन बरडे यांच्या संस्थेला दिली होती दिली म्हणजे मंजुर केले पण लबाडाचं आमंत्रण जेवल्यावर खर असतं.

**मा.सभापती :-** नाही मला वाटले की आपण दिले होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही त्यांच्या चपला घासुन जातील परंतू निधी मिळणार नाही.अहो येथे नगरसेवकांचे मानधन मिळत नाहीये.

**मा.सभापती :-** नितीन भाऊंनी घेतले आहे का ते विचारा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नगरसेवक यांच २००८ ते २०१३ चं नगरसेवकांचे मानधन अजुन बाकी आहे.

**मा.सभापती :-** तुम्हीच काढुन द्याल त्यांना

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे २००८ ते १३ चे नगरसेवकांचे मानधन तुम्हाला दाखवतो .

**मा.सभापती :-** प्रशासन सांगेल ना नगरसेवकांचे मानधन कीती बाकी आहे ते किंवा त्याची काय अवस्था आहे ते तर आयुक्त साहेब सांगा माहिती कुठल्या महिन्यापर्यंत काढले आहे ते तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** नगरसेवक मानधन २००८ ते २०१३ म्हणजे त्यातील काही जण स्वर्गवासी होवुन गेले आहेत.

**मा.सभापती :-** तेव्हा आम्ही नव्हतो ना भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** स्वर्गवासी झाले आहेत. अहो पण तुम्ही

**मा.सभापती :-** तेव्हा आम्ही नव्हतो ना भाऊ तुमच्या चुका आमच्यावर थोपता आहेत का

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो आमच्या कडुन चुका झाल्यात पण मी काय म्हणतो की तुम्ही दिले असते तर त्याचे श्रेय त्या नगरसेवकांनी तुम्हाला दिले असते.

**मा.सभापती :-** आम्ही देतोय आमच्या काळातील देतोय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २००८ ते २०१३ चे २० लक्ष १२ हजार ५०० रूपये मानधन हे त्यावेळेच्या नगरसेवकांचे बाकी आहे .त्यातील काही नगरसेवक हे स्वर्गवासी झाले आहेत.

**मा.सभापती :-** भाऊ आपण प्रशासनाला सांगा

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच्यानंतर २०१३ ते २०१८चे मानधन

**मा.सभापती :-** आयुक्त साहेब मानधनाचे बाबतीत उत्तर द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे काय आहे की आपण सगळया तरतूदी करतो , की महापौर चषकासाठी तरतूद , बगींच्यासाठी तरतूद परंतू नगरसेवक निधीसाठी तरतूद गेल्या अडीच वर्षात एकही रूपया नगरसेवक निधीचा प्रत्येक वेळेला तरतूद जशी केली तशीच राहीली . एक रूपयाही ,खर्च नाहीये त्याच्यातील मग ज्या गोष्टी शक्यच नाहीयेत . मग उगाचच कस आहे की खोटं समाधान देवु नका.

**मा.सभापती :-** भाऊ मागच्या अर्थसंकल्पात असे काही हेड आहेत की त्याच्यामध्ये कुठलीही तरतूद केली जात नाही कुठलाही खर्च होत नाही. तरी सुध्दा ते हेड तसेच्या तसे पुढे ओढले जातात

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते मान्य आहे भाऊ परंतू आपण त्याचा प्रक्टीकली विचार करा की ज्या गोष्टी आपल्याकडुन होवु शकत नाहीत . आपल्या चड्डीला इतके ढिगळं लागलेले आहेत की ढिगळं ते पुर्ण करता करता आपल्याला सहन होत नाही आणि मग आपल्याला वाटतं की हा आपण अर्थसंकल्प सादर केला परंतू आपण आज सांगतो नगरसेवकांना खुष करण्यासाठी सांगतो की हा नगरसेवक निधी

**मा.सभापती :-** तरीही नगरसेवक निधीची तरतूद करावीच लागेल ना नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** जर नगरसेवक निधिची तरतूद केल्यानंतर त्या नगरसेवक निधीचा फायदाच त्या नगरसेवकांना होत नसेल तर मग उगाचच कशाला असे खोटे स्वप्न दाखवायचे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ अडीच वर्ष झाले काहीच मिळाले नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** नगरसेवकांनी मागणी केली नाही तर मिळत नाही का सन्मा.सभापतींचं म्हणणे असे आहे का खरय का हे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ मागे ७ कोटी रूपये मंजुर होते अजुन काही नाही. ब्राम्हण सभेजवळील अंडरपास साठी

**मा.सभापती :-** मला कोणी सांगीतले नाही ना मी केलं असत सांगीतले असते तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ

**मा.सभापती :-** मानधन दिले नाही ठिक आहे प्रशासनाकडे तुम्ही गेलात आयुक्त साहेबांना सुचना केल्या असत्या तश्या

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ एक सांगु का कुठेतरी आपण या दोन अडीच वर्षामध्ये पाठपुरावा करण्यासंदर्भात कुठेतरी कमी पडलात. घोषणा करण्यामध्ये तुम्ही एक नंबर होतात त्याच्यामध्ये काही दुमत नाही. परंतू मला आता सांगा जसे आता नवनाथभाऊंनी सांगीतलं . की ब्राम्हण सभेच्या जवळील .

**मा.सभापती :-** भाऊ आम्ही ज्या घोषणा केल्या त्या तुमच्या समोर आहेत ना तेही होते आमच्यासोबत

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो राजुभाऊ त्यांच्या घोषणांची पुर्तता करण्याचे आम्ही वचन दिलेलं आहे. ब्राम्हण सभेच्या जवळील अंडरपास या गोष्टी नाही शक्य या साठी त्यांना समजावुन सांगा की आता आपली आर्थिक परिस्थिती नाहीये.आपण तो पुन्हा दोष केला.

**मा.सभापती :-** सांगा साहेब अंडरपासचा काय विषय आहे तो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ब्राम्हणसभेजवळील अंडरपास च काय झालं

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आता मागच्या आठवड्यात विभागीय अभियंत्यांना भेटुन आलोय मी

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरं

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** तर आता आपल्याला जी दुरूस्ती करायची आहे अंडरग्राऊंडची आणि ड्रेनेजचा पण विषय होता. तर ते दुरूस्ती करून प्रस्ताव देताहेत आता

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा त्या गोष्टीला मागच्या अर्थसंकल्पापासुन हा अर्थसंकल्प म्हणजे एक वर्षाचा कालावधी मी महापौर असतांना चार वर्षापुर्वी बंजरंग बोगद्याचे काम केले त्यावेळेला निधिची परिस्थिती याच्यापेक्षा खुप बिकट होती. परंतू तुम्ही त्याच्यामध्ये सातत्य नाही ठेवलं त्याचा पाठपुरावा नाही केला . प्रशासकीय यंत्रणा आपली म्हणा किंवा प्रशासकीय यंत्रणा रेल्वेची म्हणा गेल्याशिवाय प्रस्ताव पुढे सरकत नाही.त्याच्या काही अडचणी असतील त्या अडचणी समजुन त्या सुध्दा सोडविण्याच्या संदर्भात प्रयत्न करावे लागतात. जितुभाऊ मला वाटतं सभापती होते. जागेची संकल्पना गिरणा पंपीगच्या तिथे काय झालं त्या गोष्टीचं त्या विषयाची संकल्पना

**मा.सभापती :-** भाऊ विषय बोगद्याचा करताहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नागरीकांना दिलासा देण्याच्या विषयाच्या संदर्भात

**मा.सभापती :-** आता शिवाजी नगरचा उड्डाणपुल किती वर्षांपासुन ते करायला पाहीजे होते .

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ तुमच्या माहितीसाठी सांगतो

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** राजुभाऊ तो आज किती वर्षापासुन काम चालु आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ

**मा.सभापती :-** सुरुवात झाली असेल कामचं झालेले नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अजुन साधे पोल झालेले नाहीयेत .

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ

**श्री.कुलभुषण पाटील :-** परिस्थिती अशी झालेली आहे की ते काम बंद आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ ही परिस्थिती यांच्यामुळेच झालेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ मला सांगा आता आपला पत्र व्यवहारही आहे आणि त्याचा पाठपुरावा चंद्रकांत दादा पाटील पालकमंत्री होते जळगांव जिल्हयाचे आणि भरत दादा या गोष्टीचे साक्षीदार आहे. त्यांच्या माध्यमातुन मी कमीत कमी दहा वेळा पाठपुरावा केला.त्या हिशोबाने कुठे त्या कामाला चालना मिळालेली आहे.परंतू आज मला सांगा त्यावरून ५० हजार ते १ लाख लोकांची दैनंदिन वाहतुक असतांना सुध्दा आपल्याला अजुन इतकं गांभीर्य नाहीये . आज आपली अवस्था अशी आहे की एक कोटी की दिड कोटी त्याला पोल शिफ्टींगला होती .

**मा.सभापती :-** अहो आम्हाला गांभीर्य नसतं तर आम्ही कामचं सुरू केले नसते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ ती तेवढीच नाहीये

**मा.सभापती :-** गांर्भीयाचा विषय करता ना तर आम्ही कामालाच सुरूवात केली नसती

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो कामाची सुरूवात

**मा.सभापती :-** आम्हाला त्याचं गांभीर्य होते म्हणुनच कामाला सुरूवात केली होती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो कामाची सुरूवात केली असती ना तर मी म्हणतो ती आनंददायी असते. आज दिड वर्ष झाले नगरसेवक जे बोलताहेत.

**मा.सभापती :-** ज्यांनी काम केले नाही त्यांनी तो विषय करू नये .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ तुमचे ठेकेदार दोन दोन वर्ष झाले काय करता आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज त्या भागातील नागरीक रेल्वेच्या पट्टयावरून जिव मुठीत घेवुन तिथुन प्रवास करताहेत.

**श्री.कलभुषण पाटील :-** राजुभाऊ जे सत्य आहे ते बोलताहेत

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज तो पोल शिफ्टिंगचा विषय आहे आणि त्याच्यामुळे ते कामं पुर्ण होत नाही गंभीर बाब आहे ही काम केल्याचं समाधान नाही लोकांना काम ज्या पध्दतीने चालु आहे आणि ज्या व्यक्तीमुळे नागरीकांचे जिव धोक्यात असतील. तर त्याच दुख: त्याच्यापेक्षा मोठ आहे.म्हणजे याच्यापुर्वी जे होत ते जरी आता राहीलं असतं तरी ते चाललं असतं म्हणता.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ ३ वर्ष थांबवता आहे म्हणे तो लोकांचा जिव धोक्यात आहे काय करायचे आम्ही ऐकले आहे की कोविड मुळे थांबवले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** कोविड मुळे सगळं झाकलं जात आहे हे .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** इकडे आकडे दाखवता आहे ३७ कोटी २५ कोटी पण काहीच नाही अजुन

**श्री.कलभुषण पाटील :-** पिंप्राळा पुलाचं काय आहे

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आसोदाचे काय

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ, टी करायची संधी आहे आपल्याला, आता करा नामंजुर.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही थांबविले ना, का थांबविले.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पेज नं.३५ अ.क्र.१० आर्थिक मदत ५० लक्ष तरतुद करणे, पेज नं.३५ अ.क्र.०१ दिव्यांग कल्याण निधी ही २ कोटी तरतुद असुन ही ३ कोटी करण्यास प्रशासनाने सांगितल्या प्रमाणे त्याला ३ कोटी तरतुद करणे मान्य आहे. पेज नं.३६ महिला व बालकल्याण निधी अ.क्र.१, स्मये दोन कोटीची तरतुद होती त्याला आता या वर्षी तिन कोटीची तरतुद केलेली आहे. तीन कोटीची तरतुद मान्य आहे. पेज क्र.३६ अ.क्र.०८ प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य करीता एक लक्षाची तरतुद करणे. पेज क्र.४० अ.क्र. ०३ प्राथमिक शिक्षण विभाग, क्रिडा स्पर्धा व लोक प्रशिक्षण वर्ग, पाच लक्ष तरतुद करणे, पेज नं.४२ संकिर्ण अ.क्र.२० आर्बिट्रेट फी एक कोटीची तरतुद करण्यात यावी. पेज नं.४२, अ.क्र.३५ मा.आयुक्त यांनी महसुली जमा मधुन १४ कोटी ३५

लक्ष पाणी पुरवठा विभागाकडे वर्ग केलेले आहे. ती रक्कम रु.१४ कोटी ३५ लक्ष ऐवजी ७.५३ कोटी वर्ग करावी. पेज नं.५० अ.क्र.४९ भांडवली जमा महाराष्ट्र सुवर्ण जयंती मा.आयुक्त साहेब यांनी ३० कोटीची तरतुद केलेली आहे. आमची मागणी आहे १०० कोटीची तरतुद करण्यात यावी. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी आपल्याला १०० कोटी दिलेले होते. ती १०० कोटीची रक्कम जमा करण्यात यावी.

**श्री.अमित काळे** :- पेज नं.५१ भांडवली खर्च नविन गटारी करण्यासाठी आयुक्त साहेबांनी ३ कोटीची तरतूद केलेली आहे. त्याच्यात ४ कोटी तरतुद करणे प्लस प्रभाग समिती क्र.१,२,३,४ यांना प्रत्येकी २५ लाखाची तरतुद करणे, नविन संडास व मुतारींसाठी आयुक्त साहेबांनी ५० लक्ष तरतुद केलेली आहे. त्याच बरोबर प्रभाग समिती क्र.१,२,३,४ प्रत्येकी ५ लाख तरतुद करणे. नविन बगिचे आणि उद्यानासाठी आपण ५० लाखाची तरतुद केलेली आहे. आमची मागणी २ कोटीची तरतुदची आहे. नविन इमारती, फायर स्टेशन बांधणे व वार्ड ऑफिस बांधणे याच्यासाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे. आमची मागणी आहे १० कोटी तरतुद करावी. १० कोटी याच्यासाठी की, बरेच ऐरिया आहे पिंप्राळा म्हणा, सुप्रीम कॉलनी म्हणा, तेथे ना हॉस्पीटल्स आहे ना फायर स्टेशन्स आहे, इकडचे जे घरे आहे ते जॉईंटस आहे, भविष्यात असे होऊ नये पण जर आगीचे काही प्रॉब्लेम झाले तर, फायर स्टेशन तेथे जरुरी आहे म्हणुन १० कोटीची मागणी केलेली आहे. नविन रस्त्यांसाठी १०४ कोटीची तरतुद केलेली आहे आयुक्त साहेबांना आमची मागणी १०० कोटी आहे आणि प्रभाग समिती क्र.१,२,३,४ प्रत्येकी १२.५ कोटी वाढुन द्यावे. पेज नं.५२, अ.क्र.६०, नविन वाहनांसाठी फक्त १० लाख तरतुद केलेली आहे. आमची मागणी २ कोटी आहे. विषय असा आहे की, एखादा व्याक्युम सेट आहे,एखादी सेप्टीक टँक जेव्हा भरलेली असते आणि आपण पावती फाडायला जातो. तर महिनो महिने वेटींग आहे. कोणी म्हणतो २५ दिवस ३० दिवस ही एक एमर्जंसी ची गोष्ट आहे. म्हणुन आपण व्यक्युमच्या गाडया वाढविणे आणि बऱ्याच गाडया संबंधीतांना लागतील. अ.क्र.९ नविन स्मशानसाठी १ कोटी, नविन पदचारी मार्ग उड्डाणपुलासाठी १० कोटी, दिक्षा भुमी बांधण्यासाठी १ कोटी, नविन पुतळेंसाठी ५० लाख, रेडक्रॉस मागील जागा जी आहे ती विकसीत करणे, ती जागा ओपनस्पेस आहे त्याठिकाणी आपण काही ना काही बांधु शकतात. तेथुन सुध्दा उत्पन्न वाढु शकतो. सामान्य रस्त्यांसाठी ५० लाखाची तरतुद केलेली आहे अशी आमची मागणी आहे ती २ कोटी करण्यात यावी.

**श्री.नितीन लढढा :-** कश्या बद्दल ?

**श्री.अमित काळे :-** समानतर रस्ते संदर्भात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नॅशनल हायवे प्राधिकरणाकडुन जेव्हा १२१ कोटी रुपये मंजुर होणार होते. त्यावेळेला धोरणात्मक निर्णय असा झालेला होता. अस्तित्वात असलेला हायवे त्याचे रुंदीकरण करणे, तसे त्यांनी त्याचे टेन्डर ही केलेले आहे. ते साधारणता ६९ कोटी रुपयांचे आहे. आणि त्यावेळेला प्रकल्प संचालक, सिंगल साहेबांशी चर्चा केलेली होती. आणि त्यांनी म्हटले होते की, हा ६९ कोटी रुपयांचा विषय मार्गी लागल्यानंतर उर्वरित पैश्यातुन समानतर रस्ते, कारण समानतर रस्ते करीता २ कोटी रुपयाची तरतुद केलेली असुन काहीच त्याच्यातुन निष्पन्न होणार नाही. परंतु समानतर रस्ते विकसीत करण्याच्या संदर्भातील नियोजन असल्या कारणाने त्यांच्याकडे त्या निधीची तरतुद सुध्दा त्यांनी करुन ठेवलेली होती. फक्त निविदा त्यांनी या जमिनी आपल्या ताब्यात घेतलेल्या आहे. म्हणजे हायवे त्यांच्या पजेशनला आहे. तर ते कामे करण्याच्या संदर्भात ही निविदा प्रक्रिया राबविण्यास कुठलीही एक अडचण येत नाही. परंतु समानतर रस्त्यांचे काम करत असतांना उद्या ईलेक्ट्रीक पोल शिफ्टींगचा त्या वेळेला विषय होता. काही पाईप लाईन टाकले होते ते शिफ्टींग करण्याचे संदर्भातले विषय होते. ज्या अनुषंगाने त्यांनी त्यांचे टेन्डरचे दोन पार्ट केले. पहिला पार्ट चालेले आहे, आणि सेकंड फेज मध्ये दोन्ही बाजुने समानतर रस्ता विकसीत करण्याचे नियोजन संदर्भात आपण जर मा.खासदार महोदयांकडे जर पाठपुरावा केला, तर महानगरपालिकेचा २ कोटी रुपये चा तुटवडा आहे, त्याच्यातुन काहीच साद्य होणार नाही. परंतु समांतर रस्त्यांचे काम निश्चितच त्यांच्या धोरणात्मक निर्णयामध्ये आहे. आणि ते लवकर मार्गी लागु शकतील.

**मा.सभापती :-** ईलेक्ट्रीक पोलचा तो विषय आहे, समांतर रस्त्यांसाठी जी ईलेक्ट्रीक पोल आहे त्यांच्यासाठी ती तरतुद आहे. रस्त्यासाठी नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ईलेक्ट्रीक पोल शिफ्टींगची जबाबदारी आपली आहे ?

**मा.सभापती :-** समांतर रस्त्यांवर स्ट्रीट लाईट लावणे ही आपली जबाबदारी आहे.

**श्री.नितीन लढढा** :- काय झालेले आहे की, एक एच.टी.लाईन टाकलेली होती. आणि ती एच.टी.लाईन असल्याकारणाने त्याच्यावर महानगरपालिकेचा कुठलेच कनेक्शन नाही

**मा.सभापती :-** स्ट्रीट लाईट जी आहे समजा ती हायटेन्शन आहे रोडाच्या एकीकडे असेल, दुसरी कडे आपण आपले स्ट्रीट लाईट लावु शकतात.

**श्री.नितीन लढढा :-** स्ट्रीट लाईट नाहीच आहे समांतर रस्त्यांना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** समांतर रस्त्यांना स्ट्रीट लाईट नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी आपण लावलेली होती ती पण रिमुव्ह करुन टाकली. आपली जी लाईन होती ना पथ दिव्यांची व्यवस्था ती रिमुव्ह करुन टाकली आपण. आपण सर्व काढुन घेतलेली आहे. तरतुद करुन ठेवायची असेल तर करुन ठेवा. त्याचे जर अनावश्यक खर्च आपल्यावर महावितरण मांडत असेल. तर तो महावितरण कडुनच करायला पाहिजे.

**मा.सभापती :-** त्यांच्याकडुन जर होत असेल तर आपण ही तरतुद वापरणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ठिक आहे, तरतुद करुन ठेवा, काही हरकत नाही.

**मा.सभापती :-** आवश्यकता भासल्यास तरतुद केलेली आहे ती.

**श्री.अमित काळे :-** पेज नं.५२, अ.क्र.१८ विद्युत दहन वाहिनी बसविणे यासाठी ५० लक्ष तरतुद करण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पेज नं.५६, अ.क्र.४९ भांडवली खर्च शासकीय योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान, रस्ते विकास प्रकल्प आयुक्त साहेब यांनी ४२ कोटी १० लक्षाची तरतुद केलेली आहे. ती १०० कोटी करण्यात यावी.

**श्री.नितीन लढढा :-** त्यात ३० कोटी आपली लागते ७० कोटी शासन देते.

**मा.आयुक्त :-** ४२ कोटी जी आहे त्याच्यात आपला हिस्सा आहे. त्याची तरतुद आपण केलेली आहे आणि उरलेली आपण शासनाकडुन अपेक्षित करतो. आता शासन पुर्वी १०० कोटी देईल किंवा नाही हे आता आपल्याला निश्चित सांगता येणार नाही. पण ज्याला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे त्याची आपण बजेट तरतुद केलेली आहे.

**मा.सभापती :-** जर त्यांनी दिले, आपण केले, त्यासाठी आपली मदतीची ही गरज आहे.आपण जर प्रयत्न केला किंवा पाठपुरावा केला तर ते नक्कीच मिळतील.

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही, राजु भाऊ, त्यावेळेला काय झाले होते. मी तेच म्हणतो.आपण चुका मोठया करतो, त्यावेळेला काय होते की, ३० कोटी रुपये सुध्दा शासन देईन. १०० च्या १०० मध्ये सुध्दा आपण ३० कोटी चा हिस्सा आपण राज्य शासनाकडुन मागु असा त्यावेळेच्या चर्चे मधुन सुर होता.ठिक आहे तरतुद करुन ठेवायला पाहिजे. राज्य शासनाकडे ही विनंती करु. आता कसे आहे, १०० कोटीचा सोना जिवंत करण्याच्या दृष्टीकोणातुन ३० कोटीची तरतुद करुन ठेवणे मला व्यवहारीत वाटत राहिल.

**मा.आयुक्त :-** आपण ४२ कोटी पैकी १२ कोटी ची तरतुद केलेली आहे. तर उर्वरित जो निधी आहे तो याच्यासाठी आहे.

**श्री.नितीन लढढा :-** उर्वरित जो निधी आहे तो एकंदरीत शहराचा निधी आहे. तो निधी कोणी दिला का दिला याच्यापेक्षा तो शहरात येणे गरजेचे आहे. कारण त्याच्यातुन या शहराचाच विकास होणार आहे. तर त्याला ती ३० कोटीची तरतुद आपण करायला लावु.

**मा.सभापती :-** सदस्यांनी अर्थसंकल्पामध्ये विविध असे तरतुदी सुचविलेल्या आहे. त्यासोबतच आपण जळगांव शहरातील जी सानेगुरुजी रुग्णाल्याची जी जागा आहे. त्या जागेवर बी.ओ.टी. तत्वावर एक कॉमप्लेक्स उभे करायचे खाली दुकाने काढायची. आणि वरच्या मजल्यावर एक प्रशस्त हॉस्पीटल महापालिकेचे अध्यावत कराव. त्याची मागणी करत आहे. तसेच जनता अपघात विमा त्याच्यासाठी १ कोटीची तरतुद केली पाहिजे. जळगांव शहराचे समजा काही नागरीक असतात, तर मेहरुणचा जो तलाव आहे त्या ठिकाणी बरेच असे केसेस झालेले आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सुरेशदादांनी चालु केले होते हे.

**श्री.नितीन लढढा :-** जनता अपघात विमा उतरविण्याच्या पहिले या महानगरपालिकेचा विमा उतरवा, कारण आपलीच परिस्थिती व्हेंटीलेटरवरती आहे. आपल्याला आता ऑक्सीजन मिळत नाही, आता आपल्याला व्हेंटीलेक्टरची रिकवायरमेंटची गरज झालेली आहे.

**मा.सभापती :-** हा पण जळगांव शहराचे नागरीक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे राजुभाऊ, दायित्व केव्हा करावे जेव्हा खिशे दोन्ही भरलेले आहे. तेव्हा दायित्व करावे. खिशे फाटलेले आहे खिश्यामध्ये एक रुपया नाही.आणि दायित्वाची गोष्टी करणे मला तरी ते योग्य होणार नाही. ती पॉलिसी मेनटेन ही होत नाही तो बिचारा नागरीक चकरा मारुन मारुन थकुन जातो. त्याला त्याचा २५ हजाराचा विमा ही मिळत नाही. म्हणजे अनंत अडचणी आहे त्याच्यात साध्य काही होत नाही.

**मा.सभापती :-** आता पॉलिसी म्हणजे कसे आहे. आता कोणी तलावामध्ये बुडुन गेला.

**श्री.प्रशांत नाईक :-** राजु भाऊ, पण त्या पॉलिसीसाठी मतदान यादी मध्ये नाव असायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** कसे आहे, यापुर्वी अशी नोंदणी राबवुन बघितलेली आहे ना. हे जे आहे ना ७-८ वर्षापुर्वी करुन बघितलेली आहे ना. त्याची जी फळ निष्पण जी आहे ना काहीच नाही.

**श्री.**प्रशांत नाईक :- त्याच्या क्रायटेरीयाचा अभ्यास करा तुम्ही.

**मा.सभापती :-** काही विमा कंपनींशी बोलवुन आपण प्रशासनाचा निर्णय घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा:-** चर्चा करा तुम्ही, कुठलीही योजना जी आहे ना व्यवहारीक ही पाहिजे आणि त्याचा फायदाही व्हायला पाहिजे.

**मा.सभापती :-** मुळात फायदा व्हायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** ज्या हेतुने आपण करतो, तो हेतु साद्य झाला नाही.

**मा.सभापती :-** फायद्यासाठीच करत आहे आपण. तसेच जळगांव शहरामध्ये बी.ओ.टी. तत्वावर सिटी बसेस चालु करायच्या. म्हणजे एखाद्या कंपनीने त्याचे गाडया शहरात चालवायच्या आणि त्यातुन जे उत्पन्न मिळेल त्यातुन तो आपल्याला देईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** ज्या गाडया ते लावणार त्यांची पार्कींग कुठे करणार. ती जी जुन्या बस स्टॅण्डची जागा आहे ना.

**मा.सभापती :-** आता एस.टी. महामंडळाचे बस स्टॅण्ड आहे ना.

**श्री.प्रशांत नाईक :-** तेथे नविन बस स्टॅण्ड चालले जाईन भाऊ.

**मा.सभापती :-** ती जागा मनपाची आहे म्हणे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** नाही नाही, ती जागा राज्य शासनाची आहे. आणि एस.टी.महामंडळाच्या अखत्यारीत आहे. त्यावेळेला आपला महामंडळाला भाडे देणे संदर्भात सुध्दा प्रस्ताव दिला की, त्या जागेचे भाडे महानगरपालिका क्लिअर करेल.परंतु शहर बस सेवेसाठी आम्हाला ती ताब्यात द्या. कारण सगळयात सेंट्रलाईझड स्पॉट तो आहे शहर वाहतुकीचा. कारण यापुर्वी दोन कंपनींनी बस सेवा जळगांव शहरामध्ये प्रायरिटी तत्वावर चालविल्या. एक एक दोन दोन वर्ष चालल्या. परंतु बेसिक अडचण हेच येते की, गाडी उभी करण्यासंदर्भात कुठेच स्कोप नाही. त्यामुळे त्या दोन्हीही कंपन्यांनी माघार घेतल्या.

**मा.सभापती :-** संबंधीत कंपनी त्याची व्यवस्था करेल. समजा एम.आय.डी.सी.मध्ये जर त्यांनी एखादी व्हॅकंट प्लॉट जरी घेतला भाडयाने तर त्यांची व्यवस्था ते करु शकता. पार्कींगची व्यवस्था संबंधीत कंपनीने करावी.

**श्री.नितीन लढ्ढा:-** नाही नाही, समजा आपण पुर्वीचे प्रस्ताव राबविले होते. ते PPP बेसिसवर होते. म्हणजे त्याच्यामध्ये महानगरपालिकेची गुणत्वणुक नव्हती. महानगरपालिकेला उलटे ते रॉयल्टी देत होते.आज अर्थ संकल्पात त्याच्या संदर्भात प्रोव्हीजन करण्याचा संबंध काय ? तो धोरणात्मक निर्णय आहे. एखादी कंपनीची शहरामध्ये बस सेवा सुरु करणे संदर्भात त्यांचे मनोदय असेल. तसा ते प्रस्ताव देतील.

**मा.सभापती :-** हा जो विषय आहे आपण महासभेपुढे मांडु ना.

**श्री.नितीन लढ्ढा:-** या स्थायी समिती मध्ये त्याच्यावर आपल्याला कुठलीही आर्थिक तरतुद आपल्याला करायची नाही. तर याच्यामध्ये तो विषय येण्याचा अवचित्य नाही.

**मा.सभापती :-** तरतुदचा विषय नाही. परंतु तो विषय आपल्याला येत्या महासभेमध्ये घ्यायचा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** बरोबर आहे ना, मला वाटले की, अर्थसंकल्पाच्या दृष्टीकोणातुन त्याचा काही उपयोग आहे का ? म्हणजे त्या विषयाचा आज चर्चा होण्याचा अवचित्यच कळत नाही.

**मा.सभापती :-** बजेट मध्ये आपल्याला तरतुद करायची नाही त्या विषयाची. अंदाजे अर्थसंकल्पामध्ये सन्मा.सदस्यांनी जमा बाजु मध्ये काही तरतुदी सुचविल्या. त्यानंतर खर्चामध्ये तरतुदी सुचविल्या. त्याच्यामध्ये डोबळ मनाने अरोग्याच्या दृष्टीकोणातुन आपण आज पुर्वीच्या संदर्भात जळगांव शहरामध्ये रुग्ण वाढत आहे त्यासाठी आपण १०० ऑक्सीजन बेडची तरतुद केलेली आहे.
**श्री.नितीन लढ्ढा:-** तरतुद किती केली मग कोविडसाठी.

**मा.सभापती :-** ती तर आपण १५ कोटीची केलेली आहे, पण खर्च वाढु शकतो. फक्त बेडची व्यवस्था करुन चालणार नाही भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा:-** १५ कोटी म्हणजे आपल्याला काही अद्यावत रुग्णालय बांधायचे नाही. आपण अद्यावत रुग्णालय बांधण्याच्या संदर्भात विचार केला तर ती साथ ही निघुन जाईन पण ते रुग्णालय पुर्ण होणार नाही.
**मा.सभापती :-** मग त्याच्यासाठी आपल्याला स्टाफ पण लागेल, मानधनावर स्टाफ घ्यावा लागेल.
**श्री.नितीन लढ्ढा:-** १०० बेड ऑक्सीजनचे करण्यासंदर्भात जास्तीत जास्त १ कोटीची तरतुद जर तुम्ही केली तरी ही पुरेशी आहे. १०० बेड ऑक्सीजन तयार करण्यासाठी, ती म्हणजे मॅक्सीमम साईडला १ कोटीची आहे.
**मा.सभापती :-** १ कोटीमध्ये कसे होईल.
**श्री.नितीन लढढा :-** कसे आहे की, आपण याला हॉस्पीटल बांधत नाही. आपल्याकडे ज्या जागा आहे. तेथे १०० बेडचे ऑक्सीजन प्लॅन्टसाठी खर्च येतो ६.५ लाख रुपये. सिलेंडर आणि या सर्व काही गोष्टी पुरविणेसाठी जो काही खर्च लागेल तो. याला मेडीकल स्टाफ जो पर्यंत गव्हर्नमेंट कॉलेजकडुन उपलब्ध होत नाही. ती व्यवस्था आज जरी तुम्ही उभारली तर ती चालु शकणार नाही. याच्या संदर्भात ही आयुक्त साहेबांसोबत डॉ.रावलाणी होते, भोसले साहेब होते पुर्ण या परिस्थितीचा विचार केला की, निव्वळ १०० खाटींचे रुग्णालय चालवायचे किंवा ती उभारणी करायची आहे तेवढे नाही. याच्यासाठी लागणारा वैद्यकीय स्टाफ आजच्या स्थिती मध्ये खासगी रुग्णालयामध्ये सुध्दा अपुर्ण आहे. शासकीय रुग्णालयामध्ये सुध्दा अपुर्ण आहे. तर आपल्याला कुठे मिळणार आहे. आपण जर जाहिराती दिली तर त्या जाहिरातींना प्रतिसाद सुध्दा मिळणार नाही.
**मा.आयुक्त :-** स्टाफसाठी आपल्याला सिव्हील सर्जनवर अवलंबुन राहावे लागेल. आणि त्यांना सुध्दा जिल्ह्यामधुन जे पी.एस.सी. आहे, रुग्ण हॉस्पीटल आहे किंवा उपजिल्हा रुग्णालय आहे, ज्या तालुक्यातल्या पेशन्टची संख्या कमी आहे काही प्रमाणात त्या ठिकाणाहुन, जसे आता नागपुर वरुन आणि नांदेड वरुन आपल्याकडे काही डॉक्टर्स दिले आपल्या जे.एम.सी.ला, २५ डॉक्टर्स रुजु झाले, अश्या पध्दतीने जर जिल्हाधिकाऱ्यांकडुन राज्य शासनामार्फत इतर काही स्टाफ उभा केला, तर ३००-४०० बेडचे होईल, कारण ४०० बेड ऑक्सीजनचे चालविणे ते फार तस मोठ मेडीकलच्या दृष्टीने चॅलेंजींग आहे. प्रत्येक पेशन्टला ऑक्सीजनची लेव्हल किती लागणार आहे. त्याप्रमाणे दर मिनीटाला किती ऑक्सीजन द्यायचा. याच कन्टनिव्हस मॉनिटरींग करणे हीच व्याप आहे की, तो वॅशरुमला जाईपर्यंत त्याची ऑक्सीजन लेव्हल काही जणांची कोलॅप्स झालेली आहे. ही सगळी यंत्रणा उभी करणे, आपण म्हणत आहे त्याप्रमाणे एक्सपेन्डीचर आहेच ते, त्यापेक्षा सुध्दा दैनंदिन जे व्यवस्थापन आहे ते खुप महत्वाचा आणि जबाबदारीचा आहे.आपल्या महानगरपालिकेकडे वैद्यकीय स्टाफ कमी आहे. आपल्याला वृत्तपत्रात जाहिरात दिल्यानंतरही स्टाफ मिळण्यात अडचण आहे, तर राज्य शासन आणि महानगरपालिका असे एकत्रितपणे ती ४०० बेडची उभारणी करायचे आपण म्हणतो आहे की, जेणे करुन महानगरपालिकेचाही त्याच्यामध्ये सहभाग राहील. आणि आरोग्य व्यवस्थेचे जर आपल्याला सगळे आरोग्य डॉक्टर मिळाली. तर खऱ्या अर्थाने रुग्णांना चांगल्या पध्दतीची सेवा देता येईल. कुठल्याही पध्दतीमध्ये ऑक्सजनची पुरवठा आपण काही ठिकाणी केला, तरी सुध्दा त्याच्यामध्ये लागणारा स्टॉफ आणि इतर सगळी व्यवस्था, याच्यासाठी एक चांगला अद्यावत हॉस्पीटल असणेच गरजेचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** स्टाफ चांगला मिळाला नाही आणि ती सेवा आपण सुरु करुन टाकली. उद्या जाऊन एखाद्याचा जिव गेला, जे आपण एक चांगल्या हेतुने करण्याचा प्रयत्न करत आहोत, तो हेतु बाजुला राहुन जाईल.टिकेची भडीमार आपल्यावर सुरु होईल.
**मा.सभापती :-** आज शहरामध्ये परिस्थिती अशी आहे भाऊ. आज आपण टिकेचा विचार केला, इकडे लोकांचे जिव जात आहे. त्याच्या अभावी ऑक्सीजन मिळावे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** हे बघा राजु भाऊ, तुमचा हेतु चांगला आहे आमचा हेतु वाईट आहे अस नाही. आयुक्त साहेबांनी जी व्यवहारीत भुमिका समजुन सांगितली ना. या गोष्टीवर आम्ही खुप खनन केले, बेसिक अडचण आहे की, जो आपला उद्दिष्ट आहे तो आपण योग्य पध्दतीने पुर्ण करु शकु की नाही. आणि ते पुर्ण का करु शकत नाही कारण वैद्यकीय स्टाफच आज मिळत नाही म्हणुन गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज, महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, यांच्या संयुक्तविद्यमानाने तसेच ४०० बेडचे नियोजन जे सुरु आहे. त्याच्यामध्ये जे काही योगदान आपल्या शहरासाठी आहे महानगरपालिका म्हणुन जे आहे. योगदान निश्चित करण्याच्या संदर्भातली भुमिका ही आपली सकारात्मकच आहे.

**मा.आयुक्त :-** सगळयांनी मिळुन जर केल, तर खरे अर्थाने होईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** प्रशासन द्वारे चालु होईल ते काम.

**मा.सभापती :-** त्याच दृष्टीकोणातुन एकुण कामे पण व्हायला पाहिजे. कसे आहे याची अंमलबजावणी झाली पाहिजे. जर तरतुदच केली आणि अंमलबजावणी केली नाही तर काम होणारच नाही.

**मा.आयुक्त :-** तरतुद केल्यानंतर अंमलबजावणी करायला आपल्याला काही अडचण येणार नाही. जसा स्टाफ मिळेल त्या पध्दतीने आपण अंमलबजावणी करु. मुद्दा असा आहे आपण सगळयाचे सोंग मांडु शकतो पैश्यांचा मांडु शकत नाही. हा सगळयात महत्वाचा आहे जर तुमच उत्पन्न असेल. खर्च करण्यामध्ये आपली यंत्रणा याबाबतीत मागे पडेल असे नाही. आपण ती यंत्रणा त्या पध्दतीने बनवु. आपले हे जे सगळे कार्यक्रम आहे याच्यामध्ये अनावश्यक एकही नाही. सगळे सभागृहाचे म्हणणे आहे की, हे खर्चाची तरतुदी करणे गरजेचे आहे. नागरीकांच्या वतीने आवश्यक आहे. पण याला लागणारा जो निधी आहे. तो उपलब्ध होत नाही. या बजेटवर अवलंबुन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** पण सगळे कागदावरच राहतील.

**मा.आयुक्त :-** काही मर्यादीत स्वरुपात मला वाटते आपण जे अत्यावश्यक सेवा सुरु करण्याच्या संदर्भात सन्मा.सदस्यांनी सांगितल्या आहे, त्याच्या मधील जी अत्यावश्यक बाबी आहे. जसे तुम्ही म्हणत आहात की, १५ कोटीच्या ऐवजी १ कोटीत ही करता येईल अश्या पध्दतीने जर आपण खर्चामध्ये वाढ करायची म्हटली आणि तेवढे आपण उत्पन्नामध्ये टारगेट वाढुन दिले तर हे आपल्याला बॅलेन्स करता येईल.

**मा.सभापती :-** तुमचे काय मत आहे १ कोटी तरतुद करायची.

**श्री.नितीन लढ्ढा:-** १ कोटीची आज आपण तरतुद करत आहे, ती संपली, याच्यापेक्षा जास्त, आपला कॉन्ट्रीब्युशन याच्यापेक्षाही कमी आहे तेथे, उद्दिष्ट तेच आहे. जिल्हा प्रशासनाचा उद्दिष्ट तेच आहे, राज्य शासनाचा उद्दिष्ट एकच आहे आणि आपला उद्दिष्ट पण तेच आहे. परंतु एक उद्दिष्ट पुर्ती करायला एकावरती भार टाकण्यापेक्षा ३ लोकांमध्ये तो विभागला गेला तर आपलेही बर्डन कमी होईल आणि व्यवस्था सुध्दा चांगल्या पध्दतीने चालु शकते.

**मा.सभापती :-** कारण कसे आहे, गोदावरी कॉलेजला बऱ्याचदा फोन करावे लागतात तेथे, तर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातुन नोंदण्या कराव्या लागल्या. जिल्हाधिकारींना फोन करावे लागले त्या लोकांना ॲडमिट करुन घ्यावे लागले. तर तेथुन मला जबाबदार लोकांचे उत्तरे, तुमच्या महापालिकेचे काय योगदान आहे या संदर्भात, जबाबदार लोकांचे उत्तर मिळाले,

**श्री.नितीन लढ्ढा:-** महानगरपालिकेचे योगदान व्यवस्थीत चालु आहे, आज ४००-५०० रुग्णांची कोरंटाईन व्यवस्थेचा खर्च महानगरपालिकाच उचलत आहे. या ५०० लोकांची व्यवस्था जर महानगरपालिकेनी ही नाही सांभाळली असती. तर या ५०० लोकांनी कमीत कमी ५००० लोकांना संक्रमीत केले असते.

**मा.सभापती :-** हे उत्तर माझे देऊन झाले त्यांना.

**श्री.नितीन लढ्ढा:-** जर खाजगी रुग्णालयात गेले असते तर यांचा खर्च १० पटीने वाढला असता, आज सगळया सेवा आपण मोफत देत आहेत, त्यांना जेवनापासुन औषधीपासुन सर्व सेवा आपण मोफत पुरवितो आहे. आणि यशस्वी रित्या चालवितो.

**मा.सभापती :-** हा विषय मी मांडला परंतु ऑक्सीजन बेड नाही. महानगरपालिकेने काही तरी व्यवस्था करायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** प्रश्न तो नाही, व्यवस्था उभारणी करणे हा एक भाग वेगळा झाला आणि व्यवस्था चालविणे हा एक मोठा भाग आहे.

**मा.सभापती :-** आज फक्त जिव वाचविणे हा महत्वाचा विषय आहे. परिस्थिती अशी झालेली आहे की, जिवाच्या पलीकडे काही नाही. आज उत्पन्नापेक्षा नागरीकांचा जिव कसा वाचेल याच्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** प्रश्न हा पैश्यांचा नाही, तरतुदींचा नाही. तुम्ही १०० कोटीची तरतुद करुन घ्या. परंतु ही सगळी व्यवस्था आपल्याकडुन जोपासली जाईल का ? जो पर्यंत तुम्हाला स्कीड डॉक्टर्स मिळत नाही. तुमची व्यवस्था उभी जरी राहुन गेली तर ती आयडल पडुन राहिल. ही वस्तुस्थिती आहे आज खाजगी रुग्णालयांमध्ये जी डॉक्टर्स आणि जी कंपाऊंडर्स कोविड पॉझिटीव्ह झालेले आहे परंतु असींथेमेटीक आहे. त्यांच्याकडुन सुध्दा काम भागविता येईल. तु पॉझिटीव्ह आला आहे पण असींथेमेटीक आहे ना, तरी ही काही आरोग्यांची ट्रिटमेंट कर. ही परिस्थिती आहे कारण स्टाफच नाही. तुम्ही इंफ्रास्ट्रक्चर खुप उपलब्ध करुन द्याल. परंतु त्या इंफ्रास्ट्रक्चरला रुग्णांवर मॉनिटरींग करायला डॉक्टर्स नसतील तर तुम्ही काय करणार. तुम्ही आज १५ कोटी रुपयांचे ऑक्सीजन बेड खरेदी करुन टाकले इमारती बांधुन टाकली, सगळ काही करुन टाकल. परंतु डॉक्टर्स नसतील तर काय करणार. सिव्हील हॉस्पीटलचे काही बेड कालांतराने सुरु करावे लागले त्यांना स्टाफ अभावी. म्हणजे त्यांच्याकडे पण हाच प्रॉब्लेम आहे, खाजगी डॉक्टरांकडे सुध्दा तोच प्रॉब्लेम आहे. आणि आपण ती व्यवस्था उभी करुन त्याच्यातुन आपले उद्दिष्ट पुर्ण होत नसेल तर या गोष्टी करुन काही उपयोग होणार नाही. हे निव्वळ आपले समाधान म्हणुन तरतुद केली. परंतु ती यंत्रणा पुढे चालु शकणार नाही. म्हणुन त्यांच्याच माध्यमातुन जी.एम.सी.च्या माध्यमातुन जिल्हाधिकारींच्या माध्यमातुन जो काही योगदान कॉन्ट्रीब्युशन आपल्याला तेथे द्यायचे आहे. तो सुध्दा आपल्या जबाबदारीचा भाग आहे. एक जबाबदारी आपण सी.सी.सी.ची करतोच आहे. सोबत या ऑक्सीजन बेडच्या संदर्भातली जी जबाबदारी त्यांच्याकडुन आपल्याला सोपविली गेली. ती जबाबदारी आपण पार पाडणारच आहे.त्याच्यामध्ये आपले योगदान राहणाराच आहे.

**मा.सभापती :-** तर आता या तरतुदीचे करायच का ?

**श्री.नितीन लढ्ढा:-** उपयोगच नाही. याला काहीच अर्थ राहणार नाही.

**मा.आयुक्त :-** २ ते ३ कोटीची तरतुद करु.

**श्री.नितीन लढ्ढा:-** ३ कोटी पर्यंत ठिक आहे. आपल्याला योगदान देतांना आपली ही मर्यादा पाहवी लागेल.

**मा.सभापती :-** आणखी काही दुसरे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** रस्त्यांना आपण किती खर्च अपेक्षित धरलेले आहे.

**मा.आयुक्त :-** एकुण १५० कोटी अपेक्षित ठरलेले आहे सुधारीतच्या बैठकीमध्ये, आम्ही प्रशासनाला १०४ कोटी सुचविलेले हाते. आता या १०४ कोटी मध्ये सगळेच आले, आता स्थायी समितीमध्ये जी सुचना आलेली आहे त्याच्या प्रमाणे १०० कोटी रुपये एकत्रितपणे आणि प्रत्येक प्रभाग समितीसाठी १२.५ असे ते ५० कोटी आणि हे १०० कोटी अशी १५० कोटीची तरतुद आहे. १०४ च्या ऐवजी १५० कोटी.

**मा.सभापती :-** आता कसे आहे आपल्याला शहरांमधील जे रस्ते आहे. ते खुप महत्वाचे आहे. आता आपण बघतो आहे. आता थोडया वेळापुर्वी आपण त्या गोष्टीचा उल्लेख केला की, जळगांव शहराचे रस्ते जास्तीत जास्त कसे घेता येतील. त्यासाठी रस्त्यांवर फोकस केला जाईल. म्हणुन आपण ती तरतुद केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** १५० कोटीत होऊन जाईल.

**मा.आयुक्त :-** १५० कोटी तरतुद आवश्यक आहे किंवा त्यापेक्षाही जास्त आपल्याला लागतात. आता जर आपण बघितल तर आपल्या दोन्हीही अमृतच्या योजना पुर्णत्वावर आहे. आपली वॉटर सप्लाय पाईप लाईनची योजना १-२ महिन्यात पुर्ण होऊन जाईल. ड्रेनेजचही साधारणता ३ महिन्यामध्ये पुर्ण होऊन जाईल. म्हणजे पाऊसाळयानंतर शहराचे सगळे रस्ते करणे गरजेचे होणार आहे किंवा करु शकतो आपण फक्त त्याची जी तरतुद आहे १५० कोटी ही कमी वाटणार आहे कारण शहरात आज एकही रस्ता असा नाही ज्याला खरोखर दुरुस्त करण्याची आवश्यकता नाही. आता अश्या परिस्थितीमध्ये राज्य शासनाकडुन जो काही ४२ कोटी वगळुन १०० कोटीची अपेक्षा करतो आहे. ते मिळविण्याचा प्रयत्न करणे. आणि त्याला अनुसरुन आपल्या बजेटमध्ये जी काही १००/१२५/ १५० कोटीची तरतुद आहे. परंतु पुन्हा पुन्हा आपण हा जो विषय चर्चेला घेतो आहे. या सगळया तरतुदी आवश्यक आहे. कुठेही आपण अनावश्यक तरतुद सुचवत नाही. फक्त जमा आणि खर्चाचा ताळमेळ कसा बसवायचा ही फक्त आपली त्याच्या मधील सर्कस आहे. अदरवाईस ही १५० कोटीची

तरतुद ही अत्यंत आवश्यक आहे. किंवा साथरोगासाठी आपण तरतुद वाढविले ते खुप स्तुतीय आहे. प्रभाग कार्यालयांसाठी आपण काही तरतुदी करावे हे ही खुप चांगले आहे. परंतु या सगळया गोष्टींसाठी आपल्याला निधीची उपलब्धता होणे हा या सगळयांच्या पाठीमागचा मुद्दा आहे. ती जर उपलब्धता नाही झाली.

**मा.सभापती :-** जमा बाजु बघता आपण याच्यामध्ये वाढविलेले आहे.

**मा.आयुक्त :-** आपण दोन ठिकाणी वाढवितो आहे, एक गाळयांपासुन मिळणारा उत्पन्न.

**मा.सभापती :-** आता गाळयांमध्ये आपण ते १३ कोटी कमी केले तर मला वाटते १२ कोटी, ते १२ कोटी आणखी यात कमी होतील.

**मा.आयुक्त :-** आता घरपट्टीचे उत्पन्न प्रशासनाने ठरुन दिलेले आहे ते ९७.५ कोटी आहे. म्हणजे यातले २२ कोटी आणि गाळयांमधील १२५ कोटी वाढतील.

**श्री.नितीन लढ्ढा:-** म्हणजे कसे आहे, प्रशासनाने जी १९१ ची तरतुद सुचविलेली आहे ना. कसे आहे. १०० कोटीची तरतुद आणि १०० कोटी राज्य शासनाकडुन असे साधारणता २०० कोटीची कामे करता करता डिसेंबर येऊन जाईल तो पर्यंत निधीची उपलब्धता झाली तर ते रिॲपरॉप्रीयट करता येईल ना बजेटला. त्यांनी सुचविलेली तरतुद जरी तुम्ही मान्य केली तर ती एका दिवशी खर्ची पडणार नाही. त्या गोष्टीला ही खर्ची पडता पडता तुमचे आता ४ महिने पाऊसाळयाचे जातील. ती तरतुद जर पुर्णपणे व पुर्ण क्षमतेने खर्च केली गेली. आणि उत्पन्न आपल्याला ज्या पध्दतीने अपेक्षित आहे त्या पध्दतीने उत्पन्न वसुल झाले तर गाळयांच्या माध्यमातुन म्हणा किंवा घरपट्टीच्या माध्यमातुन म्हणा.

**मा.सभापती :-** आपण फक्त १५० कोटीची तरतुद करत आहे वर्षभरात भाऊ लक्षात घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा:-** ती १५० कोटीची तरतुद ही तोकडी आहे. त्या बद्दलही वाद नाही. परंतु १५० कोटी रुपये येणे अपेक्षित आहे का ? आपण गाळयांचे उत्पन्न गेल्या ३ वर्षापासुन आपण ही सत्तेत होता. मला सांगा काय त्याच्यातुन फुलफिल झाले. तो आपला हक्काचा पैसा आहे या संदर्भात कोणाचेही दुमत नाही. परंतु त्याच्यातल्या अडचणी तुम्ही सुध्दा प्रत्यक्षात भोगलेल्या आहे, आम्ही सुध्दा भोगलेले आहे. त्याचा तिडा कसा सुटेल, केव्हा सुटेल. कसा सुटेल याच्या संदर्भातील याची शाश्वती तुम्हालाही नाही मलाही नाही. ती प्रशासनालाही नाही. तो एक संघर्षाचा भाग आहे.

**मा.सभापती :-** समजा सुदेवाने तो मार्ग निघाला, आपल्याकडे रक्कम आली. मग तरतुद नसल्यानंतर खर्च कसे करणार.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मी काय बोललो तुम्हाला ही १०० -२०० कोटी रुपयांचे कामे करता करता आहे यास तुम्हाला ८-९ महिने झाले. एका दिवसात असे नाही की, तुमच्याकडे आज पैसा आला आणि दुसऱ्यादिवशी तुमचे कामे सुरु होत आहे. या योजना पुर्णत्वास आणण्यासाठी ३ महिने, मध्यंतरी ३ महिन्यानंतर लागलेला पावसाळा, आणि पावसाळयानंतर समजा १०० ते २०० कोटीची कामेही प्रस्तावीत झाली, तर ते होता होता पुढचा मार्च महिना लागुन जाईल.

**मा.सभापती :-** फेब्रुवारी मार्च मध्ये समजा कलेक्शन झाले, आणि आपली तरतुद नसली, तर काय करणार ?

**श्री.नितीन लढ्ढा:-** ती तरतुद रिॲपरॉप्रीयेट करता येते ना.

**मा.आयुक्त :-** चेअरमन साहेब, आपली शंका रास्त आहे, परंतु त्याच्यामध्ये बजेट मंजुर झाल्यानंतर काही लिमिट पर्यंत स्थायी समितीच्या मान्यतेने आणि काही महासभेच्या मान्यतेने वर्गीकरण आपण करु शकतो. म्हणजे एका लेखा शिर्षामधील तरतुद कमी करुन दुसरीकडे आपण वाढु शकतो किंवा एखाद्या ठिकाणी आपल्याला अपेक्षित उत्पन्न आपल्या बजेटमध्ये अपेक्षित धरल्यापेक्षा जास्त असेल, तर ती वाढीव जी जमा आहे. ती कुठे खर्च करायची, त्याचा निर्णय स्थायी समिती महासभा घेऊ शकते. असे नाही की, निधी आहे पण खर्च करु शकत नाही. ते केव्हाही करु शकतो आणि असेही आपण ८ महिन्यानंतर बजेट रिव्हाईज करतो. त्यामुळे निधीची उपलब्धता झाली आणि केवळ तरतुद नाही म्हणुन खर्च करता येणार नाही. आपला जो निधी आहे त्याला पर्यायी खर्च आहे, कुठलाही असा नाही की, निधी आहे परंतु खर्च करु शकत नाही. असा कधी होणार नाही. उलटपक्षी आपले खर्चाचे तरतुदी नेहमी जास्त असतात. तर तशी शक्यता फार कमी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** कसे आहे राजु भाऊ, कागदोपत्री जर अनावश्यक तरतुद केलेली असली तर प्रत्येक सदस्याला वाटते की, तरतुद आहे आणि तुम्ही आमचे प्रस्ताव मंजुर करत नाही. प्रस्ताव मंजुरही करा, तुम्ही २०० कोटीची तरतुद करा २०० कोटीचे प्रस्ताव होतील. परंतु निधी नसेल तर मागच्या वेळी जितके जे ठराव

झालेले आहे. आज त्या ठरावांवर आपण अंमलबजावणी सुध्दा करु शकत नाही किंवा मनपा फंडातुन त्यांचे नियोजन करणे संदर्भात टेन्डर जरी काढले त्यांना प्रतिसादही मिळत नाही. म्हणजे या सर्व गोष्टी काय होतात. कागदोपत्रीच राहतात आणि निष्पन्न त्याच्यातुन काही होत नाही. जेवढा आपल्याला निष्पन्न होईल तेवढेच आपण येणे निश्चित करायला पाहिजे. जेणे करुन सदस्यांनाही समाधान वाटेल आणि नागरीकांनाही समाधान वाटेल. पैसा येईल सरप्लस तर केव्हाही त्या निधीतली तरतुद करता येईल आपल्याला.

**मा.आयुक्त :-** काम करायच्या वेळेवरती पैसे देण्याची आपण हमी देऊ शकतो त्याला, बजेट मध्ये तरतुद आहे, वास्तव ही आहे. तुम्ही काम केले तर तुमचे पैसे ३१ मार्चच्या आत आम्ही तुम्हाला देऊ शकतो. हा विश्वास जर आपण लोकांना देऊ शकलात तर लोकही काम करायला पुढे येतील आणि कामे ही चांगल्या पध्दतीने होऊ शकेल.

**श्री. नितीन लढ्ढा:-** राजु भाऊ, जर कधी राजु मामांनीच सांगितले होते की, त्यांच्याकडे कोणती ऐजन्सी आहे. ती १०० कोटीचे कामे उधारीवर करायला तयार आहे. मी म्हणतो तुम्ही मामांना उद्या बोलवा आपण चर्चा करु. आणि जर असे असेल तर त्यांचा पेमेंट तसे असेल तर जमा करुन त्यांना अदाही करुन टाकु. म्हणजे त्याच्या बद्दल कुठे वाद नाही. कामे व्हायला पाहिजे. मक्तेदार जर करायला तयार असेल तर आम्हालाही काही अडचण नाही. तुम्हालाही काही अडचण नाही.

**मा.सभापती :-** त्यावर आपल्याला चर्चा करता येईल. जर मार्ग निघत असला तर आपली तरतुद असली पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मी म्हणतो ही १०४ कोटीची तरतुद आहे ना, मामांनी १०० कोटीची जबाबदारी घेतलेली आहे ना. त्या १०० कोटीच्या तर अडथळा काही ठरत नाही मामांच्या कामाला. मामांनी १०० कोटी रुपये दिले. कोणी मक्तेदार त्यांना भेटला की, १०० कोटीचे कामे करता येईल.

**मा.सभापती :-** मग त्याच्या व्यतिरिक्त समजा एखादे दोन सदस्यांना त्यांच्या प्रभागात रस्ता करायचा असेल. मग त्याच्यासाठी तरतुद करावी लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मी काय म्हणतो त्या १०० कोटी मध्ये करा.

**मा.सभापती :-** समजा आपण त्या क्ष ऐजन्सीला काम दिले.१०० कोटीचे ते करणार. नगरसेवकांना त्यांच्या प्रभागामध्ये एखादा रस्ता सुविधेसाठी करायचा असेल.

**श्री.नितीन लढ्ढा:-** रस्ता असेल तो करेल पण पैसेंच काय ? मला सांगा, मनपा फंडातुन आपण आज २०० कोटीचे टेन्डर काढुन घेऊ. पुर्वी एक टेन्डरलाही प्रतिसाद मिळतो का आपल्याला.

**मा.सभापती :-** ते जर पैसे आपल्याला आज द्यायचे नाही तर आज आपण करु शकतो ना ५० लाखाची तरतुद. जर समजा त्या ऐजन्सीला आपल्याला आज पैसे द्यायचे नाही. आज द्यायचे आहे का पुढच्या आर्थिक वर्षात द्यायचे आहे. मग आज ५० कोटीचे मनपा फंडातुन काम नाही करु शकत.

**श्री.नितीन लढ्ढा:-** ती १०० कोटीची ऐजन्सी फायनल आहे का?

**मा.सभापती :-** विषय मी नाही काढला विषय तुम्ही काढला हा.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मी काढला म्हणजे तुमच्या आमदारांनी काढलेला आहे म्हणुन मला काढावा लागला.

**मा.सभापती :-** मी काय बोललो याच्यावर चर्चा करु आपण.

**श्री.नितीन लढ्ढा:-** मला वाटते ही पुरेशी आहे १०४ कोटीची तरतुद. नाही तर १२५ कोटी करुन घ्या.

**मा.सभापती :-** जशी आहे तशी राहु द्या. आपण चर्चा करु ना याच्यावर. मामांशी चर्चा करुनच आपण निर्णय घेऊ या.

**मा.आयुक्त :-** वाढीव तरतुद कमी करण्यापेक्षा कमी असलेली तरतुद वाढविणे ही केव्हाही आर्थिक व्यवस्थापनाचे योजनेने संयुक्त आहे. वाढविणे किंवा कट करणे, आपले बजेटचे एक वैशिष्ट आहे की, महासभेमध्ये आपण त्यात कितीही वेळा बदल करु शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** उद्या सभापती महोदय सांगतील, आम्ही १५० कोटी रुपयांची तरतुद केली परंतु महापौर महोदयांना आणि सत्ताधाऱ्यांना तो खर्च करता आला नाही. आता पैसाच नाही तर खर्च कुठुन करणार. तुम्ही टिका करण्याचा एक फार्मुला अर्थ संकल्पातुन तयार करुन ठेवत आहे.

**मा.सभापती :-** तुम्हीच पर्याय सुचविला ना भाऊ.

**मा.आयुक्त :-** वार्ड ऑफिसचे जे आपण म्हणतो आहे ना आणि फायर स्टेशनचे १० कोटी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता आपल्याला इक्वीपमेंट खरेदीच्या बाबतीमध्ये ५० लाख आता मागच्या येच्यात मिळालेले आहे. आणि अजुन १ ते १.५ कोटी रुपये शासनाचे देय आहे. पुढे जे आपल्याला फायर स्टेशन उभारायचे आहे तर ते आपल्याला योग्य नाही होणार.

**श्री.नितीन लढ्ढा:-** फायर स्टेशनसाठी किती तरतुद दाखविलेली आहे.

**मा.आयुक्त :-** पेज नं.५१ वर अ.क्र.०४.

**मा.सभापती :-** फायर स्टेशनच नाही काही नविन इमारती आहे. समजा आपले प्रभाग समितींचे जे कार्यालय आहे. प्रभाग समिती क्र.४ तेथे इतकी वाईट अवस्था आहे. तेथे नविन इमारतच बांधली पाहिजे अशी अवस्था झाली आहे त्या इमारतीची. मी स्वत: तेथे विझीट देऊन आलेलो आहे.

**मा.आयुक्त :-** हो, गरज आहे तेथे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** गरज आहे.

**मा.आयुक्त :-** गरजे बद्दल कोणाचीच चर्चा नाही. गरजे बद्दल वाद नाही.

**श्री.नितीन लढ्ढा:-** गरजेबद्दल वाद नाही. वाद फक्त निधी बद्दल आहे. माल आऐंगा कहा से.

**मा.सभापती :-** मग येणार नाही तर काही करायचेच नाही आपण.

**श्री.नितीन लढ्ढा:-** नाही नाही राजु भाऊ खर्च करण्यापुर्वी उत्पन्न कसा वाढविता येईल.

**मा.सभापती :-** आपणाकडे येईल त्यातुनच केला जाईल मग.

**श्री.नितीन लढ्ढा:-** उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोणातुनच पहिले व्हायला पाहिजे. उत्पन्न वाढला निधीला तर खर्च करायला रस्ते १०० आहे. परंतु काय आहे आपण फक्त खर्चाचाच विचार करतो, उत्पन्नाच्या बाबतीतला विचार जो आहे ना त्याच्यासाठी आपण खुप कमी पडतो.

**मा.सभापती :-** उत्पन्नाचे तर मर्यादीत स्त्रोत आहे ना भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** मी म्हणुनच म्हटलो की, निधी मर्यादीत सोर्स आहे, त्याच्यामध्ये इम्प्रुमेंट करुन कश्या पध्दतीने त्याला वाढविता येईल. अदर सोर्सेस काय आहे.

**मा.सभापती :-** वसुलीला जास्त महत्व दिला गेला पाहिजे. वसुली ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. आजही पाहिला आपण किती टक्के वसुली झाली घरपट्टीची. आज थकबाकी किती आहे. वसुली झालीच पाहिजे.

**मा.आयुक्त :-** ही सर्व आपल्याला शिस्त लावावी लागणार आहे वसुलीचे प्रमाण वाढविण्यासाठी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब, पाच पाच वर्षापासुन घरे बांधुन लोक राहायला गेले, त्यांच्या घरपट्टयाच लागु दिल्या नाहीत. ना ही नळपट्टया लावल्या.

**मा.आयुक्त :-** नवनाथ भाऊ गेल्या २० वर्षामध्ये आपण रिव्हीजन केलेली नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** केलीच नाही ना.

**मा.आयुक्त :-** मग हे सगळ कराव लागेल ना आपल्याला, ज्या गोष्टी आपण करणे आवश्यक होत्या ते आपण केल्या नाही.

**श्री.नितीन लढ्ढा:-** केली ना ती, आमच्याच काळात सुरु होती ती.

**मा.आयुक्त :-** आता आपण निविदेची प्रक्रिया सुरु केली, या वर्षी आपण करतो आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** प्रॉपर्टी ज्या टॅक्सेशनच्या नेट मध्ये आलेली आहेत.

**मा.सभापती :-** भाऊ तुम्ही सुरुवात केली ते सगळ मान्य आहे पण उशिर पण झाला ना त्या विषयाला.

**श्री.नितीन लढ्ढा:-** देर आऐ दुरुस्त लाऐ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** १ कोटीच्या ऐवजी २ कोटी करा, १० कोटी खुप जास्त होईल. १.५ कोटी किंवा २ कोटी करा.

**मा.आयुक्त :-** वार्ड ऑफिससाठी १० कोटी खर्च करण्याची आज महापालिकेची ऐपतही नाही.

**श्री.नितीन लढ्ढा:-** आवश्यकता असली तरी आज आपली परिस्थिती नाही.

**मा.आयुक्त :-** काही दिवस आपल्याला या साधेपणामध्येच काढावे लागतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अत्यावश्यक छोटया मोठया काही रिपेअर्स असतील ते करुन घेऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** कर्जमुक्त झाले की करु राजु भाऊ.

**मा.सभापती :-** २ कोटी पर्यंत करु.

**श्री.नितीन लढ्ढा:-** म्हणजे प्रशासकीय इमारत, फायरस्टेशन सगळच त्याच्यात आले.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तसे त्यांचेही प्रस्ताव मागुन घेऊ जसे तुम्ही सांगितले आऊट ऑफ सिटीतले मेहरुणचे पिंप्राळयातले, त्यांचे प्रस्ताव मागुन घेऊ.

**मा.सभापती :-** ते आता होण्यासारखे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** हे बघा कसा असतो राजु भाऊ त्यावेळेलाही प्रस्ताव दाखल केला, प्रयत्न केले. पैसे मंजुर झाले. सन्मा.आमदार प्रयत्न करतील, मा.पालकमंत्र्यांना भेटु, पर्यावरण आणि याचे खाते साहेबांकडेच आहे. प्रयत्न करायचे असतात शेवटी बघा काय आहे. मिळेल नाही मिळेल तर याची हमी आपण येथे बसुन देऊ शकत नाही किंवा घेऊ शकत नाही. परंतु प्रयत्न केले तर मिळालेले आहे पैसे. नाविन्य योजना मध्ये २-२ व ४-४ कोटी आपण डी.पी.डी.सी. मधुन टाकु शकतो. म्हणजे एक कसे असते राजु भाऊ आपल्या डोळयासमोर नियोजन असल ना. तर त्या दृष्टीकोणातुन आपण पाठपुरावा करतो.

**मा.सभापती :-** प्रशासनाने १० लाखाची तरतुद केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** उद्यानांसाठी.

**मा.सभापती :-** बगीचे सुशोभिकरण

**मा.आयुक्त :-** एक्झीस्टींग जे आपले गार्डन आहे त्याच्यामध्ये जी आपल्याला सुशोभिकरण करायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** शिवाजी उद्यानाचे कसे आहे राजु भाऊ. ५-५० लाखाने काही ही होणार नाही. कारण प्रचंड मोठा ऐरिया आहे. आणि त्या सुरक्षित करण्याच्या दृष्टीकोणातुन त्याला कंपाऊंडवाल बांधायला साधारणता २ ते २.५ कोटी रुपये लागतील. आणि जो पर्यंत त्याला सेक्युअर्ड करत नाही तो पर्यंत आपण कितीही पैसा ओतला आणि किती ही खर्च केला तर उपयोग नाही.

**मा.सभापती :-** सिक्युरिटीचा विषय तर खुप गरजेचा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** म्हणुनच म्हणतो की, याच्या संदर्भातला संपुर्ण प्रस्ताव पाठविलेला आहे. भोसले साहेब ते प्रस्ताव तुम्ही काढुन आपल्या बांधकामाच्या माध्यमातुन त्यांनी पाठविलेला आहे.

**मा.सभापती :-** त्या उद्यानामध्ये काही वन औषधी सुध्दा आहे तर त्यांची जतन करणे आपली जबाबदारी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** हो, तेव्हा काय असत, आपण शासनाकडुन नगरविकास विभागाकडे निधी रस्ते कामांसाठी मागतो, तसेच पर्यटन विभागापासुन हा पैसा आपण मंजुर करुन आणलेला आहे त्यावेळेपासुन, तश्या पध्दतीच्या शासनाच्या ज्या काही योजना असतील किंवा डी.पी.डी.सी. मधुन आपण बाकीच्या इतर कामांसाठी मिळेल ना. साधारणता डी.पी.डी.सी.च्या माध्यमातुन २५ कोटी मिळतील. तशी मंजुरीही येऊन गेलेली आहे. त्याच पध्दतीने तेथील नाविण्यपुर्ण योजनेमध्ये बऱ्याच योजना आहे जे नाविण्यपुर्ण योजनांमध्ये उद्यान वगैरे याच्या दृष्टीने समाविष्ट करुन निधी आणण्याचा प्रयत्न करु. आणि सामुहिक प्रयत्न केले तर १००% निधी मिळेल. आपण असे तरतुदी करुन धड असे ते उद्यान ही विकसीत होणार नाही. ज्या वेळेला उद्यानासाठी निधी उपलब्ध होईल.त्यावेळेला ते कंपाऊंड वॉलही तुटलेले असतील.

**मा.सभापती :-** त्याच्यासाठी कंपाऊंड बांधल तर ते पडुन जातील पण आज तेथे जे आहे ते सुरक्षित राखणे गरजेचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** त्याचा तुम्हाला संपुर्ण प्रोजेक्ट डोळयासमोर ठेवुन नियोजन करावे लागेल. आणि मग तो कुठल्या योजने मध्ये बसतो, आणि ते जिथे कमी पडेल तेथे महानगरपालिकेच्या निधीचा विचार करता येईल ना आपल्याला, आज तरतुद जरी केली तर ती तरतुद खर्ची सुध्दा पडणार नाही. म्हणजे अनावश्यक त्या तरतुदी युटीलाईज होणार नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नितीन भाऊ तसेच ती रामदास कॉलनीतली जागा पण खुप मोठी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** त्याच्या संदर्भात एक दोन स्पॅंसरशिप ओढतो मी, परवा सुप्रिम इंडस्ट्रीजशी ही बोललो की, तुम्ही सार्वजनिक शौचालयाच्या संदर्भातला आमचे काम मार्गी लावता आहे, त्याच पध्दतीने म्हटले, एखाद्या उद्यानाचा विचार करा. जसे पिपल्स बॅंकेशी आपण बोललो बहिणाबाई उद्यानाच्या संदर्भात. तश्याच पध्दतीने एखाद्या चांगल्या कंपनीला पकडुन सी.एस.आर.मधुन जर ती रामदास कॉलनीची जागा विकसीत होत असेल,

तर आपण त्याच्यातुन करु ना प्रयत्न, आज कसे आहे ताई, आपल्याकडे जर २००-५०० कोटी रुपये सरप्लस पडले असते. तर आपल्या निधीतुन हे सर्व बाबी तरतुद करुन आपणच केले असते. परंतु आज अडचण काय आहे आपली आपण तरतुद करतो आहे पण आपल्याकडे पैसाच नाही. मग त्या तरतुदी करुनही साध्य काहीच होत नाही. जे साध्य करायचे आहे ते लोकसहभागातुन करायचे असेल काही प्रयत्न त्याच्या माध्यमातुन करु. जेथे आपले योगदान आणि त्यांचा कमी पडत असेल, तर जॉईंटवेन्चर मध्ये करु. जर एखादी कंपनी म्हणत असेल की, आम्ही इतके काम करु आणि तुम्ही इतके करा. जॉईंटवेन्चर मध्ये करत असाल तर ते ही करु.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** भैरु दादांशी याच्या संदर्भात ही बोलता येईल कारण भैरु दादांचा जवळचे हे आहे ते, त्यांच्याच टि.पी. स्कीम मधला आहे ते,

**श्री.नितीन लढ्ढा:-** आणि त्यांनाच लागुन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो मी तेच म्हटल ना की, दादांच्या टि.पी. स्कीम मधला आहे ते.

**श्री.नितीन लढ्ढा:-** आता कसे आहे ना, आता आपण त्यांना बहिणाबाई उद्यानाच्या संदर्भात बोलले, एक सकारात्मक मानसिकता त्यांच्या चर्चेतुन दिसते. ते म्हणाले की, एप्रिलच्या पहिल्या हप्त्यात आम्ही बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची मिटींग घेऊ. आणि निश्चितपणे त्याच्यावर योग्य निर्णय घेऊ. त्यावेळेला हे ऑप्शन किंवा रामदास कॉलनीचा ऑप्शन, दोघांपैकी, दोघांशी त्यांच्या भावना जुडलेल्या आहे. येथे सामाजिक रित्या जुडलेल्या आहे आणि तेथे कौटुंबिक रित्या जुडलेल्या आहे रामदास कॉलनीच्या बगीच्याला, दोघांपैकी मान्य करु आणि काही असेल तर अजुन एखाद्याला धरुन आणु.

**मा.आयुक्त :-** तो स्पॉट चांगला आहे रामदास कॉलनीचा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मोठा आहे एकदम मोठा.

**मा.सभापती :-** नागरीकांना प्रेत जाळण्यासाठी जी लाकडे लागत होती काही वाढ केली होती, त्यात आपण वाढ केली, त्यानंतर महसुल जमा मध्ये काही वाढ सुचविलेली आहे त्याच्यानंतर खर्चामध्ये आपण साथीच्या रोगासाठी १५ कोटीची तरतुद केली होती ती ३ कोटी करण्यात आली, त्यानंतर इमारत व्यवस्था व दुरुस्तीसाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** इमारत व्यवस्था व दुरुस्तीसाठी किती,

**मा.सभापती :-** १ कोटी आणि प्रभाग वाईज वेगळे केलेले आहे. अजुन प्रत्येकी २५-२५ लक्ष,

**मा.आयुक्त :-** ही तर दुरुस्तीची झाली, ती जी १० कोटीची तरतुद केली होती ती नविन इमारतीसाठी.

**मा.सभापती :-** हे प्रभाग निहाय पण वाचुन दाखवु का ? त्यानंतर गटार व्यवस्था व दुरुस्तीसाठी ३ कोटीची तरतुद करण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा:-** किती ३ कोटी, नविन गटारी व्यवस्था का ?

**मा.सभापती :-** नाही, दुरुस्ती. ३ कोटी. व्यापारी संकुल इमारती व्यवस्था त्याच्यासाठी ५ कोटीची तरतुद केलेली आहे. त्यानंतर नगरसेवक निधीसाठी ४ कोटीची तरतुद आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** रद्द करुन टाका, मागचा अनुभव पाहता एक रुपयाही खर्च झालेला नाही आणि पुढे ही होणार नाही.

**मा.सभापती :-** रद्द करण्याऐवजी कमी करा.

**श्री.नितीन लढ्ढा:-** तरतुद इतकी छोटी होऊन जाते की, त्याच्यामधुन काहीच कामे होत नाही.

**मा.आयुक्त :-** एका नगरसेवकाला प्रत्येकी ५ लाख रुपये आणि ५ लाखात एक गटारही होत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपण तरतुद करतो पण सन्मा.सदस्यांना ते दिल्यानंतर काही काम होत नाही. आणि हे सगळे झाल्यानंतर नागरीकांचा रोष वाढतो.

**मा.आयुक्त :-** काय होत, प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सुध्दा नगरसेवकांना नाही म्हणुन टाळणे, याच्याने विनाकारण प्रश्न उभे राहतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रद्द करुन टाका. ज्याचा उपयोगच आपण मागच्या तीन वर्षात करु शकलो नाही. आज त्याची पुन्हा पुन्हा तरतुद करुन काहीच उपयोग नाही.

**मा.सभापती :-** दिशा दर्शक व रस्ते मार्गदर्शक २ कोटीची तरतुद.

**श्री.नितीन लढ्ढा :-** यालाही जर कधी आपण व्यवहारीक रित्या बघितले आणि लोकसहभागातुन केले ना किंवा जाहिरातीच्या मोबदल्याबद्दल म्हणजे याच्यात महापालिकेचा पैसा लागणार नाही.

**मा.सभापती :-** त्याची ही ॲड होईल.

**मा.आयुक्त :-** जे ही होर्डींग असेल त्याच्या निम्म्य भागात त्याचे नाव असेल आणि निम्म्य भागात दिशादर्शक असेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** जसे काही न्युजपेपर वाल्यांनी केलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो जसे देशदुतवाल्यांनी केलेले आहे. त्या माध्यमातुन आपण करु शकतो.

**मा.सभापती :-** पण ते आवश्यक आहे भाऊ, बाहेरगावाचे लोक येतात. बस स्टण्ड कुठे, रेल्वे स्टेशन कुठे, शहरात एकही दिशादर्शक फलक नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात बऱ्याच लोकांच्या मागे ईन्क्वायऱ्या झालेल्या आहेत.

**मा.सभापती :-** पण हे होणे खुप गरजेचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दिशादर्शकसाठी तुम्ही नाममात्र ५० लाख रुपयांची तरतुद ठेवा. परंतु ते काम मनपाच्या माध्यमातुन न करता प्रायव्हेट शोधा. शोधा म्हणजे येतील. तुम्ही म्हणाल त्या दिवशी तुमच्याकडे पाठवुन देईल अश्या एजन्सीज आहे.

**मा.सभापती :-** मनपाकडुन ५० लाखाची तरतुद करायची.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे एक औपचारीकता ठेवा हेडवरती.

**मा.सभापती :-** त्याच्यानंतर दिव्यांग कल्याण निधी त्याच्यात ३ कोटीची तरतुद करत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याला काही परसेंटेज ठेवा ना.

**मा.आयुक्त :-** आपले जे काही उत्पन्न आहे त्याच्यामधुन बांधील खर्च वजा जाता राहिलेल्या ५ टक्के. आता तो नियम आहे त्याप्रमाणे लुक आऊट केलेले आहे.

**मा.सभापती :-** महिला व बालकल्याण निधीसाठी २ कोटी.

**मा.आयुक्त :-** तोच सेम नियम यालाही लागु आहे. २ कोटी जरी आपण महिला व बालकल्याणला खर्च केला तर खुप चांगल्या योजना बनतील.आपला तोही खर्च होत नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** होत नाही म्हणजे ते दिला जात नाही.

**मा.आयुक्त :-** ताई तसे नाही. आपल्याकडचा जो निधी आहे ना. या विषयामध्ये महिला व बालकल्याण समितीने नविन वर्षाच्या सुरुवातीपासुनच नियोजन करावा की, त्या २ कोटीच्या खर्चाचे काय करायचे आहे. कारण नुस्ती तरतुद असुन उपयोग नाही आता पर्यंत आपण महिला दिनाचे कार्यक्रम आणि बचतगटाचे माल विक्री याचा खर्च होतो. तेवढीच म्हणजे तो खर्च ५-१० लाखापेक्षा जास्त होत नाही. काही महिलांसाठी काही शाळेच्या मुलींसाठी या योजना राबविल्या पाहिजे की, उन्हाळयात त्यांच्या आरोग्यासाठी,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो आता नाशिक मध्ये महिलांना ट्रेनिंग देऊन सिलाई मशिन दिल्या जातात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आम्हीही एकदा मशिन वाटुन दिल्या एकदा साडया वाढुन दिल्या. सिलाई मशिन तरी उपयोगी आले. ते साड्या आपण दिल्या तरी ते वापरणार नाही दिल्या तरी ते स्वत:साठी वापरणार. निधी अश्याच प्रकारे वापरला पाहिजे की, खऱ्या अर्थाने महिला त्याच्यातुन शिकुन आत्मनिर्भर होऊन शकतील.

**मा.आयुक्त :-** काही महिलांनी स्वत:चे व्यवसाय सुरु केलेले आहेत, तर त्याच्यावर आपण व्याजदर आपण स्कॉलरशिप देऊ या. किंवा शाळेचे काही विद्यार्थी असतील त्यांच्यासाठी काही स्कॉलरशिप म्हणुन त्यांना सायकल तर त्याचा काही सोशल ऑडिट व्हायला पाहिजे नाही तर नुसते पैसे खर्च करणेस काही अर्थ नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो ना साहेब, ते आलेत त्यांना प्रशिक्षण दिले, त्यांना मशिनी दिल्यात आणि त्याच्यावर त्यांना बिझीनेस उभा करुन दिला.

**मा.आयुक्त :-** व्यवसायाला त्यांच्या भांडवलाची मदत किंवा त्यांनी समजा काही तर लोन घेतले, तर त्यांच्या कर्जाचा जो व्याजाचा पोर्शन आहे ते महापालिकेने भरावा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आपल्याकडे बचतगट पण आहे आणि सर्व काही व्यवस्था आहे.

**मा.आयुक्त :-** इतर ज्या महानगरपालिका अश्या प्रकारच्या योजना राबवित आहे, त्यांची माहिती एकत्रीत करत आहे. त्याच्यानंतर आपण ह्या दिव्यांग कल्याणच्या आणि महिला व बालकल्याणच्या योजना महासभेकडुन मंजुर करुन घेऊ. तर या वर्षात आपल्याला दोन्ही घटकांना काही तरी न्याय देता येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पिंपरी चिंचवडला झालेले आहे.

**मा.आयुक्त :-** मी पिंपरी चिंचवडची माहिती मागविली आहे.

**मा.सभापती :-** त्यानंतर आर्किटेक्ट फी जी आहे त्याची १ कोटीची तरतुद केलेली आहे आपण. तसेच भांडवली जमा महाराष्ट्र सुवर्ण जयंती.

**मा.आयुक्त :-** आर्किटेक्ट फी जी १ कोटी म्हणत आहे आपण ती नेमकी कोणत्या प्रोजेक्टसाठी.

**मा.सभापती :-** आता जसा भाऊंनी विषय मांडला १०० कोटीच्या कामांचा आणि बाहेरची एखादी ऐजन्सी आली. त्याच्यावर सुपरव्हिजन करण्यासाठी, समजा काही कामे करुन घ्यायचे आहे. त्याच्यासाठी आपल्याला ती तरतुद करुन ठेवायची आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला एक सांगा महानगरपालिकेने असे कोणते कामं केले आहेत.आतापर्यंत असं कोणते मोठ संकट आले होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते आपल्याला राबवावे लागतील.

**मा.सभापती :-** आतापर्यंत आपण राबविलेले नाही . राबवायचे जर म्हंटले तर ती तरतूद करावी लागेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ठिक आहे ना तरतूद करण्याला प्राब्लेम नाही पण आपल्या डोळयासमोर असा कोणता प्रोजेक्ट आढळलेला आहे.

**मा.सभापती :-** आता मी १०० कोटीचा विषय म्हणत आहे, एखादी ऐजन्सी येत आहे काम करत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ते १०० कोटीचे ईस्टीमेट पी.डब्ल्यु.डी.कडुन करण्यापेक्षा महापालिकेडुनच ईस्टीमेट झाले असते तर बरे झाले असते. मला असे वाटते. प्रत्येक्षात अजुन ही राहिलेले असता. आपल्याला त्या भागाबद्दल हरकत नाही. जे झाले ते सोडा.

**मा.सभापती :-** करायचे नसेल ते तर रद्द करुन टाकु ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १० लक्ष रुपयांची तरतुद करुन घ्या.

**मा.आयुक्त :-** तसे आपण सानेगुरुजी रुग्णालयाची एक संकल्पना मांडली होती. तर त्यावेळी प्रोजेक्टवर आपण ते देऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** जसे आपण प्रभाग क्र.२ मध्ये दलितवस्ती मध्ये जे काम करणार आहोत. असे जर कामे आले तर त्यासाठी नाममात्र १० लाख रुपये ठिक आहे.

**मा.आयुक्त:-** वस्तुस्थिती मान्य करावी लागेल,

**मा.सभापती :-** तुम्ही सांगणार हे करु शकणार नाही ते करु शकणार नाही तर काही होणार नाही.

**मा.आयुक्त :-** सभापती साहेब, करु शकणार नाही म्हणजे निधी आला पाहिजे. निधीची उपलब्धता ही मर्यादा आहे आपली, आर्थिक कार्यक्रमाची काही मर्यादा नाही.

**मा.सभापती :-** याच्यात भांडवली जमा, सुवर्ण महाराष्ट्र जयंती याच्यामध्ये १०० कोटीची तरतुद केलेली आहे.

**मा.आयुक्त :-** त्यासाठी आपल्याला फक्त ३० कोटी वाढुन ठेवावे लागतील.

**मा.सभापती :-** ३० कोटी आपल्याला करावे लागणार.

**मा.आयुक्त :-** आपण ४२ कोटी आणि १२ कोटीची तरतुद केलेली आहे आता वाढीव जे आहे ते करायचे आहे.

**मा.सभापती :-** नविन गटारीसाठी ४ कोटीची तरतुद केलेली आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** अच्छा सुधारणेसाठी वेगळी तरतुद आणि बनविणेसाठी वेगळी तरतुद आहे.

**मा.सभापती :-** आता नविन इमारती आणि फायरस्टेशनच्यासाठी आपण २ कोटी केले. नविन रस्त्यांसाठी १५० कोटी केलेले आहे. नविन वाहनांसाठी २ कोटी आणि नविन समांतर लाईटचा जो विषय होता त्यासाठी २ कोटीची आपण तरतुद केलेली आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** समांतर लाईटसाठी म्हणजे स्ट्रीट लाईटसाठी अश्या प्रकारच्या आपण सर्व सन्मा.सदस्यांनी ज्या तरतुदी सुचविलेल्या होत्या, ते आज आपण सर्व सदस्यांनी एकमताने मंजुर केलेले आहे.

नितीन भाऊ सर्व सदस्यांनी एकमताने मंजुर केलेले आहे. हे सर्व जोडुन आपण येणाऱ्या महासभेत अर्थसंकल्प सादर करणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता जो शिवाजी नगर उड्डाणपुलाच्या संदर्भातला विषय ईलेक्ट्रीक पोल स्थलांतरीत करण्याचा विषय आपण ४५ कोटीच्या रस्त्यांमधुन ३ कोटीचा प्रस्ताव पाठविलेला आहे. अजुन त्याला मान्यतेचा जो प्रवास आहे तो थोडा लांब आहे. परंतु त्या मान्यतेच्या अधिन राहुन त्याची निविदा प्रक्रिया राबवु शकतो का ?

**मा.आयुक्त :-** याची आपण ३ कोटी २.५ लाख रूपये शिल्लक राहिले होते. आपण एम.ई.सी.बी.शी बोललो मी स्वत: चिफ इंजिनियरांशी बोललो, कलेक्टरांशी बोललो. निविदा प्रक्रिया झालेली आहे ऐजन्सी तयार आहे. निधी डिपॉझिशनची पॉलिसी आहे त्यांची, आपण एकदा निधी त्यांच्याकडे डिपॉझिट केला, किंवा एकदा राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता जरी दिली. तरी आपल्याला जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत आपल्याला एम.ई.सी.बी.ला सांगता येईल की, तुम्ही काम सुरु करा.अजुन याला प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे ती वर्कऑर्डर दिली गेली नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब ती निविदा प्रक्रिया रद्द झाली आता १.३ प्रमाणे आपण एम.ई.सी.बी.कडुन फक्त त्याचे ईस्टीमेट करुन घेणार आहोत.

**श्री.नितीन लढढा :-** त्याचे स्टीमेटही पुर्णता झालेले आहेत.

**मा.आयुक्त :-** १.४९ कोटीचा ईस्टीमेट कायम आहे. आम्ही याच्यात बदल करणार नाही. केंद्र ही आहे, ऐजन्सी सुध्दा तसेच देतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांचे १.४९ चे जे ईस्टीमेट होते ना. त्यावेळेला पुलाचा ड्रॉईंग वेगळा होता, वाय(Y)चा होता. आता साधारणता रिव्हाईज होऊन त्याला ६० ते ६५ लाखाच्या वरती खर्च येणार नाही.

मा.आयुक्त :- नितीन भाऊ मला नाही वाटत की, ईस्टीमेट मध्ये काही बदल होईल. कारण टावर साईडला जे आहे ते तर बदलायचेच आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ जे म्हणत आहे ते बरोबर आहे कारण ते दोन पार्ट मध्ये केलेले आहे,

**मा.आयुक्त :-** तुमचे जे शिवाजी नगर लाकुड पेठ मध्ये जे पोल आहे ते शिफ्ट करावेच लागणार.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तर ते एकच ईस्टीमेट मध्ये केलेले आहे, तर ते दोन पार्ट मध्ये करायचे आहे ईस्टीमेट.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर माझे म्हणणे एकच आहे की, या संपुर्ण प्रक्रियेला विलंब लागणार आहे. तत्पुर्वी त्या मान्यतेला अधिन राहुन ही निविदा प्रक्रिया राबुन घेतली ना. त्याच्यामुळे काम खुप डिले होत आहे. आणि खुप लोकांना त्रास होत आहे. म्हणजे त्याच्यापैकी आपणही एक आहात.

**मा.आयुक्त :-** मला असे वाटते की, राज्य शासनाने या १०० कोटीसाठी आणि या २५ कोटीसाठी एक कमिटी नेमली आहे. म्हणजे त्यावेळेचे जलसंपदा मंत्री, पालकमंत्री, आणि आमदार. आताचे जे विद्यमान जलसंपदामंत्री आहे ते या योजनेमध्ये असणार नाही जी.एम.पाटील साहेब, जिल्हाधिकारी, आमदार साहेब आणि पालकमंत्री, या तिघांनी निर्णय घेऊन राज्य शासनाला पाठवुन द्यायचे. म्हणजे आपण हा निधी महासभेने ठराव केल्याप्रमाणे त्याला प्रशासकीय मान्यता आणि हा निधी खर्च कुठुन करणार. त्यादिवशी त्यावेळेला आपण चर्चा केली होती. हे जे १.४९ कोटीचे काम आहे. त्याची इम्पलीमेंट्री महापालिकेची असावी, एम.ई.सी.बी.ची असावी. एकुण तांत्रिक काम आहे, १.३ खर्च कोणाला येईल. आणि आपले इंजिनिअरची असे काम करण्याची क्षमता बघितली तर हे एम.ई.सी.बी.ला देऊन द्यावा अश्या प्रकारचा एक विचार होता. आता त्याच्यावरती शासन निर्णय घेईल. परंतु आपण ठरावामध्ये म्हटले आहे की, हे काम महानगरपालिकेने करावे. तर हे धोरणात्मक निर्णय या समिती मार्फतच घेतले जाणार, असे आपण सुचविले.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब, पालकमंत्र्यांनी याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देऊन टाकलेले आहे. आणि जिल्हाधिकारी ही बोलले की, आज रोजी ते गरजेचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पालकमंत्री उद्या येत आहे. उद्या आपण हा प्रस्ताव आहे ना त्या संदर्भात जाऊन चर्चा करुन घेऊ. ती चर्चा करुन मिटींग तर फक्त कागदोपत्री दाखवायची आहे. असे काही जवळुन चर्चा करणेही अपेक्षित नाही. जिल्हाधिकारी साहेबांकडुन मिटींगचा प्रस्ताव तयार झाला की, पालकमंत्री महोदयांच्या सह्या घेऊन घेऊ. ते काम लवकर मार्गी लागेल म्हणजे याचा प्रचंड नागरीकांना त्या गोष्टीचा त्रास आहे.

**मा.आयुक्त :-** जळगांवच्या शिल्लक निधीच्या बाबतीमध्ये मी सचिव पातळीवर मी बोललो होतो. कारण राज्य शासनाला नविन निधी काहीच देता येणार नाही. निधी आपल्याकडे शिल्लक आहे, फक्त शिल्लक निधी मधुन

प्रशासकीय मान्यता आहे. त्यामुळे ही प्रक्रिया राज्य शासन स्तरावर सहज होईल. याला पुन्हा नियोजन, अर्थ विभागाची मान्यता घेण्याची काही आवश्यकता नाही. फक्त नगरविकास विभागाच्या पातळीवर आपल्याला मान्यता मिळुन जाईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते मला वाटते की, विभागीय आयुक्तांकडे सुध्दा पाठविण्याची गरज नाही.

**मा.आयुक्त :-** नाही, आता हे आपण डायरेक्ट जिल्हाधिकारी मार्फत पाठवु शासनाकडे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पावसाळयाच्या पहिले करा पण.

**मा.आयुक्त :-** पण पालकमंत्र्यांशी बोलु या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./ जशमनपा/ लेखा/ ८१३/ २०२०-२०२१ दि.१५/०२/२०२१ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०२०-२०२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेंत आलेले आहेत. दि.२५/०२/२०२१ रोजी घेण्यात आलेली सभा अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी तहकूब करणेत आलेली होती. सदर तहकूब सभा दि.३१/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली.

स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनाने अंदाजपत्रकात परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे जमा बाजूकडेस रक्कम रुपये १२९,०२,७२,०००/- कोटीची वाढ तसेच खर्च बाजूकडेस रक्कम रु.१२३,५९,००,०००/- कोटीची वाढ करण्यात यावी. जमा व खर्च बाजुकडेस केलेली वाढ सोबतच्या परिशिष्ठ “अ” मध्ये नमुद केलेली आहे.

सोबतच्या परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे जमा बाजुकडेस करण्यात आलेली वाढ व त्या अनुषंगाने खर्च बाजुकडेस करण्यात आलेल्या वाढीस याव्दारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सन २०२०-२०२१ याआर्थिक वर्षासाठी अकृषकसारा रक्कम रु.०३/- कोटी मात्रची वाढ करण्यात यावी.

प्रशासनाने वारसहक्काने मिळकत हस्तांतरण करणेबाबतची फी ५००/- रुपये दर्शविलेली असून ती फी ३००/- करणेत यावी. वारसाहक्का व्यतिरिक्त मिळकत हस्तांतरण करणे फी प्रशासनाने फी ५००/- रुपये दर्शविलेली असून ती फी ३००/- करणेत यावी. थकबाकी नसल्याबाबतचा दाखला देणेबाबतची फी प्रशासनाने १००/- रुपये दर्शविलेली आहे ती कायम करणेत यावी. मिळकत कराचे डुप्लीकेट बील फी प्रशासनाने १००/- रुपये दर्शविलेली आहे ती फी २०/- रुपये आकारणेत यावी. नविन नळ संयोजन फॉर्म फी प्रशासनाने ५०/- रुपये दर्शविलेली आहे ती फी २०/- रुपये आकारणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे. याबाबत प्रशासनाने उपरोक्त प्रमाणे दुरुस्ती करणेबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

प्रशासनाने परिशिष्ट “अ” मध्ये जमा व खर्च बाजुस केलेल्या वाढीव तरतुदी लक्षात घेवून अंदाजपत्रकात योग्य ती दुरुस्ती करुन सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक तयार करुन महासभेसमोर मान्यतेसाठी तात्काळ सादर करावे. सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत लेखा विभागाने संबंधित विभागांना त्वरीत अवगत करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

## परिशीष्ट अ

| महसुली जमा | | | आकडे लाखात:- |
|---|---|---|---|
| **बजेट हेड** | **आयुक्तांचे अंदाज** | **स्थायी समिती** | **एकुण वाढ** |
| **नगर रचना** | ९४६२८००० | १५०००००० | ५५३७२००० |
| **घरपट्टी** | ७५३०००००० | ९७७९००००० | २२४९००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| मार्केट वसुली (गाळा भाडे) | १६००००००००० | १९५००००००० | ३५०००००००० |
| खुला भुखंड | ८००००००० | १६०००००००० | ८००००००० |
| एकुण- | २५२७६२८००० | ३२३७९००००० | ७१०२७२००० |
| | | | |
| महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान | ३७०००००००० | ९५००००००० | ५८००००००० |
| | | | |

**महसुली खर्च**

| अ.नं | बजेट हेड | आयुक्तांचे अंदाज | स्थायी समिती | एकुण वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | नविन विद्युत पोल व विजवाहीनी प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | ५६००००० | ५६००००० |
| २ | लाईट व्यवस्था दुरुस्ती प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | ७४००००० | ७४००००० |
| ३ | जुने ट्राफीक सिग्नल काढुन नविन बसविणे | १०००००० | ५०००००० | ४०००००० |
| ४ | सोलर पॅनल बसविणे | २०००००० | २००००००० | १८०००००० |
| ५ | नाले व्यवस्था दुरुस्ती प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | २३००००० | २३००००० |
| ६ | संसर्गजन्य रोग प्रतिबंधक उपाय योजना | १०००००० | ३००००००० | २९०००००० |
| ७ | मोफत दहन दफन | ० | १००००००० | १००००००० |
| ८ | बाल गधर्व व्यवस्था दुरुस्ती | ५००००० | २५००००० | २०००००० |
| ९ | सार्व उद्याने व्यावस्था दुरुस्ती (प्रभाग १ ते ४) | ४००००० | ८००००० | ४००००० |
| १० | बगीचे सुशोभिकरण | १०००००० | १००००००० | ९०००००० |
| ११ | इमारत व्यवस्था दुरुस्ती | ५०००००० | १००००००० | ५०००००० |
| १२ | इमारत व्यवस्था दुरुस्ती प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | १००००००० | १००००००० |
| १३ | रस्ते व्यवस्था दुरुस्ती प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | १००००००० | १००००००० |
| १४ | गटार व्यवस्था दुरुस्ती | १००००००० | ३००००००० | २००००००० |
| १५ | व्यापारी संकुल व्यवस्था दुरुस्ती | ५०००००० | ५००००००० | ४५०००००० |
| १६ | व्यापारी संकुल व्यवस्था दुरुस्ती प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | ४०००००० | ४०००००० |
| १७ | पुतळे व्यवस्था दुरुस्ती | ३००००० | १०००००० | ७००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | पुतळे व्यवस्था दुरुस्ती प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | ४०००००० | ४०००००० |
| १९ | दिशादर्शक व रस्ते मार्गदर्शक | ० | ५०००००० | ५०००००० |
| २० | क्रिडा स्पर्धा / महापौर चषक | ५००००० | १०००००० | ५००००० |
| २१ | राष्ट्रीय विजेता योजना | ० | ५०००००० | ५०००००० |
| २२ | आर्थिक मदत | ० | ५०००००० | ५०००००० |
| २३ | प्रभाग समिती नामनिर्देशन समिती भत्ता | ० | १००००० | १००००० |
| २४ | क्रिडा स्पर्धा व योग प्रशिक्षण | ० | ५००००० | ५००००० |
| २५ | आर्किटेक फी | ० | १०००००० | १०००००० |
| २६ | जनता अपघात विमा | ०.०० | १०००००००० | १०००००००० |
| | | | २३६६०००००० | २०९९०००००० |

| | भांडवली खर्च | | | |
|---|---|---|---|---|
| अ.नं | बजेट हेड | आयुक्तांचे अंदाज | स्थायी समिती | एकुण वाढ |
| १ | नविन गटारी | ३०००००००० | ४०००००००० | १०००००००० |
| २ | नविन गटारी प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | १०००००००० | १०००००००० |
| ३ | नविन संडास व मुतारी प्र.स.क्र.०१ ते ०४ | ० | ८०००००० | ८०००००० |
| ४ | नविन बगीचे (उद्याने) | ५०००००० | २०००००००० | १५०००००० |
| ५ | नविन इमार व फायर स्टेशन | १०००००००० | २०००००००० | १०००००००० |
| ६ | नविन रस्ते (१०० कोटी / प्र. १ ते ४ रू.१२.५० प्रत्येकी) | १०४००००००० | १२५००००००० | २१०००००००० |
| ७ | नविन वाहने | १०००००० | २०००००००० | १९०००००० |
| ८ | नविन स्मशान भुमी | ० | १०००००००० | १०००००००० |
| ९ | मनपा हद्दीत रेल्वे उड्डान पुल | ० | १००००००००० | १००००००००० |
| १० | दिक्षा भुमी | ० | १०००००००० | १०००००००० |
| ११ | नविन पुतळे | ० | ५०००००० | ५०००००० |
| १२ | रेडक्रॉस मागील जागा विकसीत करणे | ० | २०००००००० | २०००००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | समांतर रस्ते नवीन लाईट | ५०००००० | २०००००० | १५०००००० |
| १४ | विद्युत दाहिनी बसविणे | ० | ५०००००० | ५०००००० |
| | | १०९१०००००० | १५३८०००००० | ४४७०००००० |
| | | | | |
| १ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान | ४२१०००००० | १०००००००००० | ५७९०००००० |

**टिप:- सन २०२०-२१ या अर्थिक वर्षासाठी अकृषकसारा ०३.०० कोटी मात्रची तरतुद करणेत यावी.**

| एकुण महसुल जमा वाढ | |
|---|---|
| एकुण महसुल जमा वाढ | ७१०२७२००० |
| | |
| महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान | ५८०००००० |
| एकुण :- | १२९०२७२००० |

| एकुण खर्च वाढ | |
|---|---|
| एकुण महसुली खर्च वाढ | २०९९००००० |
| एकुण भांडवली खर्च वाढ | ४४७०००००० |
| एकुण :- | ६५६९००००० |
| | |
| महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान खर्च | ५७९०००००० |
| एकूण :- | १२३५९००००० |
| शिल्लक :- | ५४३७२००० |

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**